# माणूस

२३ डिसेंबर, ७२

पन्नास पैसे

# दुष्काळ आला मुंबईत!



संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

२३ डिसेंबर १९७२

# माणूस

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा अंक : एकूणतीस

## सप्रेम नमस्कार

**१६ डिसेंबर ७२**

□ दि. १६ डिसेंबरच्या अंकातील प्रा. राम बिवलकरांचे 'अ–काली आव्हान' वाचले. जूनमध्ये पोटभर पाणी मिळाले की, काडी, काट्यावर जगलेली जनावरे पोट फुगून मरणार हे वाचून मन खिन्न झाले. या भागात घडलेली एक घटना ! का शेतकऱ्याने दुष्काळात पोसावी कशी म्हणून ५० मेंढरे खाटकांना विकली. त्यांनी कापली. आत अक्षरश: ओंजळी ओंजळी माती निघाली आतड्यात ! तेव्हा हे जनावरांच्या बाबतीत घडणार हे अटळ ! हे टाळता येणे शक्य नाही का ? गुरांचे डॉक्टर व तज्ज्ञ यांना हे आव्हानच नव्हे का ? प्राप्त परिस्थितीतून सुखरूपपणे पार पडता येईल अशी योजना, आखणी, औषधोपचार यांचे वेळोवेळी मार्गदर्शन हवे. नाहीतर अवर्षणामुळे या वर्षी दुष्काळ तर पुढल्या वर्षी जनावराभावी मेहनत, मशागत नाही म्हणून रान पडीक म्हणून दुष्काळ ! म्हणून वेळीच विचारवंतांनी याची दखल घेऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे.

ज्ञानेश्वर अकलुजकर, पंढरपूर

मुखपृष्ठ : वसंत सहस्रबुद्धे

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# नवी गुलामगिरी

२ डिसेंबर १९७२ चा माणूस वाचला. निळू दामले यांचा लेख वाचून काय वाटले हे सांगत नाही. परंतु त्याला अनुसरून काही सत्य घटना उजेडात याव्यात असे वाटते. वर्तमानपत्राचे तर ते आद्य कर्तव्य आहे. खेड्यापाड्यातील मुक्या मेंढरासारखी जनता. त्यांच्या व्यथा कोण जाणणार ? असेच आमचे एक गाव. भारतातील सर्वांत मोठी व आदर्श ग्रामपंचायत. नगरपालिका करण्यास आमचा मोठा विरोध. कारण ग्रामपंचायतीच्या नावाखाली वाटेल ते फायदे आम्हास लाटावयास मिळतात. आमच्या गावात दारूबंदीच्या काळातही राजरोस हातभट्ट्या चालत असत. आतातर काय सगळेच मोकळे. मटक्याचे दहा, हातभट्टीचे वीस आणि अन्य अशा मार्गाने गावातील पुढारीणबाई पैसे वसूल करीत असतात. आपण तर लिहिलेच आहे गावाच्या सुधारणेबद्दल. एवढे मोठे गावाचे उत्पन्न परंतु गावाची दुर्दशा का हे काही कळत नाही. मात्र दुसऱ्या नंबरची ग्रामपंचायत म्हणून गौरव होतो. कशाच्या निकषावर काही कळत नाही. परंतु बोलणार कोण ? बोलून गावात राहावयाची हिम्मत पाहिजे. निवडणुका आल्या म्हणजे गंमत पाहावी. आमच्या पुढाऱ्याचे भोवतालच्या चमचे लोकांची पुढाऱ्याची थुंकी झेलण्याकरिता चढाओढ. आम्ही बिनविरोध निवडणुका करतो. केवढा एकोपा ! केवढा मोठेपणा ! मिटिंग बोलवल्यास आमच्या पुढाऱ्यावर स्तुतिसुमनांचा किती वर्षाव होईल काही बोलायची सोय नाही. निवडणूक कमिटी स्थापन करायची. त्यात पुढारी मुख्य. नंतर त्यांची मुले. नंतर नातेवाईक आणि मग हाजी, हाजी व होयबा. बस निवडणुकीचा निकाल लागलाच बिनविरोध. विरोध करणाराला वावच नाही. आमच्या तालुक्यात सभापतीची बिनविरोध निवड झाली. या सद्गृहस्थाचे कार्य फार मोठे. मध्ये यांनी रस्ता करण्याचे कॉंट्रॅक्ट घेतले. रस्त्याच्याकडेला खडीचे ढीग येवून पडले. काही दिवसांनी येणाऱ्याजाणाऱ्या वाहनांच्या वर्दळीने रस्ता आपोआप तयार झाला. मात्र त्या अवधीत या महाशयांची फॉरेनची ट्रीप व बंगला तयार झाला.

केवढे मोठे कार्य ? अशी एक एक रत्न आमच्या पुढाऱ्यांच्या खिशात आहेत. स्वत: कधी कुणाला दुखविणार नाहीत. बोलणे तर फार गोड. बोलण्यात गरिबांचा कळवळा फार. पण परस्पर हूलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवण्यात फार हुषार. गावाभोवताली साऱ्या झोपडपट्टया आहेत. त्यातून जे लोक राहतात ते गुरे पाळतात. कुणी हातभट्टया चालवितात. सभोवतालच्या शेतकऱ्यांच्या शेतातून गवत, गवत न सापडल्यास त्यांची पिके कापून आणावयास हे लोक मागेपुढे पाहत नाहीत. पण त्यांचे हजारो रुपयांचे खत मात्र कवडीमोलाने यांचे शेतात. लोकांना दहशत बसविण्यात मात्र यांचा हातखंडा. उदा. – सुरवातीच्या महाशिवरात्रीच्या यात्रेच्यावेळी प्रदर्शन भरविले होते. लोकांकडून हजारो रुपये वर्गणी जमा केली होती. शिवाय यात्रेचे उत्पन्न आले ते वेगळेच. परंतु बहुसंख्येने बक्षिसे यांच्याच लाग्याबांध्यात वाटली गेली.

एक प्रसंग–यांचे एका नातेवाईकाने स्वत:चे बैल प्रदर्शनात ठेवायला आणले होते. त्यातील एक बैल धुतला नव्हता. बैल का धुतला नाही म्हणून मालकाने विचारले. बिचारा गडी घाबरून गेला. मालक, सवड झाली नाही म्हणून सांगितले. पुढील प्रसंग फार भयानक होता. मालकाने गड्याच्या हातातील आसूड घेतला व त्या गड्याच्या तोंडावर फटके लगावले. पूर्वी गुलामांना असे आसुडाने मारीत असत असे वाचलेले आहे.

परवा परवाची गोष्ट–येथील कॉलेजचे स्नेहसंमेलन होते. निवडणूका होत्या. यांचे घरातील मुलीविरुद्ध दुसरी एक मुलगी उभी होती. पुढाऱ्याचे मुलांना वाटले आपली बहीण नक्कीच निवडून येणार. म्हणून त्यांनी हार, पेढे आणून ठेवले होते. पण झाले मात्र भलतेच. दुसरीच मुलगी निवडून आली. काही मुलांनी फटाके उडवून आनंद प्रदर्शित केला. पण त्या मुलांना त्याचे फार मोठे मोल द्यावे लागले. निवडून आलेल्या मुलीला माघार घ्यावी लागली. काही हरिजनांच्या मुलांना रक्त सांडेस्तोपर्यंत मारझोड करण्यात आली. काही मुले पळून गेली व काही मुलांनी भीतीमुळे कॉलेज सोडले.

अजून एक किस्सा–हकीगत थोडी जुनी आहे. एका रंगपंचमीला यांचे मुलाने एका वयस्कर गृहस्थांचे अंगावर रंग टाकला. त्यावरून बाचाबाची होऊन त्यात त्या वयस्कर गृहस्थांना यांच्या पाळीव गुंडांनी बरीच मारझोड केली. पुढारी जवळून गेले. परंतु त्यांनी साधी चौकशीसुद्धा केली नाही. पोलीस चौकीजवळ असताना पोलिसांचे देखत या घटना घडल्या. परंतु त्यांची दाद घेतली गेली नाही. या गृहस्थाने प्रकरण वरपर्यंत नेण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना असे काही अडचणीत पकडले, की त्यांना सर्व गिळून गप्प बसावे लागले. हे गृहस्थ चांगले प्रतिष्ठित व्यापारी असून एक निष्ठावंत काँग्रेस कार्यकर्ते व स्वातंत्र्य सैनिक आहेत.

शेतीचे बाबतीतही असेच–पाटाचे पाणी चालू झाले की यांचे शेतात जे

पाणी सुरू होते ते कॅनॉल आटेपर्यंत. त्यांचे भोवतालचे शेतकरी बिचारे उरलेले मिळेल ते पाणी घेऊन आणि आपली कोमेजलेली पिके पाहून दात ओठ खाऊन गप्प बसतात. इरिगेशन खात्याचे वरपर्यंत यांचे वशीले तेव्हा काय कुणाची बोलण्याची टाप. त्यामुळे ऊसाची पिके, कपाशीची पिके किंवा इतर पिके अगदी मस्त असतात. आणि मग पैसा पण मस्त मिळतो. केवळ सत्ता हातात असल्यामुळे प्रत्येक ठिकाणी प्रत्येक गोष्टीचा हे फायदा उठवितात. व प्रत्येक ठिकाणी दहशत निर्माण करून सर्वावर दबाव आणतात. बहुसंख्य लोक शेतकरी व व्यापारी असल्यामुळे त्यांना विरोध केल्यास कोठे नडले जाऊ ही भीती. कारण मार्केटिंग कमिटी, जिल्हा मध्यवर्ती बँक, खरेदीविक्री संघ, तालुका पंचायत, साखर कारखाना व जिल्हा परिषद सगळेच हातात. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत लाखांनी रुपये वाटून जिल्हा परिषद हातात घेतली.

वाढदिवस साजरे करणे, लग्नसमारंभ साजरे करणे यातही हातखंडा. सारे गाव राब राब राबणार विनाफायदा. लाखो रुपयांचे आहेर आले. वाटले, गोरगरीब व हरिजन यांना साड्या-चोळ्या वाटल्या जातील. हजार, पाचशे साड्या वाटल्या असत्या गरिबांना म्हणून काही बिघडले नसते. पण कसचे काय आणि कसचे काय, सगळेच घे, घे. दे, दे काहीच नाही. एवढे रामायण जरी हरघडी घडत असले तरी आमचे जिल्हा मुखपत्र मूग गिळून गप्प. बहुतेक त्यांच्या मुखात आमचा हात अडकला असला पाहिजे. नाहीतर आमचे झुंजार पत्रकार कधीच गप्प बसते ना!

आपणाला स्वातंत्र्य मिळून पंचवीस वर्षे झाली, तरी गुलामगिरी कपाळाची सुटत नाही. अशा पुढाऱ्यांपेक्षा इंग्रज बरे होते अशी हरघडी म्हणायची पाळी येते. अशा दहशतवादी वातावरणात स्वतंत्र वृत्तीची, निर्भय, निर्भीड प्रजा कशी तयार होणार? स्वातंत्र्याचा रजतमहोत्सव या दुष्काळाच्या छायेत व या दहशतवादी पुढाऱ्यांच्या सोबतीत आम्ही साजरा करीत आहोत. याची कृपया नोंद घ्यावी आणि अशी गावे व असे पुढारी आहेत अशा ठिकाणी मध्यवर्ती सरकारने गुप्तचर नेमून माहिती गोळा करावी. नाव दिले तर निवेदकाला गावात राहणे मुष्कील होईल. क्षमस्व.

**[पोस्टाच्या पाकिटावर शिक्का अकलुज-पंढरपूर असा आहे. —सं.]**

# मुंबई वार्ता

कोणी कितीही छातीवर हात ठेवून सांगितले तरी महाराष्ट्र मंत्रिमंडळात सरळ दोन गट आहेत हे आता सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ झाले आहे. मध्यंतरी वसंतराव वांद्रेकरनी रजनी पटेल आणि त्यांचे सहकारी यांचे विरुद्ध काहूर माजविले. दिल्लीपर्यंत मजल मारली. पण शेवटी त्यांना खुद्द मुंबईतच पक्षांतर्गत निवडणुकीत हार खावून घरी बसावे लागले. वांद्रेकर कंपनीचा मुळापासून झालेला पराभव मुख्यमंत्र्यांना चाटून गेला आहे. हे एम्. पी. सी. सी. च्या अध्यक्षीय निवडणुकीच्या घासाघासीवरून स्पष्ट झाले आहे.

केवळ दोन महिन्यापूर्वी जे सावंत मास्तर (पी. के. सावंत) मुख्यमंत्र्यांना आणि उपमुख्यांना पसंत झाले होते ते अवघ्या दोन महिन्यात नकोसे का व्हावेत ? माजी अध्यक्षांच्या कारकीर्दीतील हिशोबांचे घोटाळे सावंतांनी उघड्यावर आणलेत हे बोलले जाणारे कारण वरकरणी आहे. काँग्रेसपक्षाला पैश्यांच्या हिशोबातील घोटाळे, अगदी ब्रह्म घोटाळे काही नवीन नाहीत. यापूर्वी कोटयावधी रुपयांच्या घोटाळयांनी A. I. C. C. च्या बैठकीत रणे माजविलीत. अगदी थेट नेहरूंच्या कारकीर्दीपासून हे चालत आले आहे.

पंतप्रधानांचे पती आणि नेहरूंचे जामात स्व. फिरोजभाई गांधी हे हिशोबातल्या घोटाळयावर नेहमी तुटून पडत. पण शेवटी फिरोजभाईंना कोणी दाद देत नसत. सारे काही पक्षाच्या नावाखाली समावून नेले जात असे. आजही तालुका काँग्रेस पासून A. I. C. C. पर्यंत तीच री ओढली जात आहे.

मग सावंत मास्तरांनाच एवढा नाईक–वर्तक–वसंतदादा कंपनीचा विरोध का ? मुंबईच्या टिळक भवनाच्या आजूबाजूला जी चाहूल लागते ती अशी बी. पी. सी. सी. त आणि एम्. पी. सी. सी. त समविचाराची माणसे आली

तर बाई मुख्यमंत्री पदावर एखाद्या नव्या माणसाची नेमणूक करणार आहेत. खरे म्हणजे ७२ च्या निवडणूका नंतरच तेथे बाईंच्या विश्वासातील दिल्लीचा एखादा राज्यमंत्री येणार होता. पण तेलंगणाच्या आगीची झळ लागल्यावर विदर्भाचा वणवा पेटू नये म्हणून बाईंनी धुर्तपणे नाईकांची खुर्ची शाबूत ठेवली. आतातर विदर्भ वरकरणी धुसफुसता दिसला तरी शांत होत आहे. आणि नाईक–वर्तक–वसंतदादा ग्रुपविरुद्ध पक्षाच्या विधानसभा गटात आणि मंत्रिमंडळात चांगलीच भुसभूशित जमीन तयार झाली आहे. बाई फक्त निमित्त पहात आहेत.

खुद्द ठाणे जिल्ह्यात वर्तकांच्या पायाखालची वाळू झपाट्याने सरकू लागली आहे. स्वत: मंत्रिमंडळात महत्त्वाच्या जागी आणि भावजय सौ. ताराबाई जिल्हा परिषद अध्यक्षा आणि वसई तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्षपण स्वत:चे नातलग त्यामुळे या नातलग शाहीवर आमदार शांताराम घोलपांचा गट तुटून पडला आहे. शांताराम घोलपांचे कुटुंबी रघुनाथ घोलप मागील वेळेस जिल्हा परिषदेत शेतकी खात्याचे प्रमुख होते. यावेळी त्यांना डावलले. त्यामुळे घोलपांचा ठाणे जिल्ह्यातील फार मोठा गट वर्तकांचे विरुद्ध दबा देऊन बसला आहे. खुद्द भाऊसाहेबांच्या वसई तालुक्यात शांताराम जाधव, अनंत पाटील वगैरे तरुण कॉंग्रेसकार्यकर्ते भाऊसाहेबांच्या इच्छेविरुद्ध तालुका पंचायतीला उभे राहून त्यांनी अधिकृत कॉंग्रेस उमेदवाराला वसईत पराभूत केले. या बंडखोरांविरुद्ध कारवाई करू असे सुरूवातीला भाऊसाहेबांच्या वर्तुळातून ऐकविण्यात आले पण तथाकथित बंडखोरांनी शरणागती तर दिली नाहीच पण आव्हान दिल्यामुळे शिस्तभंगाची कारवाई बाजूलाच राहिली. उलट बंडखोरांकडे ते दूर जावू नयेत म्हणून याचनेच्या दृष्टीने पाहिले जात आहे.

गेल्या ४–५ महिन्यात ठाणे जिल्हा परिषदेत फार घडामोडी झालेल्या दिसतील असे एक 'बंडखोर' पांडुरंग पाटील म्हणालेत.

ठाणे जिल्ह्यातील एक समाजवादी कार्यकर्ते, महसूलमंत्र्यांचे सार्वत्रिक निवडणूकीतील एकमेव विरोधक आणि महसुल मंत्र्यांचे भाचे या तिहेरी नावाने ओळखले जाणारे पत्रकार पंढरीनाथ चौधरी यांनी एस्. टी. भाववाढ विरोधी अर्ज हायकोर्टात देऊन गेले दोन महिने महाराष्ट्रात एकच धमाल उडवून दिली होती. या हायकोर्टातील अर्जाचा निकाल साधारणत: लोकांचे अपेक्षेप्रमाणेच लागला. त्यामुळे निकाल ऐकून कुणालाच धक्का बसला नाही, पण या संधीचा फायदा उठवून पंढरीनाथ चौधरी यांनी हायकोर्टाच्या वेशीवर एस्. टी. च्या कारभाराची जी लक्तरे पसरली त्यामुळे प्रवासी वर्गात कमालीची जागृती झाल्याचे ठिकठिकाणी दिसून येत आहे. अर्जदाराचे वकील व आमदार बॅरिस्टर अनंतराव पाटील यांच्या हायकोर्टातील विच्छेदनावर जाणकार वकील बेहद्द

खूष झालेले दिसले. हायकोर्ट म्हणून दिलेला निकाल शिरसावंद्य मानला पाहिजे.पण अर्जाची सुनावणी चालू असताना न्यायमूर्ती तुळजापूरकर यांनी वेळोवेळी केलेल्या सूचना आणि अपेक्षा एस्. टी. महामंडळाला डावलणे कठीण होऊन बसले आहे. त्यामुळे झालेल्या भाववाढीत काही टक्के कपात होईल असे बोलले जात आहे. तसे झाले तर पंढरीनाथ चौधरी हायकोर्टात हरले पण लोकात जिंकले, असे होईल.

प्रभाकर म्हात्रे

## मुक्काम जव्हार

१. युद्धपातळीवरून दुष्काळी परिस्थितीला तोंड द्यायला निघालेल्या ठाणा–जिल्हा–परिषदेच्या इन्स्पेक्शन स्टाफने गेल्या आठवड्यात जव्हार कार्यालयाची तीन दिवस तपासणी केली. ती आटोपल्यावर तपासणी कालातील भरघोस 'खिलाई' व टेर 'पिलाई'चे पैसे देणे कमीपणाचे समजून या एकूण पाच 'समर्थाचिये सेवकांनी' जव्हारमधून पोबारा केला व स्वतःच्या धडक योजनेची चुणुक दाखविली! शेवटी जव्हारच्या अगदी पट्टेवाल्यांपासून तो विस्तारअधिकाऱ्यांपर्यंत ऐपतीप्रमाणे एक ते सहा रुपयांपर्यंत किमान एकूण दीडशे रुपये वर्गणी (!) या पगाराचे वेळी अगदी यादी करून उपटण्यात आली!

२. महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांना साडेसोळा हजार (बापरे!) प्राथमिक शिक्षकांची जरूरी असल्याची विधान सभेत नामदार मंत्र्यांनी दिलेली माहिती उल्हसित करणारी आहे. बेकारी निवारणाला केव्हढी मदत! आधीच या आदिवासी जव्हार तालुक्यात या कामी दरमहा सुमारे चाळीस हजार रुपये खर्च होतोय! त्यातच बरेच शिक्षक खानदेशी! अनेकांचा मुक्काम पोस्ट– राजधानी जव्हार. (आदिवासींना काय करायचं शिकून!) म्हणून एस. टी. जाणाऱ्या रस्त्यांवरील गावे वगळल्यास इतर खेड्यापाड्यातल्या शाळा कशा झकास बंद असतात हा सर्वत्र अचानक धाड घालून, हरून-अल्-रशीदप्रमाणे चौकशी करून पहाण्याचा विषय आहे! त्यातच वरील साडेसोळा हजारांमधली भर पडली म्हणजे न वर्णवे कल्लोळ!

३. दुष्काळी कामावर पंधरा पंधरा दिवस पगार मिळत नाही व मिळाला तर फारच थोडा मिळतो म्हणून मजुरांनी आक्रस्ताळीपणाने जव्हारात गेल्या महिन्यात मोर्चा काढला होता. कृतघ्नता किंवा व्यापक दृष्टिकोनाचा अभाव तो हाच! दुष्काळी योजनेचा जगन्नाथाचा रथ ओढण्यात सर्व कर्मचारी व अधिकारी कोण मग्न!

या रथाला आपल्यापरी गती देण्यासाठी, सेतुबंधनातील निरागस खारीप्रमाणे, दुष्काळी कामे सुरू झाल्यापासून अवघ्या तीन महिन्यांच्या आतच एका साध्या मस्टर कारकुनानेही चक्क पाच हजारांची एक फक्कडशी कोरी टंच मोटार-सायकल घेऊन टाकली!! द्या टाळी!!

जॅक अँडरसन

सेलू येथे झालेली

# मराठवाडा महिला समता परिषद

सौ. शारदा देवदत्त तुंगार

एक प्रसन्न (बिन चेहऱ्याची नव्हे) सकाळ. सेलू रेल्वे स्टेशन रंगीबेरंगी साड्यांनी फुलून गेले होते. प्रत्येकीच्या चेहऱ्यावर प्रतीक्षा दिसत होती. नांदेड-हून येणारी गाडी केव्हा येणार? वेळ होत आली. येईलच इतक्यात. गाडी आलीच. प्रत्येकीची नजर प्रत्येक डब्या-तून भिरभिरत होती. मराठवाडा महिला समता परिषदेच्या अध्यक्ष (की अध्यक्षा?) सौ. ताराबाई परांजपे याच गाडीने येणार होत्या. सगळ्या त्यांच्या स्वागतासाठी उत्सुक होत्या. ताराबाईंची शांत गंभीर मूर्ती डब्यातून उतरताना दिसली. आनंदाची लाट उठली अन् उत्स्फूर्तपणे घोषणा दिल्या गेल्या. ताराबाई परांजपेचा विजय असो, समता परिषदेचा विजय असो – सौ. गीताबाई चारठाणकर लगबगीने पुढे आल्या. पुष्पहाराने त्यांनी स्वागत केले. स्वयं-सेविकांनी लाठ्यांची कमान केली अन् कमानीतून अध्यक्षांची मिरवणूक वाजत गाजत निघाली. वातावरणातून उत्साह नुसता ओसंडत होता. सेलूच्या नागरि-कांत कौतुकाची भावना होती. काही जण चेष्टेने म्हणाले -- पार्टीबाजी के जमाने मे अब शायद औरतोंकी भी पार्टी बनी है।–अन् त्यांच्या 'ज्ञाना'ला हसत आम्ही पुढे जात होतो. नगर परिषदेच्या इमारतीसमोर मिरव-णूक थांबली. अध्यक्षांना व त्यांच्या असलेल्या आम्हा निमंत्रितांना निवास-स्थानाकडे नेण्यात आले.

औरंगाबाद, परभणी, उस्मानाबाद, नांदेड व बीड या पाचही जिल्ह्यातून महिला आल्या होत्या. प्राचार्य, प्राध्या-पिका, डॉक्टर्स, सामाजिक कार्यकर्त्या आदींचा त्यात समावेश होता. दैनंदिन कामातून वेळ काढून सर्व आल्या होत्या. गप्पा रंगत होत्या, विनोदांच्या सरी व हास्याचा गडगडाट चालला होता. दुष्काळ असूनही, नुकतीच पावसाची सर येऊन गेल्यासारखं वातावरण प्रसन्न होतं.

दुपारी (९ डिसेंबर) चार पासून परिषदेचे काम सुरू झाले. नगर परिष-देचा हॉल खच्चून भरला होता. स्वागताध्यक्षा सौ. चारठाणकरबाईंनी आपल्या अनौपचारिक शैलीने स्वागत करून सामाजिक समतेची आवश्यकता प्रतिपादन केली. पोलीस ॲक्शनपूर्वी झालेल्या महिला परिषदांचाही उल्लेख त्यांनी केली.

महिला समता परिषदेच्या उद्घाटक म्हणून आमदार मृणालताई गोरे आल्या

पृष्ठ ६२ वर

# दुष्काळ- आला मुंबईत !

दिलीप जोशी

दुष्काळाचे वातावरण आता मुंबईतही निर्माण झाले आहे. उपनगरातील कुर्ला, गोवंडी वगैरे स्टेशनांमध्ये दुष्काळ-पीडितांचे लोंढे फलाटांच्या अंथरुणांवर येऊन पडले आहेत. परिस्थिती काळजी करण्यासारखी आहे. एक तर या दुर्दैवी पाहुण्यांबद्दल कणव वाटत आहे आणि दुसरे म्हणजे आधीच मुंबई, तशात आणखी हे लोंढे म्हणजे उघड्या घरी नागडे गेले आणि कुडकुडून मेले अशी अवस्था. वेळीच दखल न घेतल्यास हे पाहुणे उद्या मुंबईचा तोल आणखी बिघडवून टाकतील असे व्यक्त करणारे एकदोन अग्रलेख पेपरांमध्ये येऊन, आपण धोक्याचा इशारा देत असल्याचे सांगून गेले. परंतु खरे लक्ष वेधून घेतले ते मुंबई प्रदेश युवक काँग्रेसतर्फे दुष्काळ-ग्रस्तांसाठी छावणी उभारली जात असल्याच्या बातमीने. छावणीची बातमी पाहिल्यावरोबर रविवारी दुपारी गळ्यात कॅमेरा अडकवून परळला गेलो.

तसे म्हटले तर प्रधानमंत्र्यांच्या वाढदिवसाला मेळावे भरवणे, झोपडपट्टी निर्मूलन परिषद स्थापन करणे किंवा गरिबी हटाव समितीतर्फे एका रविवारी सायंकाळी ट्रकमधून स्वस्त दराने भाजी विकून काही किलो गरिबी हटवणे वगैरे कार्यक्रम आखून देशापुढचे प्रश्न झटपट सोडवायला मुं. प्र. काँग्रेसने केव्हाच आरंभ केला आहे. अर्थात दुष्काळी पाहुण्यांकरिता रहायची, जेवायची व्यवस्था करायचा पद्धतशीर प्रयत्न सर्वप्रथम सुरू करून युवक काँग्रेसने इतर पक्षसंघटनांवर निर्विवाद-पणे ताण केली आहे आणि केवळ मदत मिळवून भागणार नाही, ती रिकाम्या पोटात जाते की नाही ते पाहिले पाहिजे यासाठी अनेक कार्यकर्ते जुडले आहेत. तिथे जे कार्यकर्ते पाहिले त्यात बडीबडी धेंडे अशी कुणी नव्हती. कुणी अनिल परळकर, कुणी गजानन शिर्के तर एखादा दीनानाथ कामत वगैरे पाच-पन्नास मंडळी कचेरीतून रजा घेऊन म्हणा किंवा काम संपल्यावर सायंकाळी

म्हणा, काम करत होती.

मुंबईत छावणीसाठी जागा मिळवायची म्हणजे उषाकिरणसारख्या वीस-पंचवीस मजली इमारतीच्या गच्चीवर किंवा समुद्र हटवून तयार केलेल्या जमिनीवरच मिळाली पाहिजे. दोन्ही गोष्टी अशक्य. युवक काँग्रेसवाल्यांनी परळला केंद्र सरकारची टांकसाळीची जागा रिकामी पाहिली. सुमारे पंचवीस हजार चौरस वाराच्या तुकड्यावर बांबू, बारदानं वगैरे आणून टाकून तंबू उभे करायला सुरुवात ! जागेची परवानगी मिळवणे वगैरे भानगडच ठेवली नाही. आरडाओरडा झाला तर पुढे काय ते बघू. टांकसाळवाले विरोध करू लागले तेव्हा जनतेचे काम आहे असे म्हणून दडपून नेले. (यापुढे या 'आक्रमणा'वरून बराच वादंग माजण्याची शक्यता आहे.) कुर्ला स्टेशनवरून चार कुटुंबे आणून ठेवली. कार्यकर्ते अन्नधान्याची मदत मागायला व्यापाऱ्यांकडे गेले. काम सुरू झाले आहे ! हवे तर जाऊन पहा, पण मदत द्या ताबडतोब ! दहा गोणी आटा, तेलाचा ड्रम, बारदानांचे गठ्ठे जमवले. बाँबे गॅस कंपनीकडून दोन गोणी कोळसा घेतला. भाऊ पाटील, अण्णा पाटील, आप्पा येवले वगैरे मंडळी, जिनिंग प्रेसचे मजूर, माथाडी कामगार वगैरेंना घेऊन तंबू बांधू लागले, मदत गोळा करू लागले. भायखळ्याचे भाजीवाले आता अडीचशे किलो भाजी रोज मोफत देतात.

दुष्काळी म्हणून जाहीर झालेल्या गावातून ग्रामपंचायतीचा दाखला आणणाऱ्या कुटुंबांना प्रवेश मिळतो, छापील अर्जावर 'दुसरीकडे काम दिले गेले तर छावणी सोडून जाऊ' असे लिहून घेतले जाते. आता खंडाळ्याला मोठे दुष्काळी काम निघत आहे. तिथे इथल्या लोकांना हलवायचा विचार आहे असे कार्यकर्ते म्हणत होते. सध्या छावणीत साडेसातशे माणसे होती. छावणी सुरू होऊन दोनच दिवस झाले होते. आलेल्या माणसांना दोन वेळचा शिधा द्यायचा. बदल्यात अधिक तंबू बांधण्यासाठी त्यांनी मदत करायची. रिकामे बसायचे नाही. यापुढे सामुदायिक जेवण सुरू करायची योजना होती, त्यासाठी एक मोठी चूल बांधणे चालले होते.

छावणीची क्षमता पाच हजारांपर्यंत वाढवायचा मनोदय व्यक्त केला जात होता. एवढ्या लोकांसाठी पाणी कुठचे असा प्रश्न विचारला. सध्या जवळच्याच एका विहिरीचे पाणी वापरले जात होते. पण स्थानिक लोक छावणीतल्या लोकांना रखडवतात असे एकजण म्हणत होता. तेवढ्यात एक कार्यकर्ता सांगत आला की जवळच्या टेकाडाच्या बाजूने पावसाळ्यात नाला वाहतो. तिथे खणल्यावर पाणी लागले आहे. तिथे मोठा खड्डा करता येईल. अर्थात पाणी कमी पडले तर कॉर्पोरेशनकडून घ्यायचं. कालच मेयर येऊन गेले. त्यांनी काम पाहून आनंद व्यक्त केला. (महापालिकेतर्फे अशीच एखादी छावणी बांधायचा प्लॅन चॉक-आऊट होतोय आणि आता टेंडर्स मागवायला सुरुवात केली आहे असेही ते म्हणाल्याचे कळले.)

कार्यकर्त्यांशी बोलत बोलत छावणीभर हिंडलो. गेल्या वर्षी बांगला देश निर्वासितांच्या छावणीत गेलो होतो त्याची आठवण झाली. ही दुष्काळग्रस्त माणसं निर्वासित होऊन 'जगायला' मुंबईत आली. आपण 'फिरायला जातो', 'प्रवासाला जातो' हे शब्द सहजगत्या वापरतो तसंच हे लोक 'जगायला जातो' हे शब्द वापरतात. दीड महिन्यापूर्वी गांधी स्मारक समितीतर्फे दुष्काळस्त भागाचा सर्व्हे करायचे निमित्ताने सांगली जिल्ह्यातील जत तालुका या सर्वात कोरड्या भागात फिरण्याची संधी मला मिळाली होती. तेथील लोक 'जगायला जाणे' या वाक्प्रचाराबरोबरच 'पोटाची समजूत घालणं' असंही म्हणत. 'प्वारं टचाटचा रडाया लागली तवा बियाचं धान्यबी खाऊन टाकलं पगा! अवं, थोडे दीस पोटाची समजूत घातली, म्होरं काय?' असं तेथील लोक म्हणत. पोटाला आंजारून गोंजारून 'बाबा पोटा, रडू नको, चार दिवसांनी तुला थोडेसे देईन हं!' अशी पोटाची समजूत घालायची, असाच काहीसा प्रकार. एकंदरीत साराच मामला दयनीय. छावणीमध्ये सांगली जिल्ह्याचं कोणी आहे का विचारलं. एक कुटुंब होतं. विठोबा बाहेर गेला होता. विठाबाई पटकन उभी राहिली. थोडं सांगलीचं बोलणं झाल्यावर मुंबईला कशी आलीस हा प्रश्न मी विचारला. म्हणाली की एक कंत्राटदार त्यांना सुरतेला घेऊन गेला. अर्धी मजुरी त्याला द्यायची या अटीवर त्याने सुरतेमध्ये काम दिले. आठ दिवस काम केलं आणि मजुरी मागायला म्हणून हे जोडपे गेले, तो कंत्राटदार पसार झाल्याचे कळले. अर्धीच नव्हे तर—सगळीच्या सगळी मजुरी लाटून तो पार पसार झाला होता. 'मग काय केलेत तुम्ही?' मी अधीरपणे विचारले. म्हणाली एका हॉटेलच्या मागच्या दाराला जाऊन खायला मागितले. दोन दिवस काढले. मग मुंबईचा रस्ता धरला. मी म्हटले, 'गाडीत कोणी पकडले नाही?' म्हणाली की स्टेशनात त्यांना शिरूच दिले नाही. मग चालत निघाले. नवराबायको व तीन पोरं. 'चालत? सुरतहून?' मी विचारले. मग काय करणार, म्हणाली, जीव जगवायला नको? 'विठाबाई, किती दिवस लागले मुंबईला यायला? आणि वाटेत खाल्ले काय?' विचारले. ती म्हणाली की दिवस मोजले नाही पण पंधरावीस दिवस सहज लागले असतील. वाटेत लोकांनी दया येऊन काहीतरी दिलं. काही वेळा फारच थोडे मिळाले, ते पोरांना घातले. आणि दोनदा लागोपाठ चार-चार दिवस उपास काढले. कुर्ल्याला येऊन पडल्यानंतर दुसऱ्या दिवशी छावणीवाले लोक भेटले. आता इथे दोन वेळा खायला मिळतं म्हणाली आणि कृतज्ञतेने कपाळाजवळ दोन्ही हात नेलेन.

औरंगाबाद जिल्ह्यातली बरीच मंडळी दिसली. जालन्याचा एक माणूस रेल्वेतून येताना आपली जी तारांबळ

तूफान

कुर्बानी

आणि

शनवारवाड्यातील शमादान

व. मो. पुरंदरे

यांच्या

तीन

कथांचा

संग्रह

राजहंस प्रकाशन

किंमत : साडेतीन रुपये

झाली ती वर्णन करून सांगत होता. चेकरने हटकले की गाडीतून स्टेशनात उतरायचे. परत दुसऱ्या गाडीत मिळेल त्या डब्यात घुसायचे. कधीकधी गाडीत चढल्यावर कळायचे की बायको मागच्या स्टेशनावर राहिली. मग उलटी गाडी पकडून तिला घ्यायला पुन्हा जायचे. दहा फूट पुढे, पाच फूट मागे असा प्रकार. शेवटी आले मुंबईला. दुसऱ्या एका तंबूत महात्मा ज्योतिबा फुलेंचा चेहेरा मरगळल्यावर कसा दिसेल, तशा चेहेऱ्याचा एक फेटेवाला वृद्ध गृहस्थ दिसला. तो गुलबर्ग्याहून आला होता. त्याला मराठी येत नव्हते. मोडक्या-तोडक्या हिंदीत बोलू लागला. आपल्या ऐंशी वर्षांच्या आयुष्यात आपण असा दुष्काळ पाहिला नव्हता असं म्हणाला. (माझ्या मनात आलं की या वृद्धाने आपल्यापेक्षा एकूणसाठ पावसाळे जास्त काढले आहेत. पण नंतर मी ही चूक लगेच दुरुस्त केली, की त्याने अठ्ठावन्नच पावसाळे जास्त काढले आहेत, कारण यावर्षी त्याचेकडे पावसाळाच नव्हता.) एरवी आतापर्यंत जे दुष्काळ झाले त्यात विहिरींना पाणी नाही असे आतासारखे कधीच झाले नव्हते असे म्हणाला. मी म्हटलं की गुलबर्ग्याहून मुंबईला का आलात ? तो म्हणतो 'सुना, बंबई बडा शहर है और इंदिरा गांधी वहाँ गरीबोंकी देखभाल करती है !' एकंदरीत त्याच्या सांगण्यावरून मला असे वाटले की त्याची समजूत इंदिरा गांधी मुंबईत गरिबांच्या जेवणाची जातीने व्यवस्था करतात अशी असावी. एक मोठीच्या मोठी पंगत बसवून सर्वांना हवं नको विचारून वनस्पती तुपाची धार वाढायला स्वतःहून येत असतील असे त्याला वाटत असावे. नाहीतर तो गुलबर्ग्याहून मुंबईला आला नसता.

तंबूंची आणखी एक ओळ बांधायचं काम जारीने केले जात होते. नुकतेच जुन्या मेणकापडाचे काही गठ्ठे आले होते ते छत म्हणून वापरण्याकरता उलगडणे चालले होते. कार्यकर्त्यांची धावपळ सुरूच होती. तंबू उभा व्हायच्या आधीच एक जोडपे दोन भांडी व तीन मुलांसह येऊन थडकले होते. पाच वर्षांची पोर झोळीतल्या बबनला खेळवत होती. नवराबायको एका परातीत कणीक मळत होती. आजची भाकर तर सुटली ! आज जगायला मिळाले ! !

□ □ □

# विकली जाणारी भारतीय माणसे

सौ. पुष्पा भावे

भारतात अजूनही परदेश म्हणजे इंग्लंड, अमेरिका असे मानण्यात येते. त्यामुळे या देशांचा दौरा करून येणाऱ्या माणसांशी बोलण्याचे, वा त्यांचे बोलणे ऐकण्याचे कुतुहल आता नको तितके शमले आहे. विशेषतः अमेरिकेत स्थायिक होणाऱ्या कुटुंबांकडे फेरफटका मारायला जाणाऱ्या मूर्ख श्रीमंत स्त्रियांचा तर मला वीट आला आहे. अमेरिकेतल्या दुधाच्या चवीचे, आईसक्रीममधल्या घट्ट क्रीमचे, फळांच्या रसाचे वर्णन किती वेळा ऐकायचे ? भारतात रहाणाऱ्या अनेक स्त्रियांनाही या मूर्खपणाचा वारसा मिळालेला आहेच. 'इम्पोर्टेड' वस्तूंच्या मागे धावणाऱ्या या लाचार बायका भारतीय आहेत असे सांगण्याचीही शरम वाटते. हरतऱ्हेचे उत्तम कापड भारतात निर्माण होत असताना परदेशी स्त्रियांचे वापरलेले कपडे महागात विकत घेणाऱ्या या स्त्रियांचा 'स्वर्ग' समुद्रापलीकडे आहे. त्या स्वतःचा आणि स्वतःच्या देशाचा किती अपमान करीत आहेत हे त्यांना उमजत नाही म्हणून त्यांची गोष्ट सोडून देऊ. परंतु शहाणीसुरती माणसे अमेरिकेतील लठ्ठ पगार भारतात मिळत नाही म्हणून कायमची परागंदा होण्यात भूषण मानतात त्यांना काय म्हणायचे ? मला बरीच वर्षे वाटत असे की पाश्चात्यांचे हे आकर्षण आपल्या न्यूनगंडातून निर्माण झाले आहे. कदाचित इतर अनेक देशात आपली माणसे वावरली तर ही 'अपूर्वाई' नाहीशी होईल. आणि म्हणूनच मॉस्को नभोवाणीवर कार्य करणारे नरेन्द्र सिंदकर मुंबईत येणार आहेत असे कळले त्यावेळी काहीशा औत्सुक्याने मी त्यांचे बोलणे ऐकायला, जमल्यास त्यांच्याशी बोलायला, मुंबई मराठी साहित्यसंघात गेले. सिंदकर आपल्या या अनौपचारिक भेटीत लठ्ठ पगारासाठी, सुबत्तेसाठी विकल्या गेलेल्या भारतीय मनाचे प्रात्यक्षिक दाखविणार असे आधी कळले असते, नव्हे संशय जरी आला असता, तरी त्यांचे भाषण मी टेप करून ठेवले असते. तरीसुद्धा त्या संध्याकाळी

(सोमवार दि. ११ डिसेंबर '७२) जे घडले ते उपस्थित नसलेल्या अनेकांना कळावे या हेतूने हे निवेदन करीत आहे.

सिदकरांनी प्रारंभी मॉस्कोच्या ऋतुचक्राची ओळख करून दिली. त्या निमित्ताने रशियात वार्षिक रजा प्रत्येकाला सहजपणे कशी मिळते हे सांगून झाले. नंतर रशियन माणसाच्या चारित्र्याविषयी शिस्त, स्वच्छता इत्यादी सांगून झाल्यावर सिदकर यांनी फार चातुर्याने रशियातील नैतिक वातावरण अमेरिकेपेक्षा नितळ आहे हे सुचविले. ('इथे बॅले असतो कॅबेरे नसतो.') चटकन् समर्थकांची भूमिका घेऊन सिदकर म्हणाले रशियातील वर्तमानपत्रे कंटाळवाणी असतात असा आरोप केला जातो तो खरा नाही : वर्तमानपत्र विकत घ्यायला असणारी रांग हा सिदकरांच्या मते ती कंटाळवाणी नसल्याचा पुरावा! शासनावर टीका करण्याचे स्वातंत्र्य रशियन नागरिकांना नाही हाही आरोप खोटा आहे असे सांगून सिदकरांनी एकपात्री कार्यक्रमातील विनोदाचे उदाहरण दिले...बराच वेळ एखादी परीकथा ऐकावी तसे वाटत होते त्यामुळेच बहुतेक माझ्या पलीकडे बसलेले ज्ञानेश्वर नाडकर्णी अस्वस्थ झाले असावेत. सगळ्यांच्याच मनात असलेला लेखकांच्या आविष्कारस्वातंत्र्याविषयीचा प्रश्न त्यांनी विचारला.'Cancer ward' ही Solzhenitsyn ची नोबेल पारितोषिक विजेती कादंबरी तिथे उपस्थित असलेल्या अनेकांच्या मनात होती. सिदकरांचे उत्तर फार गंमतीचे होते. एक तर त्यांच्या मते 'Cancer ward' ही कादंबरी भिकार आहे! तिला म्हणे रशियाला बदनाम करण्यासाठी नोबेल पारितोषिकाचा मान देण्यात आला! रशियात कोणी या कादंबरीची चर्चा करीत नाही. (सिदकरसाहेब याचा अर्थ तुमच्या ध्यानात आला नाही की तो तुम्हाला लक्षात घ्यावयाचा नाही?) अशोक रानडेंनी सिदकरांना रोखून विचारले—'अहो नोबेल पारितोषिक मिळण्यापूर्वी पास्टरनाकचा जो छळ झाला त्याचे काय?' या प्रश्नाला सिदकरांकडे उत्तर नव्हते. रशियन स्पष्टीकरण म्हणून त्यांनी जे सांगितले ते फारच विचित्र होते. फार परिश्रमाने बांधलेल्या समाजरचनेवरचे संकट म्हणून काही ग्रंथांवर बंधने लादली जातात वा लेखकांना शिक्षा केली जाते, असे ते स्पष्टीकरण. नाडकर्णींनी लगेच विचारले—'अहो एका पुस्तकाने समाजरचनेवर संकट कसे येईल?' या प्रश्नाला स्पष्ट उत्तर देण्याचे टाळून सिदकरांनी 'सखाराम बाइंडर'चा प्रश्न जणू काही तसाच आहे असे भासवून विषयांतर केले. स्वतः केलेले विषयांतर हे विषयांतर आहे असे म्हणून लेखकांच्या विचारस्वातंत्र्याचा, आविष्कारस्वातंत्र्याचा प्रश्न डावलून रशियात अन्न स्वस्त आहे, हिप्पी युरोपात असतात रशियात नसतात, अशी विधाने करून रशियास्तवन पुढे चालू केले. अन्न, वस्त्र, निवारा प्रत्येकाला मिळेल अशी सोय झाल्यावर कशाला हिप्पी निर्माण

होतील असाही प्रश्न त्यांनी सभेपुढे टाकला. (सिंदकरसाहेब, हिप्पी हा संपन्न देशाचा प्रश्न आहे, शरीर गरजांच्या पलीकडचे मानसिक परिमाण त्या प्रश्नाला आहे हे आपल्याला माहीत नाही काय ?) सिंदकरसाहेब म्हणाले– 'एक सोव्हिएत नागरीक (!!!) म्हणून तुम्हाला सांगतो रशियन मनुष्य सुखी आहे. सुखी माणसाचा सदरा शोधायचा असेल तर रशियात ढीगच्या ढीग तुम्हाला मिळतील. परवा दि. के. बेडेकर आले होते ते म्हणाले रशियात विचारस्वातंत्र्य नाही पण मी विचारतो किती लोकांना हवे आहे विचार-स्वातंत्र्य ? अन्न-वस्त्र-निवारा मिळाला की दुःखाचा अभाव म्हणजे सुख मिळेलच. खरं सांगू भारताला रशियन पद्धतीशिवाय गत्यंतर नाही.'

सिंदकरसाहेब, तुम्हाला एक सांगू का ? माणूस सुखी माणसाचा सदरा शोधतो–अन्न-वस्त्र-निवारा म्हणजे सुख ही तर पशुकल्पना. त्यांना सदरा हवाच कशाला ? भारत गरीब आहे, बेशिस्त आहे परंतु तो तसा आहे हे म्हणण्याचे स्वातंत्र्य आम्हाला आहे आणि ते महत्त्वाचे आहे. रशियातील समृद्धीची प्रलोभने दाखवून तीच राष्ट्रपद्धती आणि समाजव्यवस्था अपरिहार्य आहे असे सांगताना जणू काही विचार करणे ही चैन आहे असे तुम्ही भासवलेत ते खरे नाही. सिंदकरसाहेब, आम्ही भारतीय आहोत आम्ही ना रशियाचे ना अमेरिकेचे. तुमच्यासमोर बसलेल्या अमेरिकेच्या पक्षपात्यांना रशियाचे श्रेष्ठत्व पटवून द्यायचे अशा पावित्र्यात तुम्ही सतत का बोलत होतात ? की रशियात नोकरी करणाऱ्याला प्रत्येकाला ही भूमिका घ्यावी लागते ? या भयानक चुका करण्याचेही स्वातंत्र्य तुम्हाला या भारताने दिले ते तुम्ही कधीतरी विचार करायला शिकावे म्हणून. पण एक लक्षात ठेवा असे कितीही सिंदकर रशियाचे लाचार झाले वा दुसरे अनेक अमेरिकेचे लाचार झाले तरी हा देश लाचार होणार नाही.

मध्यमवर्गीय सुस्थिती लाभूनही सुबत्तेकडे धावत सुटणारे तुमच्यासारखे हपापलेले या देशात अनेक आहेत; पण त्याहूनही अधिक आपल्या गरिबीतही मनातील ठिणगी जपणारे आहेत. भारतीय लोकशाहीचे हे यश तुम्ही झाकू शकणार नाही. तुम्ही तुमच्या भाषणाच्या प्रारंभी म्हणालात की थंडीमध्येही ओव्हरकोट न चढवता विमानातून खाली उतरण्यात तुम्ही महाराष्ट्राची अस्मिता राखलीत. त्यापेक्षा मॉस्कोतील हिकमती प्रचाराचे बळी न होण्यासाठी काही प्रयत्न केले केले असतेत तर ?

वाचकहो, हा लेख अनाठायी कडक आहे असे तुम्हाला वाटेल. परंतु प्रत्यक्ष स्पष्ट न बोलता सूचितार्थाचे अस्तर वापरणारे हे प्रचारक फारधोकादायक असतात. सिंदकरांच्या व्याख्यानाचे सार पाहता त्यामागील कृष्णतर्क सहज ध्यानात येईल. राजकारण हा माझा प्रांत नाही. अमेरिका, रशिया यापैकी कोणाही एकाला आंधळेपणाने मित्र मानावे असे मला वाटत नाही. (या

ठिकाणी श्री. ज्ञानेश्वर नाडकर्णी यांनी या चर्चेत व ‘ Times of India ’च्या पत्रव्यवहारात व्यक्त केलेल्या मताला दुजोरा देणे आवश्यक आहे : परदेशी चित्रपटावर बंदी घालताना त्यामध्ये राजकीय मैत्रीचे सूत्र असू नये.) परंतु स्वतःच्या देशाला हीन लेखून दुसऱ्या कोणत्याही एका देशात सोने आहे असे म्हणणारे हे सारे सुखवादी त्यांच्या सुखाची गाठोडी परदेशी ठेवून काही वर्षांनी निर्वासित म्हणून इथेच परत येतात हा इतिहास आपण पुन्हा पुन्हा का विसरतो ? परदेशी जाणाऱ्या सांस्कृतिक मंडळींशी संपर्क असणारे अनेक सांगतात की, तिथे गेल्यावर मद्य, कॅबेरे, खरेदी याशिवाय दुसरे काही भारतीयांना सुचत नाही. ही लाचारी, हा हपापलेपणा आणि त्यातून स्वतःला विकणे ! निळीतल्या कोल्हयासारखे सर्वांना मजसारखे व्हा असे ओरडून सांगणे बंद करण्याची वेळ आली आहे. अर्थात् बंधन, जबरदस्ती हा भारताचा मार्ग नाही. परंतु सामाजिक वातावरणातच आपण अशी जाणीव निर्माण केली पाहिजे की, ज्यामुळे ‘ मुलगा परदेशी स्थायिक झाला आहे ’ असे सांगताना मान खाली जाईल; साडी वा प्रसाधने इंपोर्टेड आहेत असे सांगायला जीभ धजावणार नाही; गोड भाषेत गुलामगिरीचे स्तोत्र गाणाऱ्या सिदकरांसारख्यांना समोरच्या माणसांच्या कुत्सित नजरेचा भाला निश्चित रोखेल.

याचा अर्थ असा नाही की, आपण स्वमग्न, स्वतुष्ट असावे. जपान, जर्मनी, फ्रान्स, रशिया, अमेरिका, इस्रायल अशा अनेक देशांकडून आपण काही शिकावे असे निश्चित आहे. असे चोवीस गुरु अवश्य करावे. परंतु गुरूपुढे पिकदाणी धरणारा शिष्य आज कालबाहय झाला आहे. स्वतःच्या प्रज्ञेने वादविवाद करणारा शिष्यच अधिक विद्या मिळवू शकतो. अशी विद्या मिळवायला तो स्वतः मनाने स्वतंत्र असावा लागतो. भारताला स्वातंत्र्य मिळून पंचवीस वर्षे झाली तरी आपली ही गुलामगिरी संपूर्ण नष्ट होत नाही हेच खरे दुःख आहे. आपल्या पूर्वजांनी स्वर्ग हे स्थळ मानण्याची चूक केली; आपणही तीच करीत आहोत : फक्त आपला स्वर्ग समुद्रापलीकडे स्वदेशाबाहेर आहे.

आम्हाला जे काही हवे आहे ते या भूमीवर, विचारस्वातंत्र्याचे मुक्त वारे असणाऱ्या या लोकशाहीत, हवे आहे ही निष्ठा आपण बाळगली तरच भारताच्या स्वतंत्र नागरिकाला खरे उदार आणि निर्भर व्यक्तिमत्त्व प्राप्त होईल. नाही तर स्वातंत्र्याचे वारे अनेक वर्षे भारतात वाहिले तरी आपण मनाने निर्वासितच राहू !

□ □ □

मोजक्या शब्दात सांगायचे म्हणजे बांगला देशातील घटनांचीच आसाममध्येही उजळणी होत आहे. पण त्याची प्रतिक्रिया अन्यत्र उमटू नये म्हणून दोन्ही राज्यांकडून अत्यंत दक्षता घेतली जात आहे.

# प्रवासी बंगाली

सौ. तारा पंडित

जेथे राष्ट्रगीत गाण्याची मनाई असावी असा एखादा प्रदेश भारतात असू शकतो काय ? पण आहे, असा प्रदेश आहे अन् त्याचं नाव आहे आसाम. आसाममध्ये जनगणमन हे राष्ट्रगीत फक्त सरकारी समारंभाचे वेळीच जेमतेम गायलं जातं. एरवी कोणत्याही सांस्कृतिक कार्यक्रमांचे वेळी जनगणमन गाण्यास हरकत घेतली जाते. त्याऐवजी

'ओ मो आपोनार देश, ओ मी सिकोनी देश' हेच गीत गाण्याचा अट्टाहास केला जातो आसामच्या दृष्टिकोनातून आसामचे खरे राष्ट्रगीत तेच आहे. जनगणमन नव्हे.

हे ऐकून तर आश्चर्यच वाटलं. आसाममध्ये वर्षानुवर्ष वास्तव्य करून असणाऱ्यांनी–प्रवासी बंगाली लोकांनी हे सांगितलं. प्रवासी बंगाली ?...होय, हा एक नवाच शब्दप्रयोग आहे, अलीकडचे अस्तित्वात आलेला. हे प्रवासी बंगाली म्हणजे अनेक वर्षांपासून कदाचित अनेक पिढ्यांपासून सुद्धा आसाममध्ये स्थायिक झालेले बंगाली लोक, पण अलीकडे ऑक्टोबरपासून भाषा-आंदोलनाने सुरू झालेली दंगल माजली त्या दंगलीत बंगाली लोकांचा वाटेल तसा छळ झाला आणि परिणामतः तेथे राहणं असह्य झालं म्हणून म्हणा किंवा तेथील मूळ रहिवाशांकडून हाकलून देण्यात आलं म्हणून म्हणा इकडे पळून आलेले हे बंगाली लोक–! साधारणतः अशा तऱ्हेने पळून आलेल्यांसाठी निर्वासित हा एक शब्द वापरला जातो. पण हे लोक स्वतःला निर्वासित म्हणवून घ्यायला तयार नाहीत. आईच्या घरी का कोणी निर्वासित म्हणून येतो ? काही झालं तरी बंगाल म्हणजे कोणाही बंगाली माणसाची मातृभूमी. तेथे

केव्हाही आणि कशाही परिस्थितीत आलेला माणूस हा निर्वासित नव्हेच. अन् म्हणूनच तो झाला 'प्रवासी बंगाली.'

खरं म्हणजे आसाममध्ये भारताचं राष्ट्रगीत गाण्यास हरकतच का घेतली जावी ? याचं कारण असं तर नाही ना की ह्या गीताचा रचनाकार एक बंगाली माणूस होता अन् आज आसाम तर बंगाली लोकांच्या द्वेषाने पेटलेला आहे ! तसं नसावं, कारण १९६६ साली तर शांतता होती. सारेजण खेळीमेळीने राहत होते. पण त्यावेळी सुद्धा एका कॉलेजात स्नेहसंमेलनाचे वेळी आसामचे स्वतंत्र राष्ट्रगीतच म्हणण्यात आले. जनगणमन ह्या गीताला अजिबात फाटा देण्यात आला. मग राष्ट्रगीतावर रोष असण्याचं कारण तरी काय ? असं तर नाही ना की त्या गीतातील पुढील ओळीमध्ये अनेक प्रांतांच्या नावाचा आवर्जून उल्लेख आहे 'पंजाब, सिंध, गुजरात, मराठा, द्राविड, उत्कल, वंग' त्यात आसामचा नामनिर्देशच नाही व म्हणून तर त्या गीताबद्दलची आत्मीयतेची भावना नष्ट झाली नसेल ना ?

माणूस एकदा तर्कुतर्क करू लागला की त्याची मर्यादा कुठपर्यंत जाईल याचा नेम नसतो. काही आसामी लोकांच्या मते तर जनगणमन ह्या गीताचा मूळ रचनाकार आसामी माणूस असून गुरुदेव रविंद्रांनी वाङ्मय चौर्य केलं आणि त्यातील 'आसाम' ही अक्षरे वगळून ते गीत स्वतःच्या नावाने प्रसिद्ध केलं.

युक्तिवादाने लढवलेलं कारण कोणतंही असो, आसामध्ये आसामचं स्पेशल राष्ट्रगीत आहे ही गोष्ट खरी. त्याचप्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रमांचे वेळी आसामी व्यतिरिक्त लोकांनी सुद्धा आसामी ड्रेस वापरला पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. पुरुषांनी 'चुडिया पंजाबी' म्हणजे झब्बा आणि धोतर हेच वापरायचे पण नेसण्याची पद्धत थोडी वेगळी आणि स्त्रियांनी 'मेघला' हा खास आसामी पोषाक चढवायचा.

ता. ५ ऑक्टोबरपासून जे काही आसाममध्ये घडत आलं (नि घडत आहे) त्याच्या मुळाशी नेमकं कोणतं कारण असावं ? ह्या प्रश्नाचं निश्चित उत्तर मिळणं कठीण आहे. तेथील लोकांना आसामी भाषेचा अवास्तव अभिमान आहे की काय ? मग आजवर अन्यभाषीय लोक तेथे कसे रहात आले ? अजूनही बिगर-आसामी लोकांपैकी फक्त बंगाली लोकांवरच वाईट प्रसंग आल्याचं ऐकू येतं. बंगाली व्यतिरिक्त असणाऱ्या परभाषिक लोकांना असा विशेष छळ सहन करावा लागलेला नाही. याचा अर्थ आसामी लोकांचा रोख फक्त बंगाल्यांवरच असावा. त्यातही अत्यंत श्रीमंत बंगाली लोक आणि प्रौढ बंगाली लोक अजूनही निवून आलेले नाहीत. यावरून आसामी लोकांना बंगाली तरुण पिढीचा राग आहे. त्यातही मध्यमवर्गीय विद्यार्थी लोकांचाच असा निष्कर्ष निघतो.

तेथे सर्वप्रथम हल्ला झाला तो मेडिकल कॉलेजांवर—होस्टेलमध्ये राहणाऱ्या

विद्यार्थी-विद्यार्थिनींवर. तरुणींवर बलात्कार आणि तरुणांना जीवघेणी मारहाण...त्यानंतर द्वेषाने जळणाऱ्या आसामी माणसांनी नजर वळवली प्रोफेसर आणि डॉक्टर मंडळींवर. प्रिन्सिपल या कुणालाच संरक्षण देऊ शकले नाहीत. जेथे बंगाली समाज जास्त असेल अशाच विभागात अधिक धुमाकूळ माजला. शेकडो विद्यार्थी आणि तरुण माणसे ह्यांनी बंगालकडे धाव घेतली. मुख्यमंत्र्यांनी त्यांना आसरा दिला आणि भारत सेवाश्रम संघ त्यांच्या खाण्यापिण्याची सोय करीत आहे.

आसामचे मुख्यमंत्री श्री. शरच्चंद्र सिन्हा कलकत्त्याला आले. श्री. सिद्धार्थ शंकर रे बरोबर त्यांची बोलणी झाली. मात्र ती कोणालाच कळली नाहीत. आता श्री. सिन्हा इकडे निघून आलेल्या विद्यार्थ्यांना–प्रवासी बंगाली विद्यार्थ्यांना तिकडे बोलावीत आहेत. पण ह्याच वेळी त्यांच्या नातलगांकडून गोहाटी-वरून ह्या विद्यार्थ्यांना तार येते की अजून परिस्थिती निवळली नाही, तुम्ही येऊ नका. ही दोन्ही परस्परविरोधी विधाने. ह्या प्रवासी बंगाली विद्यार्थ्यांनी निर्णय तरी कसा घ्यावा ?

अंतःकरणात द्वेषाचं बी एकदा पेरलं गेलं की अल्पावधीतच त्याचा वटवृक्ष होतो. आसामी लोकांनी हळूहळू बंगाली लोकांना ठेचून टाकण्याचे प्रयत्न कधी-चेच सुरू केले होते. १९७१ मध्ये एकदा एकाएकी बंगाली सिनेमांवर बहिष्कार टाकण्यात आला, परंतु दोन महिन्यांनी एका आसामी क्लबनेच पुढाकार घेऊन सिनेमा सुरू केला. पण पुन्हा तो बंद पडलाच. रेडिओ प्रोग्रामबाबतही तेच. सर्व बंगाली कार्यक्रम रद्द केले गेले. अलीकडे दंगल माजल्यानतर जखमी झालेल्या बंगाली माणसाला आसामी डॉक्टर उपचार करण्यास तयार नसत आणि तेथील सर्व डॉक्टर मारहाणीत स्वतःच जखमी झालेले आहेत किंवा इकडे निघून तरी आलेले आहेत. तेथील पेशंट्स् शोचनीय अवस्थेत दिवस काढीत असावेत.

आता येथील छात्रपरिषदेच्या विद्यार्थ्यांनी ‘ प्रवासी बंगाली संग्राम कमिटी ’ स्थापन केली आहे. त्यांनी सध्या साडे-तीनशे विद्यार्थ्यांची जबाबदारी स्वीकारली आहे. शिवाय रोज २५ ते ५० विद्यार्थ्यांची भर पडत असतेच. ह्यांची सोय करणं, त्यांच्यासाठी निधी जमवणं इत्यादी कामे ही कमिटी करीत आहे. ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यातील एकूण तीस हजार लोक ह्या दंगलीत सापडले असून ५ हजार लोक नागालँडमध्ये आश्रय घेत आहेत. (ही आकडेवारी अधिकृत कमिटीने प्रसिद्ध केलेली आहे.) इथे आश्रयार्थ आलेले विद्यार्थी रोज वेगवेगळ्या शैक्षणिक संस्थांमधून हिंडून प्रत्यक्ष पाहिलेल्या वा अनुभवलेल्या घटनांविषयी माहिती सांगून लोकमत जागृत करीत आहेत. कारण त्या अत्याचारांना कोणत्याही प्रकारे वाचा फुटलेली नाही. स्वतःच सर्व परिस्थिती कथन करणं हे आमचं कर्तव्य आहे असे ते म्हणतात.

□ □ □

# आ ले पा क

■ एका वर्तमानपत्रातील बातमी : ऑस्ट्रेलियाची वीस वर्षे वयाची बेलिंडा ग्रीन या नावाची गोरीपान तरुणी जागतिक सौंदर्यस्पर्धेत काल रात्री पहिली आली.

या बातमीतील 'गोरीपान' आणि 'रात्री' या शब्दांची येथे काय गरज होती ते मला नेमके उमगले नाही.

■ एक मत : नाटकात जाऊन अनेकजण बिघडतात.

सेन्सॉर बोर्डाला (हाय—हाय--) वाटते नाटकाला जाऊनसुद्धा अनेकजण बिघडतात.

■ १९५१–५२ मध्ये केंद्रीय मंत्र्यांच्या दौऱ्यापायी २ लाख ३२ हजार रुपये खर्च झाले होते; १९७०–७१ मध्ये हा आकडा १८ लाख ८९ हजारापर्यंत वाढला; आणि १९७१–७२ मध्ये दौऱ्यापायी मंत्र्यांनी ३६ लाख ३८ हजार रुपये खर्च केले.

उत्तरोत्तर होत गेलेल्या भारताच्या प्रगतीचा हा आलेख पाहून माझे हृदय कसे भरून येते !

■ मुंबईतील एका महाविद्यालयात आयोजिलेल्या काव्यवाचनप्रसंगी प्रा. शंकर वैद्य म्हणाले : केवळ दाद घेणाऱ्या ओळी लिहून कविसंमेलनें गाजवायची एक घातुक फॅशन प्रचलित होऊ पाहतेय.

घातुक तर काय. कारण त्यामुळे खरे कवी कोण आणि कावळे कोण हे समजणे अंमळ अवघड आहे.

■ पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या नुकत्याच झालेल्या एका परीक्षेत, हॉलिवूडमधील सर्वश्रेष्ठ नटनटी कोण ? जॅकेलिन ओनॅसिसची नग्न छायाचित्रे प्रसिद्ध केलेल्या मासिकाचे नाव काय ? वगैरे प्रश्न विचारण्यात आले होते.

बरोबरच आहे. पब्लिक सर्व्हिस करायची म्हणजे असली माहिती असायला हवीच.

■ रेल्वेच्या मालमत्तेचे नुकसान होऊ नये म्हणून 'रेल्वे ही तुमची मालमत्ता आहे' अशा आशयाचे फलक प्रत्येक रेल्वे स्थानकावर लावण्यात यावे असे सभापती लोकसभेत म्हणाले. त्यावर इंद्रजित गुप्तांनी शंका व्यक्त केली की 'ही तुमची मालमत्ता आहे' असे सांगितल्यास लोक ती घेऊन जातील.

फलक कोणतेही लावले तरी लोक करायचे ते करणारच. त्यामुळे स्थानकावर 'ही तुमच्या बापाची मालमत्ता आहे' असे फलक का लावू नयेत ?

■ कायदा खात्याचे राज्यमंत्री नीतिराज सिंग यांनी लोकसभेत सांगितले की

लग्नाची किमान वयोमर्यादा वाढवण्याबाबत सरकार विचार करत आहे.

निरोधचा खप वाढवण्याची ही युक्ती कोणाला सुचली असती काय ?

■ बाळ कोल्हटकरांच्या 'वाहतो ही दुर्वांची जुडी' या नाटकाचे आत्तापर्यंत ८०० प्रयोग झाले. कोल्हटकरांच्या याच एका नाटकाला मोठे यश मिळाले आहे असे नव्हे : त्यांच्या 'वेगळं व्हायचंय मला'चे ६५०, 'दुरितांचे तिमिर जावो'चे ५५०, 'मुंबईची माणसं'चे ५०० प्रयोग झाले आहेत.

एखाद्याचे नशीब, दुसरे काय !

■ बाळ कोल्हटकरांचे कौतुक करताना एक टीकाकार म्हणतात : कोल्हटकरांना स्वतःला इंग्रजी फारसे येत नसल्यामुळे साहेबाची नाटके चोरून आपली म्हणून खपवण्याचा उद्योग त्यांनी कधी केला नाही.

पण हा उद्योग ज्यांनी केला त्यांनासुद्धा इंग्रजी फारसे कुठे येत होते हो ?

■ 'दुर्वांची जुडी' ही नाटचसंस्था बाळ कोल्हटकरांची आहे : मालक बाळ, नाटककार बाळ, दिग्दर्शक बाळ, आणि प्रमुख नटही बाळ !

आणि प्रेक्षकसुद्धा बाळच !

■ सुप्रसिद्ध पुणेरी विद्वान (ही थोडी द्विरुक्तीच झाली) प्रा. डॉ. रामचंद्र शंकर वाळिंबे एका व्याख्यानात म्हणाले खाडिलकरांच्या 'भाऊबंदकी'तला रामशास्त्री म्हणजे टिळक अशी जनतेची भावना बनून गेली होती. उद्या एखाद्या इतिहाससंशोधकाने रामशास्त्र्यांसंबंधी शोध लावून ते प्रथम साधे भिक्षुक होते, मग एक सामान्य न्यायाधीश झाले; निस्पृहता अगर निर्भीडपणा हे गुण त्यांच्यात नव्हते असे जरी टाहो फोडून सांगितले तरी जनता त्याचे ऐकणार नाही. ती म्हणेल खाडिलकरांनी उभे केलेले रामशास्त्री हेच खरे रामशास्त्री !

हे व्याख्यान लावणारे वाळिंबेसुद्धा रामशास्त्रीच की !

■ इंदिरा गांधींचे चिरंजीव संजय गांधी ११३०० रुपयांची स्वस्त जनता मोटार तयार करणार असून ती १ एप्रिलला बाजारात येईल. तिचे नाव 'मारुती' असे ठेवलेले आहे.

'मारुती' ऐवजी तिचे नाव अगदी 'मालती' ठेवले तरी १ एप्रिलच्या मुहूर्तावर आपण काही ती मोटार घेणार नाही. □

## सखारामायण

'सखाराम बाईंडर' हे नाटक सर्वांना माहीत आहे. त्या नाटकाचे लेखक, कमळांच्या तळ्यात चिखल पाहणारे चिवडणारे, विजय तेंडुलकर यांनादेखील सारे ओळखतात. गेल्या वर्षी हे नाटक (सा)रंगभूमीवर आले आणि त्याने अभूतपूर्व धमाल उडवली. काही काळ 'सखाराम बाईंडर' शिवाय बोलायला

दुसरा चविष्ट विषय नाही अशी परिस्थिती निर्माण झाली होती. पुढे प्रकरण न्यायालयात गेले. पुष्कळ वेळ चाललेला स्टोव्ह विझल्यावर होते तशी शांतता सगळीकडे झाली

न्यायदेवतेवर माझा पहिल्यापासून फार विश्वास आहे. त्यामुळे या वादावर काही बिनतोड तोडगा आता निघेल असे मला वाटत होते. पण परवा लागलेला निकाल पाहिला आणि चकित झालो. चक्क आम्हाला न रुचणारा, आणि म्हणून न पटणारा, निर्णय देऊन न्यायमूर्ती मोकळे : 'सखाराम बाईंडर' नाटक त्यांनी मोकळे केले : त्यांना म्हणे ते गंभीर नाटक वाटले. न्यायमूर्ती झाले म्हणून गंभीर कशाला म्हणावे हे निश्चित समजेल असे थोडेच आहे. आपल्या निर्णयाने त्यांनी रंगमंचाला रंगपर्यंक, रंगपलंग बनवून टाकले. त्या ठिकाणी सगळ्या चंपा–सखारामांच्या विकृत कामक्रीडांचे जाहीर प्रयोग होतील : आपल्या सुशीतल आसनांवरून प्रेक्षकही पलीकडची आसने पाहतील.

हे जे काही होऊ घातले आहे त्याचा कोणी विचार करणार आहे की नाही ? का तो मीच एकट्याने करावा अशी त्या नटराजाची इच्छा आहे ? मला तरी तसेच वाटते : म्हणून 'सखाराम बाईंडर' सुटल्यामुळे कोणालाही कितीही आनंद होवो; आमच्या पोटात त्यामुळे दुखू लागले हे येथे निर्भीडपणे सांगितलेच पाहिजे.

आम्ही 'सखाराम बाईंडर'कडे मर्यादित आणि व्यापक अशा दोन्ही दृष्टिकोनातून पाहतो. मर्यादित, म्हणजे केवळ एक नाटक या दृष्टिकोनातून पाहिल्यास 'सखाराम बाईंडर' आम्हाला थिटे वाटते. कारण कोणत्याही जिवंत नाटककाराचे नाटक थोर असत नाही असा आमचा एक नाट्यसिद्धांत आहे व्यापक, म्हणजे मराठी रंगभूमीच्या विकासविचाराच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास हे नाटक ही मराठी रंगभूमीची नंगभूमी वा अनंगभूमी करून टाकणाऱ्या विद्रूप अपप्रवृत्तींची पहिली खेळी आहे असे आम्ही मानतो. किर्लोस्कर-देवल खाडिलकर गडकरी; सुभद्रा-शारदा-रुक्मिणी-सिंधू; भाऊराव-नारायणराव-गणपतराव-केशवराव यांनी ऐश्वर्यशालिनी केलेल्या मराठी रंगभूमीची अभद्र विटंबना करण्यासाठीच 'सखाराम बाईंडर' मोकळे झाले आहे.

एवढे सारे सखारामायण सांगितल्यावर आता एकाच गोष्टीचा उल्लेख करायचा आहे. गोष्ट तशी मामुली, फुटकळ, जुजबी आणि नगण्यच आहे. खरे तर ती प्रस्तुत विषयाशी अप्रस्तुतदेखील आहे.

ती गोष्ट स्वतःला सांगायची गरज आम्हाला वाटत नाही; पण तुम्हाला म्हणून सांगतो : आम्ही 'सखाराम बाईंडर पाहिलेले नाही.

—अनंतराव



एस. ए. अय्यर
२० नगीन महाल,
वीर नरिमन रोड, मुंबई २०

## जबानी तिसरी । हप्ता तिसरा

लेखक : नारायण सान्याल

अनुवादक : अशोक शहाणे

आबिदच्या न् नेताजींच्या स्वभावात वरंचसं साम्य आहे. आबिद भलताच धाडसी न् अत्यंत आशावादी होता. शिवाय देश स्वतंत्र करायच्या अनिवार इच्छेने त्याचं मन झपाटलेलं. आत्माहुति द्यायच्या नशेत तो नेताजींचा आदर्श शिष्य होता. अन् प्राणी पाळायचा उत्साह त्याला पण प्रचंड होता. फक्त एका बाबतीत दोघांचे स्वभाव एवढेसुद्धा जुळायचे नाहीत. नेताजींना मांजर अजिबातच सहन व्हायचं नाही अन् आबिदसारखा मांजरप्रेमी मी तरी काही पाह्यलेला नाही.

नेताजींच्या प्राणीसंग्रहालयातले जसं नेताजींच्यावर प्रेम करायचे, तसाच

चालू लेखमाला

# मी नेताजींना बघितलंय्

आबिदपण त्यांना फार पसंत पडायचा. फुरसत मिळाली रे मिळाली की आबिद प्राण्यांच्याकडे वळलाच. तो त्यांना आपल्या हातानं खाऊपिऊ घालायचा, आंघोळ घालायचा.

आबिदला दुःख फक्त एकच होतं की आपल्या ह्या प्राणी संग्रहालयात काही मांजर मात्र नाही.

आता मी जेव्हाची गोष्ट सांगतोय्, तेव्हा नेताजींच्या बंगल्यात त्यांच्याबरोबर आम्ही तिघं रहात होतो. रावत, आबिद न् मी.

एक दिवस बघितलं, आबिदच्या दोन्ही बंगल्यात मांजराची दोन पिल्लं. कुठनं आणली होती कुणास ठाऊक. आता मी काही मांजरांचा शौकीन नाही. पण मलादेखील कबूलच करायला हवं की दोन्ही पिल्लं दिसायला भलतीच गोजिरवाणी होती. दुधासारखा पांढरा शुभ्र रंग, मधनंमधनं बदामी रंगाचे ठिपके. केसांनी भरलेलं सबंध अंग.

पण ते काहीही असलं तरी ते म्हंजे ब्राह्मणाच्या घरात निषिद्ध कोंबडी आणल्यासारखंच की !

म्हणून म्हणालो—आबिद ! हे काय केलंस रे बाबा ! नेताजींना कळलं म्हंजे—

आबिदनं ओठावर बोट ठेवलं.

म्हणाला नेताजींना कळायचंच नाही. तसं मी सगळ्यांना सांगून ठेवलंय्.

तुम्हीपण फट्किनी बोलू नका हं.

मी म्हणालो--मी कशाला आग लावायला जातोय् रे! पण ह्यांचं म्याव-म्याव कसंकाय संभाळणार ?

आबिद गांगरला. म्हणाला--नाही नाही, 'म्याव' नाही, फक्त 'म्यूं'! आत्ताशी कुठं डोळे फुटलेयत! मी खोलीची अदलाबदल करतोय् राव-तांच्याबरोबर! अगदी टोकाच्या त्या कोपऱ्यातल्या त्या खोलीत जातोय् मी! तिथनं काही ह्या दुधाच्या बच्च्यांचं 'म्यूं' नेताजींच्या कानावर जायचं नाही!

ह्याच्यापेक्षा आबिदनं दोन ब्रिटिश गुप्तहेरांना जरी आसरा दिला असता तरी चाललं असतं. आबिद दिवसभर काम करायचा, पण त्याचा एक डोळा ह्या दोन पिल्लांच्यावर असायचा. एक डोळा कामावर न् एक डोळा पिल्लांच्यावर. ह्या तारांबळीत आबिद बिचारा मधनंमधनं तिरळाच वाटायचा!

मुश्कील अशी होती की ह्या सगळ्या खोल्यांची दारं प्रचंड मोठ्ठी होती. अन् ती परत दिवसभर उघडीच असायची. शिवाय सगळी दारं म्हंजे स्विंगिंग डोअर. ती दोन्ही पिल्लं बघता-बघता स्विंगिंग डोअरच्या खालनं बाहेर पडायची. मग सगळं काम टाकून आबिद धावायचा त्यांच्यामागं. अन् धरून घेऊन यायचा त्यांना परत.

आबिदला पेशन्स मात्र अगदी बेहद्द होता. कारण असेच काही महिने काढलेन् की त्यानं त्या पिल्लांना लपवून लपवून. नेताजींच्या नजरेला पडू न देता.

एकदा खोटेपणा केला की मग कायमच खोट्याचा आसरा घ्यावा लागतो. तसंच झालं!

एकदिवस आम्ही जेवायला बसलो होतो. सगळ्यांना दूध दिलं. आबिदला मात्र नाही.

नेताजींनी विचारलं--काली, आबिदभाई को दूध क्यूं नही दिया ?

काली आपला डोकं खाजवत राह्यला.

आबिदला घाम फुटला. तो त-त-प-प करायला लागला.

सरतेशेवटी मला वेळ मारून न्यावी लागली.

--आबिदचं दूध त्याच्या खोलीतच ठेवतो काली. झोपायच्या आधी दूध घेतो आबिद!

जेवण झाल्यावर आबिदनं मला बाजूला घेतलं. त्यानं माझे दोन्ही हात धरले. म्हणाला--आज वाचवलंत तुम्ही मला. नाहीतर मी सापडलो होतो पक्का!

पण सापडावंच लागलं त्याला एक-दिवस! लागणारच की! मला ठाऊकच होतं! खोटं काही कायम झाकून रहात नाही. आमचा सगळा कट एकदिवस उघडकीला आला. दरम्यान आबिदच्या वाट्याचं दूध पिऊन-पिऊन 'म्यू'चं आता चक्क 'म्याव' झालं होतं.

संध्याकाळची वेळ. नेताजींनी आबिदला काहीतरी महत्त्वाचं काम दिलं होतं. तो तेच करत होता.

त्यामुळे स्विंगिंग डोअरच्या खालनं

मांजरांची जोडगोळी दिग्विजयाकरता कधी बाहेर पडली, त्याच्या लक्षातच आलं नाही.

लांबलचक पॅसेज काहीएक अडथळा न येता ओलांडला की त्यांनी! जणू दोन पॅटन टँक्सच चालले होते!

पॅसेजच्या टोकाला एका खोलीत टेबललॅंप जळत होता. हे नवीन राज्य जिंकून घेतलं तर कसंकाय, असा विचार त्या दोघा वीरांच्या डोक्यात आला.

स्विंगिंग डोअरच्या खालनं दोघा विजेत्यांनी त्या खोलीत प्रवेश केला. खोली रिकामी. फक्त एका टेबलाशी कुणीतरी एक गोरा-गोरा इसम टेबल-लँपच्या उजेडात पत्र लिहितोय्. ह्या नव्या विजेत्यांनी बराचवेळ त्या इसमाचं लांबनंच निरीक्षण केलं. ह्या घरात काही ह्या अजब माणसाला कधी पाह्यलं नाही ते!

कुतूहलानं ती दोघं टेबलाच्या जवळ आली. त्या इसमाला बारकाईनं बघण्या-करता. जवळून बघितल्यावरदेखील त्याची ओळख काही लागेना.

दोघंही उडी मारून टेबलावर चढली.

मांजरं असतात आवाज न करता हालचाल करणारी, नेताजी पण आप-ल्याच विचारात बुडून गेलेले. आता इतके ते कुठल्या आध्यात्मिक ग्रंथात बुडून गेले होते वा लढाईची काही योजना आखण्यात गुंगून गेले होते, देव जाणे!

आता बहुतेक त्या दिग्विजयी वीरांच्या मानालाच धक्का बसला. इतकं जवळ आल्यावरदेखील हा अनोळखी इसम आपल्याकडे ढुंकूनही बघत नाही म्हंजे काय?

शकुंतलेच्या कुटिराच्या दाराशी दुर्वासमुनींनी जशी गंभीर स्वरात आपण आल्याची घोषणा केली होती, तशीच घोषणा ह्या दोघा मांजरांनीही केली—

अर्थात् हे संस्कृत वाक्य त्यांनी आपल्या मांजरी भाषेत भाषांतर करून घेऊन मग म्हटल होतं—'म्यांव!' म्हणून.

नेताजी ताड्दिशी उठून उभे राह्यले! ते अगदीच चाट पडले! ह्या 'म्यांव'च्या ऐवजी कुण्या मारेकऱ्याचं 'हँड्स अप' ऐकूनदेखील ते इतके भांबावले नसते बहुतेक.

जवळ जवळ वीस सेकंद ते त्या दोघा अवतारांच्याकडे स्थिर नजरेनं बघत राह्यले.

अन् क्षणभरातच सगळं त्यांच्या ध्यानात आलं.

त्यांनी हाक मारली. सुनीलला नाही, कालीलापण नाही.

—आबिद!

पण पॅसेजच्या पलीकडल्या टोकाला असलेल्या आबिदला काही ती हाक ऐकू आली नाही!

बिचारा तेव्हा भलत्याच कामात अत्यंत गुंतून गेला होता. खाटेच्या खाली, टेबलाखाली—इकडे तिकडे शोधतोय् हरवलेली दोन रत्नं!

नेताजींनी विजेची घंटा वाजवली.

एक गडी आला,

—आबिद को बुलाव!

बोलवावं नाही लागलं. एवढ्यात आबिद स्वतःच धावत आला होता ह्या दिशेनं. स्विंगिग डोअर ढकलून त्यानं आत पाऊल टाकलं—अन् त्याची पापणीच पडेना!

टेबललँपच्या एकीकडे नेताजी, दुसरीकडे मांजराची दोन पिल्लं. आबिद दिसल्या बरोब्बर ती टेबलावरनं खाली उतरली अन् आबिदच्या बुटावर तोंड घासायला लागली.

आबिदनं निमूटच त्यांना दोन्ही हातात उचलून घेतलं. अन् तो मान खाली घालून उभा राहृयला.

—ही दोन्ही तुझीच आहेत तर!

—हो सर!

—हूं! माझ्या आधीच लक्षात यायला हवं होतं—रात्रीचं दूध तू खोलीत का मागवतोस! पण मला न सांगता ह्यांना घरी का आणलंस?

—माझी चूक झाली नेताजी! मी म्हंजे...मला वाटलं होतं, तुम्हाला काही पसंत पडायची नाहीत ही! पण पहा ना सर—काय सुंदर दिसतात ते!

—राहू दे! पण ही अशी रात्रभर ह्या खोलीतनं त्या खोलीत, त्या खोलीतनं—

मधेच आबिद म्हणाला—नाही सर! रात्री ती कुठंच जात नाहीत. माझ्या बिछान्यातच रगखाली—

—काय!! ह्यांना बिछान्यात घेऊन झोपतोस तू! शीः! पण आबिद, तुला मांजराखेरीज आणखी कुणी नाही

आबिद डोकं खाजवत म्हणाला—सर—

—राहू दे! आलं लक्षात हा तुझा रोग काही बरा व्हायचा नाही! जा तू! ह्या दोघांना घेऊन जा! अन् कृपा करून ती माझ्या खोलीत येणार नाहीत येवढंतरी पहा!

आबिदनं तत्काळ काढता पाय घेतला. बगलेत दोन गुन्हेगार.

पण ही गोष्ट काही इथंच संपली नाही.

ह्या मांजरांचं काही मनावर घ्यायचं नाही असं नेताजींनी ठरवलं. दोनच तर मांजरं!

पण त्या मांजरांचा संसार वाढला. इवलीशी तीनचार पिल्लं लांब दिसली नेताजींना एकदिवस.

पण नेताजी रागावले नाहीत. मांजरांचा वंश वाढलेला बघून ते हसले उलट.

आबिद शरमिंद झाला.

त्यादिवशी जेवताना नेताजी म्हणाले अय्यरसाब, एक डवलबेड पलंग खरेदी करायला हवा. बघा बरं जरा बाजारात.

मी म्हणालो—कशाकरता? डबल-बेड कशाला?

—नाही, मला नकोय्. आबिद-भाईला प्रेझेंट करावा म्हणतो. त्याला जरूर आहे.

आबिदला शरमेनं मान वर करता येत नव्हती. म्हंजे जणू त्याचंच फॅमिली प्लॅनिंग फेल गेलं होतं!

अशा असंख्य चुटकेवजा गोष्टी आहेत माझ्या गाठोड्यात. पण तुम्ही बहुतेक कंटाळून गेला असाल. त्यापेक्षा नेताजींच्या रोजच्या दिनचर्येवरचं घेऊ

या आपण परत.

दुपारचं जेवण झालं की ते आपल्या खोलीत जायचे. अडीच-तीनचा सुमार असायचा तेव्हा निवांत एक सिग्रेट ओढायचे.

मग विचारायचे--कुणी भेटायला बिटायला आलेलं आहे का ?

नसेल तर तसेच आडवे व्हायचे बिछान्यावर. कपडेबिपडे अंगावर तसेच.

पंधरा ते वीस मिनटं असं पडून राहयचे. ह्या पंधरा ते वीस मिनटात ते एकूण चौदा ते एकोणीस मिनटं झोपायचे असा माझा अंदाज आहे. कारण आडवं झाल्यावर झोप लागायला काही त्यांना मिनटापेक्षा जास्ती वेळ लागायचा नाही. मग बाहेर धाडधाड बाँब का फुटत असेनात !

तीनच्या सुमाराला कुणी ना कुणी भेटायला यायचंच. त्यात दोन तास जायचे.

संध्याकाळच्या किंचित् आधी ते बॅडमिंटनच्या कोर्टांत उतरायचे. घराच्या मागं परसदारी. मग लढाई सुरू. नाही, विरुद्ध बाजूच्या खेळाडूंशी नाही. लढाई व्हायची राजू विरुद्ध नेताजी अशी ! तीन सेट्स झाले असतील नसतील एवढ्यात डॉक्टर राजू निकाल द्यायचे बस् ! आता खेळ पुरे झाला ! उजेड अगदी कमी होत आलाय् इतक्या कमी उजेडात खेळलं तर डोळे खराब होतील.

ते असं म्हणायचे तेव्हा खरंतर उजेड पुरेसा असायचा. डॉक्टर राजूंची उजेड नसल्याची सबब लंगडी असायची. खरं कारण वेगळंच असायचं.

नेताजींना ते चांगलंच ठाऊक होतं. त्याच्यामुळं ते डॉक्टरांना म्हणायचे-- Physician ! Heal thyself ! चश्मा बदलून घे तू राजू ! उजेडपण दिसत नाहीसा झाला की तुला !

आठ-नऊ सेट्स खेळून झाल्यावर घामाघूम होऊन नेताजी परतायचे तेव्हा अंधार चांगलाच झालेला असायचा. मग घाम वाळून गेल्यावर आंघोळ.

रात्रीचं जेवण साधारणपणानं आठ वाजता. आता कसली घाई नसायची. रात्री बहुतेक पुऱ्या असायच्या.

नेताजी म्हणायचे--आमच्या बंगाल-मध्ये पुऱ्यांच्याकरता एक पर्याय आहे. आम्ही 'लुची' म्हणतो. त्यांची चव ह्याच्यापेक्षा चांगली असते.

अशी ही 'लुची' इथं कुणाला नीट बनवता यायची नाही. त्यामुळं ज्या-दिवशी मासे किंवा मटण असायचं, त्यादिवशी पुऱ्यांच्या बदली नेताजी भात घ्यायचे. त्यांना गोडधोड आवडायचं. पण जास्ती खायचे नाहीत. म्हणायचे-- मेद वाढतो !

मग कॉफी. ही कॉफी होती पुढच्या गोष्टींच्या बॅरॉमीटरसारखी. ह्या बॅरॉ-मीटरचं रीडिंग घेतलं की रात्र कशी जाणार हे आम्हाला कळून चुकायचं. षटीषण्मासी कधीतरीच ते लौकर झोपायचे. लौकर म्हंजे रात्री अकरा-पर्यंत ! त्यादिवशी म्हणायचे--राहू दे, कॉफी नको आज !

कॉफीच्या कपाच्या आकड्याचा न् घड्याळाच्या छोट्या काट्याचा गणिती संबंध होता. म्हंजे नेताजी जेव्हा एक

कप कॉफी घ्यायचे, तेव्हा आम्ही समजून चालायचो की आज काही हे एकच्या आधी झोपत नाहीत! दोन कप म्हंजे रात्रीचे दोन. अन् कोजागरी किंवा शिवरात्रीची रात्र असली की म्हणायचे---काली, माझ्या खोलीत एक थर्मास कॉफी पाठवून दे.

नेताजी असं म्हणायचे न् बिचाऱ्या भास्करनचे डोळे कपाळात जायचे! कारण त्या दिवशी त्याचीहि कोजागरी हे ठरलेलंच!

कुणाच्या बोलण्यावर टोला लगावायची संधी मिळाली की नेताजींच्या हातनं ती जाणं फार जड होतं. इंग्रजीत ज्याला 'लेग-पुलिंग' म्हणतात ना, त्यात नेताजी चांगलेच वाकबगार होते. मग तंगडी कुणाची ह्याचा काहीएक विधिनिषेध नसायचा त्यांना. हसायचा खुराक असला की बस! मग स्वतःचा स्वतःचा पाय ओढायलापण त्यांची ना नसायची.

एका दिवशीची गोष्ट जाता जाता आठवतेय्.

जेवायला बसलो होतो. आम्ही चार-पाचजण असू. चांगल्या गप्पा रंगल्या होत्या.

बावळटपणाच्या गोष्टी निघाल्या. आपला कधी न् कसा 'मामा' झाला त्याच्या गोष्टी.

नेताजी म्हणाले-- साधारणपणानं मी स्वतःला हुषारच मानत आलोय्. आत्तापर्यंत चिक्कार लोकांनी मला भरपूर शिव्या दिल्यायृत. पण कुणी बावळट किंवा गाढव असं म्हणालं नाही कधी. पण एकदा मात्र, बरं का, एकजण म्हणाला की मला गाढव! अस आडवळणानं नीट म्हणाला होता! अगदी शालजोडीतला!

कुतूहल सगळ्यांनाच वाटत होतं. पण आता विचारायचं कसं?

नेताजींनी एकदा आमच्या सगळ्यांच्याकडे बघून घेतलं.

म्हणाले-- चाळीस साल. डिसेंबर महिना. ब्रिटिशांच्या जेलमधे अडकून होतो. युरोपमधे तुंबळ लढाई चाललेली. ऑस्ट्रिया न् चेकोस्लोवाकिया पुसून गेले होते युरोपच्या नकाशावरनं. अर्धं पोलंड हिसकून घेतलं हिटलरनं. उरलेलं अर्धं रशियानं. बुढ्ढा ब्रिटिश सिंह तरीदेखील बसूनच राह्यलेला आपल्या पिंजऱ्यात. बाहेर यायची हिंमत होत नव्हती. माझ्या बरोबर लक्षात आलं होतं की भारताला ही शेवटची संधी आहे. अशा ऐनवेळेला आपण जेलमधे कुजत पडून चालायचं नाही. बाहेर पडायलाच हवं. निव्वळ ब्रिटिशांच्या जेलमधनंच नाही. तर भारतातनंच बाहेर निघून जायला हवं. काय करावं? काही उपाय दिसेना. म्हणून मी आमरण उपोषणाचा संकल्प जाहीर केला. लढाईच्या ह्या परिस्थितीत दुसऱ्यांदा जतीन दासच्या मृत्यूचा मुकाबला करायइतकी ताकद ब्रिटिश सिंहाच्या अंगात आहे का नाही ते मला पाह्यचं होतं.

व्हाइसरॉयला मी पत्र लिहिलं. ते जेलच्या लोकांनी उघडून वाचलं. सेन्सॉर करण्याकरता. जेलचा सुपरिटेंडंट होता एक शंभर टक्के इंग्रज ऑफिसर. पत्र

घेऊन दाणदाण तडक माझ्या कोठडीत आले ते. म्हणाले-- मला काही फार वेळ घ्यायचा नाही तुमचा. फक्त एक छोटासा प्रश्न विचारायचाय्. मिस्टर बोस, तुम्हाला माहित आहे का, मेलेल्या सिंहापेक्षा जिवंत गाढवाची किंमत बाजारात ज़ास्ती असते ? हे पत्र पाठवायच्याआधी ह्याच्यावर जरा शांतपणानं विचार करून बघा हवं तर !

अन् नेताजी खो खो हसले.

आम्ही काही त्या हसण्यात सूर मिळवला नाही.

मी विचारलं--तुम्ही काही जबाब नाही दिलात ?

ते म्हणाले--जबाब काय देणार ! फक्त म्हणालो-- मीपण काही जास्ती बोलत नाही उत्तर म्हणून. फक्त एक छोटासा प्रतिप्रश्न विचारतो. तुम्हाला माहित आहे का, एक जिवंत गाढव तुमच्या जेलच्या कंपाउंडमधे घुसलं तर त्याला जितक्या सहज हाकलून देता येईल, तितक्या सहजपणानं मेलेल्या सिंहाचं प्रेत काही बाहेर काढता यायचं नाही तुम्हाला ? पत्र पुढं पाठवायच्या आधी तुम्हीपण शांतपणानं ह्याचा विचार करून बघा हवं तर !

ब्रिटिश जेलरचं लालभडक तोंड लांबुळकं होऊन गेलं होतं !

आता मात्र आम्ही सगळेच खो खो हसलो.

महायुद्ध बंद झाल्यावर मी भारतात परतलो. लालकिल्ल्यातल्या खटल्यात साक्ष द्यायला कैदी म्हणून. सुरवातीला लोकांच्याबरोबर बोलायचालायची मला काहीच मुभा नव्हती. लालकिल्ल्यातला तो ऐतिहासिक खटला संपल्यावर मग सामान्य लोकांच्यात मिसळायची संधी मला मिळाली. अगदी पहिल्यापास्नंच राजकारणी लोक अन् पुढारीमंडळींच्या कडनं एक आरोप तोंडावर फेकला जायचा--जपानी लोकांची मदत तुम्ही घेतलीत हे तुमचं फार चुकलं. अन् शिवाय भारताला ते फार अपमानकारक होतं.

सुरवातीला मला वाटायचं की असं म्हणणाऱ्या लोकांच्या डोक्यावर ब्रिटिश प्रचाराचा भलताच परिणाम दिसतोय्.

ब्रिटिश प्रचारकांचं एक समजण्याजोग आहे. त्यांना असं म्हणण्याखेरीज गत्यंतरच नव्हतं. खरी टोचणी कुठं आहे ते त्यांना चांगलंच ठाऊकच होतं. लष्करी सल्लागारांचं टोळकं ब्रिटिश सेनापतींना सांगायचं, नेताजी अन् त्यांची आझाद हिंद सेना ह्यांना पार धुडकावून लावून चालायचं नाही. पण नेताजी निव्वळ स्वतःच्या जोरावर, स्वतःच्या पायावर उभं राहून लढतायत ही गोष्ट भारतातल्या सामान्य जनतेला कळणार नाही ह्याची तजवीज केली पाह्यजे. तेव्हा 'सुभाषचंद्र म्हंजे निव्वळ जपानच्या हातातलं बाहुलं' असा प्रचार करत जा. मग म्हंजे भारतातले बालेबुद्धी नेते म्हणतील--जपानला अडवायला पाह्यजे म्हंजेच सुभाषचंद्रांना पण अडवायला पाह्यजे.

तर असा प्रचार ब्रिटिशलोक करत गेले. पण ब्रिटिश मंडळींनी काय प्रचार केला ह्याला मी काहीच महत्त्व देत

नाही. कारण सगळ्यांनाच ठाऊक आहे की सुभाषचंद्र लागोपाठ दोनदा काँग्रेसच्या अध्यपदी निवडून आले होते. अन् एकदा तर गांधीजींचा विरोध असूनपण निवडून आले होते. शिवाय वेव्हेल–माउंटबॅटन वगैरे साहेबलोकांना काही भारताबद्दल नेताजींच्यापेक्षां जास्ती प्रेम नक्कीच नव्हतं.

तेव्हा ब्रिटिशांनी काय प्रचार केला त्याला महत्त्व द्यायचं काही माझ्या मनात नाही. त्याच्यापेक्षा भारतातल्या बऱ्याच नेत्यांचं काय म्हणणं होतं तेच आपण बघू या.

नेताजींनी जपानशी मैत्री केली हे चुकलं असं म्हणणारे नेते. 'जपानला अडवायला हवं. ब्रिटिशांनी इतके दिवस आपलं कितीही नुकसान केलेलं असलं, तरी ब्रिटिशांच्या युद्धप्रयत्नात आपल्याकडून कोणत्याही प्रकारची खीळ पडता कामा नये !'*—असं म्हणणारे भारतीय नेते. त्यांच्याबद्दल आपण विचार करू या.

* 'The Japanese must be resisted. We are not going to surrender to the invader. In spite of all that has happened, we are not going to embarrass the British war effort in India.' मौलाना अबुल कलम आझादांच्या India Wins Freedom ह्या पुस्तकात पंडित नेहरूंच्या तोंडी घातलेले शब्द.

शत्रूनं ज्याला पुरतं ओळखलं होतं, त्याची ओळख मित्रांनाच पटली नाही–म्हंजे कमाल आहे का नाही ! काँग्रेसच्या कॉम्रेड्सचा कसा विश्वास बसला ? आपल्या इतक्या ओळखीचे सुभाषचंद्र, ज्यांनी ब्रिटिशांच्या समोर कधी मान तुकवली नाही, ते जपानची ताबेदारी कशी करतील ? पण ब्रिटिशांच्या प्रचारावर ह्या मंडळींचा विश्वास बसला. ह्याला काय म्हणणार ? बुद्धीचा कमकुवतपणा ? का ईर्षा ? का ब्रिटनची मर्जी संपादन करायचा प्रयत्न ?

पण जाऊ द्या. नेताजींच्या कहाणीवर येऊ या.

जपानबरोबरचे त्यांचे संबंध समान पातळीवरचे होते. देश, देशातले लोक न् सेनेची मानमर्यादा ह्याच्याबद्दल नेताजींची नजर फार कठोर न् जागरूक असायची. ह्याच्यावरनं जपानशी बारीकसारीक तंटे झालेले आहेत त्यांचे. असे असंख्य प्रसंग सांगता येतील मला. ह्या बाबतीत नेताजी स्वतःचा विवेकच तेवढा मानायचे. आयुष्यात कमावण्याजोगं त्यांच्या लेखी काहीच नव्हतं–– एक देशाचं स्वातंत्र्य सोडून ! पण ह्या स्वातंत्र्याच्या बदल्यात जर भारताचा मानच द्यावा लागत असेल, तर मग हे स्वातंत्र्यही नको म्हणायची धमक त्यांच्यात होती !

त्यांचा मुद्दा अगदी चार ओळीतदेखील सांगता येईल––

My knee shall bend, I calmly pray.

To God and God alone.

My life is in the Indians' hand.

My conscience is my own !

असे होते सुभाषचंद्र ! असे होते

आमचे नेताजी !

ह्या विवेक तेवढा सोडून बाकी आपलं सगळं काही त्यांनी मातृभूमीच्या चरणी अर्पण केलं होतं !

जपानची मदत घेतल्यानं काही भारताची इज्जत कमी होत नाही, असं त्यांचं पक्कं मत होतं. शिवाय ही मदतदेखील अगदी मर्यादित, मोजकी होती. त्यांनी कधी मनुष्यबळ मागितलं नाही, अर्थबळ मागितलं नाही. मागितली ती फक्त शस्त्रसामग्री ! अन् ह्या मागण्याला पण अटी होत्या. तीन अटी होत्या. पहिली अट होती——आझाद हिंद सेनेला अन् जपानी फौजेला सारखाच मान असेल. दुसरी अट होती——भारताच्या भूमीचा इंचन्इंच भाग——मग तो जपानी फौजेनं घेतलेला असो की आझाद हिंद सेनेने घेतलेला असो – ताबडतोब हंगामी आझाद हिंद सरकारच्या हाती सोपवला जायला पाह्यजे. तिसरी अट होती —— भारताची मानहानी कोणत्याही कारणानं होऊ देता कामा नये.

ह्या तिन्ही अटी पुरत्या पाळल्या जाताय्त का नाही ह्याच्याकडे नेताजी डोळ्यात तेल घालून लक्ष द्यायचे.

काही उदाहरणंच देतो कशी !

एकाच रँकचा जपानी सैनिक न् आझादी सैनिकाची गाठ पडली तर लष्करी सलाम आधी कुणी करायचा ह्याच्याबद्दल एकदा तीव्र मतभेद झाला होता.

जपानी जनरल कावाबींचं ठाम म्हणणं होतं की जपानी फौज आधी प्रस्थापित झालेली आहे. तिचं वय आझाद हिंद सेनेपेक्षा मोठं आहे. तेव्हा आझादी सैनिकानंच आधी सॅल्यूट केला पाह्यजे.

ताबडतोब नेताजींनी प्रश्न केला—तर मग वयानं मोठा असलेला एक जपानी कॅप्टन न् वयानं लहान असलेला एक जपानी मेजर ह्यांची गाठ पडली तर आधी कोण सॅल्यूट करतं ?

जनरल कावाबींना आश्चर्य वाटलं. ते म्हणाले—अर्थात् कॅप्टन आधी सॅल्यूट करतो ! तो रँकनं खालचा असतो.

मग नेताजी हंसले होते.

म्हणाले होते—म्हंजे लष्करी मान काही वयावर अवलंबून नाही हे ठरलंच की. तेव्हा एकाच हुद्याचा जपानी अधिकारी न् आझादी अधिकारी—कुणीच कुणाला आधी सॅल्यूट करणार नाहीत ! दोघं एकमेकांना एकाचवेळी अभिवादन करतील ! असंच ना ?

अजिबात वाद न घालता ही अट जपाननं मान्य केली होती. अन् रणांगणात जपानी सैन्यानं ती पाळलीही होती.

भारताच्या भूमीवर पाऊल ठेवल्यावर जेव्हा आझाद हिंद सेनेच्या अधिकाऱ्यांनी भारतात जपानी झेंडा लावायला हरकत घेतली, तेव्हा आता दोघांची लढाईच जुंपते का काय असं वाटायला लागलं होतं.

ही बातमी मिळाल्यावर नेताजींनी सरळ तोजोला रेडिओग्राम करून टाकला होता.—तुम्ही दिलेला शब्द

खरा करून दाखवायची वेळ आता आलेली आहे !

जपानचे प्रधानमंत्री जनरल हिदेकी तोजोंनी पण लगोलग तारेनंच उत्तर दिलं होतं--'भारताच्या भूमीचा प्रत्येक इंच भाग ज्याक्षणी आझाद हिंद सेनेच्या किंवा जपानी फौजेच्या कब्ज्यात येईल, त्याचक्षणी तिथला सगळी कार-भार करायची जबाबदारी हंगामी आझाद हिंद सेनेवर असेल !'

जपानी सेनेचे कमांडर-इन-चीफ जनरल कावावो एकदा रंगूनला आले. रंगूनमधला लायाझाँ ऑफिसर नेताजींच्याकडे येऊन म्हणाला--आझाद हिंद सेनेच्या वतीनं कुणी सीनियर ऑफिसर त्यांना घरी जाऊन भेटेल तर बरं होईल.

नेताजी तात्काळ म्हाणाले होते--का म्हणून ? शिष्टाचार काही तसा नाही !

जपानी कमांडर-इन-चीफनंच आधी नेताजींना येऊन भेटायला पाहजे. ते त्याच कर्तव्यच होतं. प्रोटोकोलमधे तसंच होतं. कारण नेताजी काही निव्वळ आझाद हिंद सेनेचे सरसेनापति नव्हते. ते आझाद हिंद सरकारचे राष्ट्रपति होते. त्यामुळं नेताजींचा मान जपानचे प्रधानमंत्री जनरल तोजोंच्या-इतका होता.

आता ही गोष्ट जपानी कमांडरच्या कानावर गेली होती का काय कुणास ठाऊक. पण दुसऱ्याच दिवशी सी-इन-सी-साहेब कर्टसी व्हिजिटकरता नेताजींच्याकडे आले. नेताजींनी त्यांचं चांगलं आदरातिथ्य केलं.

अन् शिष्टाचारात नेताजी कसले कमी पडतात ! रिटर्न-व्हिजिट म्हणून ते स्वत: सी-इन-सीकडे गेले. दुसऱ्या कुणालातरी पाठवून ते मोकळे झाले नाहीत.

अशी असंख्य उदाहरणं मला देता येतील ? पण त्याची खरंच काही गरज आहे का ?

नेताजींना काही तुम्ही पाह्यलेलं नाही. पण सुभाषचंद्र काही मंगळावरनं इथं आलेले नव्हते. ते कशाचे बनलेले होते हे तुम्हाला नक्कीच ठाऊक आहे. विवेकाच्या आदेशानं ऋषितुल्य महात्माजींची ताबेदारी पत्करायला नकार देऊन ज्यानं कॉंग्रेसचं अध्यक्षपद सोडून दिलं, तो इसम जपानी लोकांची ताबे-दारी पत्करायला तयार होईल असं वाटलं तरी कसं इथल्या पुढाऱ्यांना ? परदेशी ब्रिटिश राज्यकर्त्यांना इथनं हाकलून लावायची प्रतिज्ञा आम्ही घेतली होती, ही गोष्ट ते कसेकाय विसरून गेले ? भारतातल्या नेत्यांनी आपल्या देशबांधवांना सांगितलं की--'आपल्या मनात ब्रिटिशांच्याबद्दल कितीही राग जमा झालेला असला, तरी ह्या अडचणीच्या वेळी इंग्लंड न् दोस्त-राष्ट्रांच्या कामात आपण काहीएक अडसर घालायला नको. कारण त्याच्या मुळं शत्रुपक्षाला मदत केल्यासारखं

होईल.'*--असं जेव्हा त्यांनी सांगितलं, तेव्हा ब्रिटिश सरकारचा इथला दोनशे वर्षाचा इतिहास काय ते विसरून गेले होते ? विसरून गेले होते की भारताचा दुष्मन एकच, अन् हा दुष्मन म्हंजे ब्रिटिश सरकार ?

त्यापेक्षा आता आपण दुसऱ्या प्रश्नाकडे येऊ या. जरा अमेरिकन दृष्टिकोनातनं विचार करू या.

आझाद हिंद सरकार निव्वळ इंग्लंडशीच लढाईची घोषणा करून गप्प बसलं नव्हतं. तर त्याने अमेरिकेविरुद्धपण लढाईची घोषणा केली होती. ह्यामुळं म्हणे अमेरिकन सरकार न् अमेरिकन लोक आमच्यावर भलतेच चिडले. अमेरिकन सरकार उघडपणानं काही का म्हणेना, पण आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अमेरिकन पंडित खाजगीत ही गोष्ट कबूल करायचे—की परतंत्र भारतवासीयांना परदेशी ब्रिटिश राज्यकर्त्यांच्याविरुद्ध हाती शस्त्र धरायचा अधिकार काही नाकारता येण्याजोगा नाही. म्हंजे एवढंतरी ते कबूल करायचे. पण पुढं त्यांचं म्हणणं होत--हे इंग्लंडच जेव्हा अमेरिकेचं मित्रराष्ट्र म्हणून जीवनमरणाच्या लढाईत गुंतून पडलेलं होतं, तेव्हा त्याला असं सतावणं हे मात्र तुमचं (म्हंजे आमचं) चुकलं. अन् आमचा सर्वात मोठा गुन्हा म्हंजे त्याच्याकरता आम्ही जपानशी हातमिळवणी केली !

अमेरिकन दृष्टिकोनातनं हे असं म्हणणं ठीकच आहे. त्यात अस्वाभाविक काहीच नाही. कारण प्रशांत महासागराच्या भागात जपानंच तेवढा अमेरिकेच्या तोडीस-तोड शत्रू होता. पण नि:पक्षपाती तटस्थ माणसाच्या दृष्टिकोनातनं ह्या युक्तिवादात कितपत तथ्य आहे ?

अमेरिकेविरुद्ध लढाईची घोषणा करायचा निर्णय ज्या बैठकीत घेतला गेला, त्या बैठकीला मीपण हजर होतो. त्या ऐतिहासिक बैठकीबद्दलच आता सांगतो. हा निर्णय आम्ही कसा काय घेतला ते तुम्ही ऐका न् मग आमचं चुकलं का काय ते तुम्हीच सांगा !

ऑक्टोबरच्या तेवीस तारखेला रात्र उलटून गेल्यावर बैठक सुरू झाली. अन् ती बैठक चोवीसची सकाळ उजाडल्यावर संपली.

अध्यक्षस्थानी स्वत: नेताजी होते. आझाद हिंद सरकारचे सगळे मंत्री न् लष्करी सल्लागार बैठकीला हजर होते.

नेताजींनी स्वत:च ठराव मांडला-- आझाद हिंद सरकारनं इंग्लंड न् इंग्लंडचं मित्रराष्ट्र अमेरिका ह्यांच्याविरुद्ध लढाईची घोषणा करावी.

ह्या ठरावाच्या बाजूनं म्हणा की विरुद्ध म्हणा--कुणी काहीच बोललं नाही आधी.

आम्हाला वाटलं, चर्चा वगैरे न होताच ठराव पास होतो बहुतेक एकमताने.

---

*We told the Indian public that in spite of their indignation against British policy they must not interfere in any way with the operations of the British or Allied Armed Forces, as this would be giving indirect aid to the enemy aggressor.—Discovery of India मध्ये जवाहरलाल नेहरू.

पण तसं काही झालं नाही.

ठराव पास झाला म्हणून जाहीर करायच्या नेमकं आधीच हरकतीचा सूर काढला लोकनाथन-चाचांनी.

कर्नल लोकनाथन शहीद न् स्वराज्य बेटांचे पहिले गव्हर्नर होते. पण आमच्या सर्वांचे ते सार्वजनिक काका होते. ते बसले होते नेताजींच्या डाव्या हाताला. बाकीच्यांच्या मानानं लांब. दिलखुलास माणूस. नेताजींशी मतभेद झाला तर निडरपणानं तसं सांगायला कधी संकोच करायचे नाहीत ते.

तर हे असे कर्नल लोकनाथन उठून उभे राह्यले. म्हणाले—— अमेरिकेला ह्यांच्यात ओढायची काय जरूर आहे सर? अमेरिका बाजूलाच राहू देत. आपला शत्रू एकच. अन् तो म्हंजे इंग्लंड! खरं सांगायचं तर इंग्लंडनं जर अशी गुडघे टेकून अमेरिकेकडे मदतीची भीक मागितली नसती, तर अमेरिका काही इंग्लंडला अशी मदत करायला पुढं सरसावली नसती. तेव्हा अमेरिकेच्या विरुद्ध आपली काहीच तक्रार नाही. त्यांनी काही आपला देश बळकावलेला नाही. अन् भारतावर राज्य करावं असं काही त्यांच्या मनांतपण नाही. तेव्हा एवढ्या मोठ्या देशाचं शत्रुत्व आपण कशाला ओढवून घ्यायचं उगाच?

नेताजींनी शांतपणानं सगळा युक्तिवाद ऐकला.

मग म्हणाले——ह्याच्याबद्दल आणखी-कुणाला काही म्हणायचंय्?

प्रोत्साहन मिळाल्यासारखं झालं न् कुणी कुणी लोकनाथनचाचांचं समर्थन केलं.

सगळ्यांचं सगळं म्हणणं ऐकून घेतल्यावर नेताजी म्हणाले——ठराव मी मांडलाय्. तो का मांडला हे आता सांगतो. माझं सगळं म्हणणं ऐकून पण तुम्हाला ते पटलं नाही तर तसं मोकळे-पणानं सांगा.

मग अमेरिकेच्या विरुद्ध आपण का म्हणून युद्ध पुकारायचं ते त्यांनी बार-काईनं सांगितलं.

म्हणाले—— आपल्यासमोर ध्येय फक्त एकच आहे : भारताच्या भूमीतनं विदेशी ब्रिटिश राज्यकर्त्यांना हाकलून लावणं, भारतवर्ष स्वतंत्र करणं. जगाच्या सांस्कृतिक इतिहासात परतंत्र लोकांच्या ह्या आकांक्षेला पाठिंबा मिळाल्याचं आपल्याला दिसून येतं. एक परतंत्र जमात म्हणून देशाच्या स्वातंत्र्याकरता झट-ण्याचा अधिकार आपल्याला निश्चितच आहे. अन् जगाचा नैतिक पाठिंबा आपल्या ह्या प्रयत्नांना मिळेल, एवढंच नाही तर स्वातंत्र्यसंग्रामाच्या वाटेत राज्यकर्त्यांच्याकडनं जे अडथळे घालण्यात येतील ते काढून टाकून वाट मोकळी करून घ्यायचा अधिकारपण परतंत्र बंडखोरांना असतो—— हे आप-ल्याला जगाच्या इतिहासावरनं दिसून येतं. पारतंत्र्याचा साखळदंड तोडण्या-करता बाहेरच्या कुणाची मदतपण हे बंडखोर घेऊ शकतात—— मदत करणा-ऱ्याचं ध्येयधोरण अजिबात न मानता-देखील——ही शिकवणपण इतिहासावरनं आपल्याला मिळते. इटालीच्या स्वातंत्र्या-कांक्षी गॅरिबाल्डीनं अशीच चक्क शत्रु-

पक्षातल्या ऑस्ट्रियाची मदत घेतली होती. सन्-यत्-सेननं जपानची मदत घेतली होती चीनमधल्या सम्राटाला पदच्युत करायला. डी व्हलेरा न् त्याच्या सिन-फिन पार्टीनं अमेरिकेची मदत घेतली होती आयर्लंडला स्वतंत्र करण्यासाठी. अशी वाटेल तितकी उदाहरणं देता येतील.

आज आपल्या स्वातंत्र्यसंग्रामात अमेरिका चक्क एक अडसर झालेली आहे. भारतात असंख्य ठिकाणी अमेरिकेनं आपल्या सैन्याकरता बेस-कँप्स उघडलेय्त. आपण भारतात प्रवेश केल्यावर ह्या अमेरिकन सैन्याविरुद्धही आपल्याला लढावं लागणार आहेच.

प्रशांत महासागरातल्या जपानच्या साम्राज्यवादी धोरणाला थोपवण्याकरता अमेरिका लढाईत उतरलीय् न् जपानच्या शत्रु असलेल्या इंग्लंडशी तिनं हातमिळवणी केल्याय्—असं म्हणता येईल तुम्हाला. म्हणता येईल की भारतात अमेरिकेनं तळ ठोकलेय्त ते निव्वळ युद्धाची एक आवश्यकता म्हणून. त्यांना काही राज्य करायचं नाहीय् भारतावर.

पण तरी त्याच्यामुळं आपल्या स्वातंत्र्यसंग्रामात अडथळा निर्माण झालेला आहे, ही गोष्टही नाकारता येण्याजोगी नाही.

महात्मा गांधींच्या आदेशानुसार भारतात गेल्या वर्षीच्या ऑगस्टपास्नं क्रांती सुरू झालेली आहे, हे अमेरिकन सरकारला माहीत नाही असं थोडंच आहे ? इंग्लंडला लढाईत मदत करण्याकरता पुढं सरसावण्याच्या आधी भारताच्या स्वातंत्र्याबद्दल चर्चिलकडनं काही वचन मिळवणं अमेरिकेला अगदी शक्य होतं. तसं का केलं नाही अमेरिकेनं ?

मन्रोच्या सिद्धांताला कवटाळून अमेरिका आपल्या जागीच स्वस्थ बसून राह्यली असती, तर आपल्याला काहीच बोलायची जरूर नव्हती. पण अमेरिकेनं आपणहून भारतात सैन्य पाठवून दिलंय्. युद्ध संपल्यावर भारताला स्वातंत्र्य द्यायचा शब्द जोपर्यंत तुम्ही देत नाही, तोपर्यंत आपण भारतात सैन्य पाठवणार नाही—अस का नाही सांगितलं अमेरिकेनं इंग्लंडला ?

रुजवेल्टचा प्रतिनिधी म्हणून भारतात आलेल्या विल्यम फिलिप्सनं भारताच्या राजकीय परिस्थितीबद्दल मोठाले रिपोर्ट्स अमेरिकन प्रेसिडेंटकडे कितीदातरी पाठवले हे मला माहीत आहे. पण तरी अमेरिकेनं त्याला काहीच महत्त्व दिलं नाही. दोनशे वर्षापूर्वी जॉर्ज वॉशिंग्टन नावाच्या सद्गृहस्थानं ह्याच इंग्लंडविरुद्ध कशाप्रकारे स्वातंत्र्यसंग्राम केला होता, ह्याची आठवण काही रुजवेल्टसाहेबांना झाली नाही ? इंग्लंडकडनं स्वातंत्र्य छिनावून घेण्याकरता ह्याच जॉर्ज वॉशिंग्टनला इंग्लंडच्या शत्रूबरोबर—फ्रान्सबरोबर—हातमिळवणी करायला लागली होती, ह्याचीही आठवण रुजवेल्टसाहेबांना झाली नाही! बरोबर तशाच पद्धतीनं अगतिक परतंत्र भारताला आज इंग्लंडच्या दुसऱ्या एका शत्रूबरोबर—जपानबरोबर—हातमिळवणी करावी लागत्याय्, असं काही

डोक्यात आलं नाही रुजवेल्टसाहेबांच्या !

तुम्ही जपानशी हातमिळवणी केलीत हे तुमचं चुकलं असं जर अमेरिकेचं आपल्याला म्हणणं असेल, तर त्यांना आधी कबूल करावं लागेल की फ्रान्सशी हातमिळवणी करण्यात जॉर्ज वॉशिंग्टन-चीपण चूकच झाली होती म्हणून !

इंग्लंडकडनं आपलं स्वातंत्र्य हिसकावून घेण्याकरता परदेशाची मदत घेतली म्हणून हा सुभाष बोस जर आज अमेरिकेच्या नजरेत वॉरक्रिमिनल होत असेल, तर मग अमेरिकेनं जाहीर करून टाकावं की गेली दोनशे वर्षं जॉर्ज वॉशिंग्टनपण वॉर-क्रिमिनलच आहेत आपल्या लेखी !

नेताजी थांबले.

लगेच कर्नल लोकनाथन उठून उभे राह्यले.

म्हणाले—नेताजी, तुमच्या ठरावाला माझा अगदी मनापास्नं पाठिंबा आहे. भारताला स्वातंत्र्य देण्याचं वचन न घेता भारतात आपलं सैन्य पाठवून देणं हा अमेरिकेचा गुन्हाच आहे. अमेरिकेनं जाणूनबुजून आपल्या स्वातंत्र्यसंग्रामात अडथळा उभा केलाय्. त्यामुळं परतंत्र लोकांचे प्रतिनिधी म्हणून अमेरिकेला शत्रु मानण्याचा हक्क आपल्यालापण आहेच आहे !

नंतर आणखी काहीच हरकती न येता हा ऐतिहासिक ठराव पास झाला.

हे दोन प्रश्न झाले. आता आपण तिसऱ्या प्रश्नाकडे वळू या.

इंग्लंड जेव्हा स्वतःच जीवनमरणाच्या लढाईत गुंतून पडलेलं होतं, तेव्हा त्याच्यावर आम्ही हल्ला चढवला हे योग्य नाही—हा आहे तिसरा प्रश्न. हा युक्तिवादच इतका हास्यास्पद आहे की त्याला उत्तर द्यायलापण मला संकोच वाटतोय्. पण हा आरोप काही कुणी हाफ-पँट घालणाऱ्या बालनेत्यानं केलेला नाही. हा आरोप केलाय् बऱ्याच तथाकथित पंडितांनी. ह्या सगळ्या स्वतःला पंडित म्हणवणाऱ्या मंडळींना मला सांगावंसं वाटतंय् की ज्या राज्यकर्त्यांच्याबद्दल तुम्हाला एवढा पान्हा फुटलाय्, त्यांच्या नेत्याचं आत्मचरित्र तरी एकदा वाचून बघा म्हंजे तुमच्या प्रश्नाचं उत्तर आपोआपच मिळून जाईल तुम्हाला !

रशियाशी मैत्रीचा करार करायचा ठराव जेव्हा विन्स्टन चर्चिलनं पाठवला, तेव्हा त्याचा खाजगी चिटणीस कोलडीत चाटच पडला.

म्हणाला—तुम्ही रशियाबरोबर करार करणार ?

चिरुटाचा धूर सोडत चर्चिल म्हणाले—का ? तुला खरं नाही वाटत ?

—कसं वाटेल ? तुम्ही तर आजन्म कम्युनिस्टांचे शत्रू !

चर्चिल हसून म्हणाले—आता माझ्यासमोर फक्त एकच ध्येय आहे. हिटलरला उद्ध्वस्त करणं. ते जमलं नाही तर ग्रेट ब्रिटन म्हणून काही देश राह्यचा नाही जगाच्या नकाशात ! तेव्हा हिटलरनं जर आज नरकावर आक्रमण केलं तर नरकाच्या दूतालादेखील सहानुभूति कळवायला मी माग-

पुढं पहाणार नाही !

संकटाच्या वेळी इंग्रजांना सतावणं काही बरोबर नाही असं कोण म्हणेल? नेताजींच्या मतानं, ज्यांना कायम इंग्रजांशी समझोताच करायचा होता, तेच तेवढे असं म्हणतील! ज्यांना आशा वाटतेय् की आपल्या भिक्षापात्रात इंग्लंड एकदिवस स्वातंत्र्याची भीक टाकतील ! ज्यांना आशा आहे की आपल्या आयुष्यातच ही भीक मिळेल अन् मग आपण स्वतंत्र भारताच्या गादीवर बसून राज्य चालवू! त्यांनाच भीति वाटणार की लढाई चालू असताना इंग्लंडच्या मनाविरुद्ध आपण वागलो तर इंग्रजांच्याबद्दल आपलं जे निष्ठेचं रेकॉर्ड आहे, ते खराब होऊन जाईल !

सुभाषचंद्रांना आयुष्यात कधीच इंग्रजांची गुलामी, त्यांच्याबद्दल निष्ठा बाळगणं कबूल नव्हतं. आपल्या बिगर-समझोत्याच्या लढाईची गोष्ट त्यांनी वारवार निःसंदिग्ध शब्दात जाहीर केली होती--हिंदुस्थानात असतानाच ! दुसऱ्या महायुद्धाला तोंड फुटायच्या कितीतरी आधीच त्यांनी सरळ शब्दात जाहीर केलं होतं--इंग्लंड हा आपला जन्मजात शत्रू आहे !

ब्रिटिशांना हे माहित होतं. अन् म्हणून इंग्लंडपण म्हणायचं--सुभाषचंद्र बोस हे ब्रिटिश भारताचे एक नंबरचे शत्रू आहेत !

हे सगळं अगदी उघड बोलणं होतं.

इंग्रजांनी सुभाषचंद्रांना तुरुंगात डांबून ठेवलं होतं. पण जेलमध्ये सिंहाच्या प्रेताची विल्हेवाट लावणं अशक्य आहे हेही त्यांच्या ध्यानात आलं होतं, त्यामुळं उपासानं क्षीण झालेला त्यांचा अर्धमेला देह त्यांना पाठवून द्यावा लागला एल्गिन रोडवरच्या घरी. नंतर इंग्लंडचा हा एक नंबरचा शत्रु झियाउद्दीन अन् ऑर्लॅडो माजोट्टा ह्या आडवळणानं पूर्व-आशियात आला. इंग्लंडच्या विरुद्ध परत त्यांनी लढाईची घोषणा केली. त्यामुळं ब्रिटनप्रेमी भारतीय पंडितांना राग येणं अगदी शक्य आहे. स्वतः चर्चिलदेखील आश्चर्यचकित झाले. पण चिडले मात्र नाहीत. सुभाषचंद्रांनी निष्ठेचं वचन दिलं अन् नंतर ते मोडलं असं चर्चिलनी आपल्या असंख्य भाषणात किंवा जाडजूड आठवणीत कुठंच एकदापण सांगितलेलं नाही !

भारतात परतल्यावर मला कितीतरी जणांनी विचारलं--नेताजींचा डिक्टेटरशिपवर विश्वास होता का हो ?

मला काही कळत नाही असं नाही. ह्यांना विचारायचं असतं वेगळंच ! पण ते झाकून पाकून विचारतायत ! त्यांना विचारायचं असतं--नेताजी डिक्टेक्टर होते ना ?

ह्या दोन्ही प्रश्नांची उत्तरं मी देणाराय्.

पहिला प्रश्न--नेताजींचा कशावर विश्वास होता?—लोकशाहीवर का हुकुमशाहीवर ?

माझ्या समजुतीनं हा प्रश्नच बेकार आहे--नेताजींच्या मतानं. कारण ह्या प्रश्नात एक गोष्ट गृहित धरलेली आहे. की ह्या दोहोंपेक्षा आणखी तिसरी वाटच नाही. नेताजींना हेच मान्य नव्हतं.

दुसरं महायुद्ध सुरू व्हायच्या सहा वर्षं आधी जवाहरलालजी वर्तमानपत्रकारांना म्हणाले होते—जगासमोर आज फक्त दोनच वाटा खुल्या आहेत असं मला वाटतं. फॅसिझम अन् कम्युनिझम ह्या त्या दोन वाटा. मी कम्युनिझमच्या बाजूला आहे. दोन्हीतनं एकाची निवड करायचं माझ्यावर टाकलं, तर मी कम्युनिझमची निवड करीन. फॅसिझम अन् कम्युनिझम यांच्यांखेरीज आणखी रस्ता काही आज दुनियेसमोर नाही. त्यातनं एकाची निवड आपल्याला करावीच लागेल.

पंडितजींचं हे म्हणणं ऐकून सुभाषचंद्र म्हणाले होते—

The view exressed here is, according to the author, fundamentally wrong. unless we are at the end of evolution, or unless we deny evolution altogether, there is no reason to hold that our choice is restricted to two alternatives. Considering everything, one is inclined to hold that the next phase in world history, will produce a synthesis between Fascism and Communism. And will it be a surprise if the synthesis is produced in India ?

मला माहित आहे, इथं बहुतेक तुम्ही मला अडवाल. म्हणाल, हे काही नेताजींचं म्हणणं नव्हतं, हे देशगौरव सुभाषचंद्राचं म्हणणं होतं. कबूल ! हेही कबूल की नेताजींना जरी तुम्ही बघितलेलं नसलं तरी देशगौरव सुभाषचंद्रांची तुम्हाला चांगली ओळख होती. माझ्यापेक्षा चांगली ओळख होती.

मला म्हणायचं होतं ते फक्त येवढंच की युद्धाच्या आधी सहा वर्षं नेताजींनी ज्या एका शक्यतेकडे बोट दाखवलं होतं, तीच गोष्ट युद्धाच्या सुरुवातीच्या दिवसात रवींद्रनाथांनीपण खंबीरपणानं सांगितली होती. रवींद्रनाथ म्हणाले होते—

मला आशा आहे, महाप्रलयानंतर वैराग्याच्या मेघमुक्त आकाशात इतिहासाच्या एका निर्मळ आत्मप्रकटनाचा आरंभ होईल ह्या पूर्वेकडल्या सूर्योदयाच्या क्षितिजावरच !

लढाई जरा आणखी पुढं सरकल्यावर ह्या शक्यतेलाच साकार करायला सुरवात केली होती — नाही, सुभाषचंद्रांनी नाही, नेताजींनी ! निवड करायची संधी नेहरूंना मिळाली होती ! त्याचा परिणाम काय झाला तो तुम्हाला मनोमन अनुभवायला मिळालाय् ! अशी निवड करायची संधी नाही मिळाली नेताजींना. स्वतंत्र भारतात त्यांना पाऊल टाकता आलं असतं तर, माझी खात्री आहे, लेनिन न् कमाल पाशाचं एक सिंथेसिस आपल्याला बघायला मिळालं असतं !

आता दुसरा प्रश्न : नेताजी डिक्टेटर होते का? एकाच वाक्यात सांगायचं तर—आत ते डिक्टेटर होते, बाहेर ते लोकशाहीचे पुजारी होते. पण म्हंजे ह्याचा परत खुलासा करायला हवा ना ?

बुद्धीनं, राजकीय जाणिवेनं एखादा नेता आपल्या आसपासच्या अनुयायांच्या मानानं फार पुढं गेला असला, तर त्याच्यासमोर दोन वाटा खुल्या होतात. एक म्हंजे राजकारणातनं बाजूला होणं. किंवा दुसरी वाट म्हंजे लोकांच्या नजरेत डिक्टेटर होणं. नेताजी वेगवेगळ्या बाबतीत आजूबाजूच्या लष्करी सल्लागार मंडळींच्या न् मंत्रीमंडळातल्या लोकांच्या मानानं इतके पुढे गेलेले होते की वरकरणी हे डिक्टेटर आहेत असं वाटणं अगदी शक्य होतं.

वेगवेगळ्या रणांगणात सैन्य पाठवणं, युद्धाची उपकरणं जमा करणं, पैशाची व्यवस्था करणं, परराष्ट्रीय धोरण पक्कं करणं — जवळजवळ प्रत्येकच बाबतीत नेताजीच योजना आखायचे. ह्या दृष्टीनं ते डिक्टेटर होते. पण प्रत्येक महत्त्वाच्या गोष्टीतली आपली सूचना ते आपल्या विश्वासू अनुयायांच्यासमोर आधी मांडायचे. त्यांची मतं शांतपणानं ऐकून घ्यायचे. मग एकमतानं ठराव पास झाला तरच ते त्याच्या अंमलबजावणीला सुरवात करायचे. ह्या दृष्टीनं त्यांचा लोकशाहीवर फार विश्वास होता.

आझाद हिंद सेनेच्या वेगवेगळ्या रँकच्या मंडळींचा गणवेश काय असावा, राष्ट्रगीत, राष्ट्रभाषा, सैनिकांचे वागण्याचे नियम — सगळं काही त्यांनी चर्चा करूनच पक्कं केलं होतं.

इंग्लंड न् अमेरिकेच्याविरुद्ध युद्ध पुकारण्याचा ठराव कसा पास झाला ते मी आधीच तपशीलवार सांगितलंय्.

मंत्रिमंडळ किंवा लष्करी सल्लागार मंडळींना एखादं नवं धोरण मान्य होईपर्यंत नेताजी बाहेरच्या कुणालाच त्याचा पत्ता लागू द्यायचे नाहीत. कुणा परदेशी पुढाऱ्यालापण नाही न् वर्तमानपत्रवाल्यांनापण नाही.

हे सगळं जितकं खरं आहे तितकंच संपूर्णपणानं स्वतःच्या जबाबदारीवर काही निर्णय घेतानापण मी त्यांना बघितलंय्.

जर्मनीत पुरत्या आत्मविश्वासानं त्यांनी युद्धखात्याला बजावलं होतं की— भारताच्या वतीनं बोलायचा अधिकार मला आहे. ह्या सुभाषचंद्राला वेगळ्या ओळखपत्राची काहीच जरूर नाही.

भारताच्या वतीनं त्यांनी जर्मनी न् जपानकडनं जे कर्ज घेतलं होतं, त्याच्या परतफेडीचे काही हप्तेही त्यांनी देऊन टाकले होते.

आता तुम्ही विचारू शकाल की— ह्या अधिकार त्यांना कुणी दिला होता ? म्हणू शकाल की— हे तर डिक्टेटरसारखंच झालं की !

पण मी म्हणतो— नाही ! हाच काही त्यांच्याबद्दलचा शेवटचा शब्द नाही. उदाहरणार्थ, टोकिओ संमेलनाचीच गोष्ट घ्या ना—

त्रेचाळीसच्या चार जुलैला नेताजींनी क्रांतिकारक रासबिहारी बोसांच्या हातनं आय-आय-लीगची जिम्मेदारी स्वतःच्या अंगावर घेतली. पंचवीस ऑगस्टला आझाद हिंद सेनेच्या सरसेनापतीपदाचीं सूत्रं नेताजींनी आपल्या हातात घेतली. एकवीस ऑक्टोबरला

हंगामी आझाद हिंद सरकार बनवून नेताजी त्या हंगामी सरकारचे राष्ट्रपति झाले. नऊ स्वतंत्र राष्ट्रांनी ह्या हंगामी सरकारला मान्यता दिली. दोनतीन दिवसातच हिटलर-मुसोलिनीसकट कितीतरी कर्णधारांच्याकडनं नेताजींना शुभेच्छा व्यक्त करणारे संदेश मिळाले. म्हंजे भांडणाऱ्या जगातल्या एका बाजूनं नेताजींचं नेताजीपण सपशेल मान्य केलं !

आता ह्या पार्श्वभूमीवर, आझाद हिंद सरकार बनवल्यानंतर एका आठवड्यानं जपानच्या प्रधानमंत्री तोजोंनी नेताजींना टोकिओत यायचं निमंत्रण दिलं. ग्रेटर ईस्ट-एशिया नेशन्स कॉन्फरन्समधे भारताचे प्रतिनिधि म्हणून भाग घ्यायला.

हे निमंत्रण स्वीकारायला नेताजी तयार झाले नाहीत.

त्यांनी कळवलं—एशियन कॉन्फरन्समधे भारताचं प्रतिनिधित्व करायचा अधिकार मला नाही ! मी निव्वळ निरीक्षक म्हणूनच हजर राहू शकेन !

नेताजी डिक्टेटर होते का नाही ते ठरवायचं असेल तर ह्या सगळ्या घटनांचं तात्पर्य काय ते बारकाईनं बघावं लागेल.

हरिपुरा न् त्रिपुरीच्या मैदानावर भारतानं आपल्यावर फक्त एकच जबाबदारी टाकलेली आहे न् ती म्हंजे परदेशी राज्यकर्त्यांना हाकलून भारताला मुक्त करायचं—अशी नेताजींची श्रद्धा होती. स्वातंत्र्यसंग्राम चालवायची जबाबदारी त्यांच्यावर होती. म्हंजे 'भारतवर्षाच्या वतीनं बोलायचा अधिकार' त्यांना होता ! म्हंजे 'ह्या सुभाषचंद्राला वेगळ्या ओळखपत्राची काहीच गरज' नव्हती !

पण त्यांना ठाऊक होतं की आपल्या ह्या अधिकाराला मर्यादा आहेत ! युद्ध संपल्यावर स्वतंत्र भारत काय करेल त्याबद्दल काहीही शब्द द्यायला ते नाराज असायचे !

म्हणूनच ह्या ऐतिहासिक कॉन्फरन्समधे भारताचे प्रतिनिधी म्हणून जायला त्यांची स्वतःचीच हरकत होती ! हंगामी आझाद हिंद सरकारपुढं फक्त एकच ध्येय होतं—भारताला स्वतंत्र करणं ! पण म्हणून आधीच काही शब्द देऊन पुढं येणाऱ्या 'स्वतंत्र' भारत सरकारला पेचात टाकायचं मात्र ह्या हंगामी सरकारच्या मुळीच मनात नव्हतं !

ह्या टोकिओ-संमेलनात सरतेशेवटी नेताजींनी भाग घेतला. पण तो निरीक्षक म्हणूनच ! भोसलेजी, आनंदमोहन सहाय, मेजर आबिद हुसेन न् मी असे बरोबर गेलो होतो.

ह्या संमेलनात घडलेली एक घटना मी प्रत्यक्ष पाहिलेली आहे. तीच आता सांगतो.

जपानी प्रधानमंत्री तोजोंनी संमेलनात एक घोषणा केली. नुकतीच मुक्त केलेली अंदमान न् निकोबार ही दोन्ही बेटं हंगामी आझाद हिंद सरकारच्या ताब्यात देण्याची जपान-सरकारची इच्छा आहे—असं ते म्हणाले.

संमेलनात बोलताना ह्याचा उल्लेख करून नेताजी म्हणाले होते—ब्रिटि-

शांच्या जोखडातनं मुक्त झालेल्या ह्या दोन बेटांचं भारतीयांना फार महत्त्व आहे. ह्याला दोन कारणं आहेत. ही भारताची अशी भूमी आहे जी सर्वात आधी स्वतंत्र झाली ! दुसरं म्हंजे अंदमानचा एक खास वारसा आहे. भारताला मुक्त करण्याकरता ज्यांनी आपल्या प्राणाची आहुती द्यायला मागं पुढं पाहचलं नाही, त्या वीरांना इंग्रज सरकार हृया बेटावरच डांबून ठेवायचं. फ्रेंच क्रांतीत जसं पॅरीस पडायच्या आधी बॅस्टिलचा तुरुंग पडला, तसंच दिल्ली पडायच्या आधी हा अंदमानचा तुरुंग पडला ! अंदमान शहीदांच्या रक्तानं लाल झालेलं आहे. निकोबारमधे आमच्या स्वराज्यप्राप्तीचं स्वप्न साकार झालेलं आहे. म्हणून हृया नुक्त्याच स्वतंत्र झालेल्या दोन्ही बेटांना आम्ही नवी नावं देणार आहोत. अंदमानचं नाव 'शहीद द्वीप' न् निकोबारचं नाव 'स्वराज द्वीप !'

ह्याच संमेलनात आणखी एक घटना घडली होती. तीही मी प्रत्यक्ष पाह्यलेली आहे. आता ह्या निमित्तानं तीपण इथंच सांगून टाकतो.

तोजो होते ह्या संमेलनाचे अध्यक्ष. एका भाषणात ते म्हणाले—आशिया फक्त आशियाई लोकांच्या करताच आहे ! युरोप न् अमेरिका इतके दिवस आशियाचं शोषण करत आलेय्त. पण आता आम्ही ते होऊ देणार नाही. एकामागोमाग एक आशियातले सगळेच देश स्वतंत्र होतायुत न् होतच जातील. ह्यात भारत हा एक मोठ्ठा देश आहे. त्याचे अडतीस कोट लोक स्वातंत्र्याच्या दाराशी येऊन ठेपलेयत. नेताजी भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाची सूत्रं हलवतायत. मला असा दृढ विश्वास आहे की त्यांची साधना सफळ होईलच होईल ! लवकरच ते आपल्या मुक्तिसेनेनिशी दिल्लीला पोचतील. परक्या राज्यकर्त्यांना हाकलून काढून स्वतंत्र भारताचे राष्ट्रपती बनून देशाला सुजला-सुफला बनवतील !

तात्काळ नेताजी उठून उभे राह्यले होते !

विनयानं पण खंबीरपणानं म्हणाले होते—माननीय अध्यक्षांच्या ह्या शेवटच्या मुद्द्याबद्दल मी माझी तीव्र हरकत नोंदवण्याकरता उभा आहे ! भारताला स्वतंत्र करणं एवढीच माझी जबाबदारी आहे. नंतरच्या कोणत्याच गोष्टीबद्दलची चर्चा ह्या संमेलनात माझ्या हजेरीत होऊ द्यायला माझा विरोध आहे. स्वतंत्र भारताचे कर्णधार कुणी व्हावं न् कुणी होऊ नये ही गोष्ट स्वतंत्र भारतवासीच तेवढे ठरवतील ! ह्या बाबतीत जपानच्या प्रधानमंत्र्यांचा काहीही सल्ला मोठ्या विनयानं नाकारणंच आम्हाला भाग आहे !

तोजो शरमिंदे झाले. त्यांनी आपले शब्द मागं घेतले.

नेताजी डिक्टेटर होते का नाही ते आता तुम्हीच सांगा बरं !

(क्रमशः)

## क्रीडांगण

# राज्य अजिंक्यपद व चाचणी स्पर्धा – नाशिक

डॉ. नरेन्द्र दाभोळकर

मातीशी मस्ती करणाऱ्या धुसमुसळ्या कबड्डीचं नाशिककरांना दिसलेले रूप हे खरोखरच विलोभनीय होते. आतापर्यंत कुठल्याही कबड्डी सामन्याला लाभले नसेल असे देखणे प्रवेशद्वार, अजंठा वेरूळमधल्या कलाकृतींनी सजवलेलं. प्रशस्त शामियाने आणि गॅलरी. त्या दोघांच्याही मागे सुमारे दीडशे फूट लांब आणि १२ फूट रुंद एवढ्या प्रचंड आकाराची पांढरी शुभ्र कापडी आच्छादने. खेळाडूंना वैयक्तिकरीत्या मिळालेली देखणी बक्षिसे. अमाप गर्दी, प्रचंड प्रसिद्धी. टेलिव्हिजनवरचे चित्रीकरण. गावरान खेळ म्हणून सुशिक्षितांनी नाकं मुरडावीत असा कालपरवाचा कबड्डी तो हाच का असा विस्मय वाटावा असेच हे रूप होते.

महाराष्ट्र पातळीवर भरणाऱ्या या राज्य अजिंक्यपद चाचणी स्पर्धांचा आणि महाराष्ट्र राज्य प्रातिनिधिक संघ निवडीचा सोहळा हे प्रतिवर्षी महाराष्ट्रातील कबड्डीपटूंचे वाढते आकर्षण ठरत आहे. आणि म्हणूनच त्यासंबंधी त्या प्रसंगाने निर्माण होणाऱ्या प्रश्नासंबंधी हे थोडे विवेचन. (खेळाचा भाग वृत्तपत्रातून यापूर्वीच रसिकांपर्यंत पोचलेला आहे. त्यामुळे तो वगळला आहे.)

ज्या खेळाला आणि सामन्यांना व्यापक प्रसिद्धी लाभली आहे ते अधिकाधिक नेटके आणि निर्दोष व्हावेत असा अर्थातच प्रयत्न व्हावयास हवा. त्यासाठी अनेक छोटयामोठया दोषांची वा बदलांची दखल घेण्याची तयारी संयोजकांनी दाखवावयास हवी. अविकसित भागात कबड्डीचे लोण पोचावे या साठी हे सामने दरवर्षी दूरवर भरवले जातात. मागल्यावर्षी रत्नागिरीला झाले. यावर्षी नाशिकला तर पुढच्या वर्षी अलीबागला होतील. सामने पाच दिवसाचे. पहिल्या दिवशीच्या संचलनाच्या रंगीत तालमीला हजर राहणे अत्यावश्यक. त्यामुळे येण्याचा आदला दिवस आणि जाण्याचा नंतरचा एक दिवस. सात दिवसांची रजा आणि भोजनाचा खर्च हे खरोखरच खेळाडूंना जड पडते. माझ्या मते ते अनावश्यकही आहे. सरासरी सोळा स्त्री व सोळा पुरुष संघ या सामन्यात उतरतात. एवढ्या संघांचे सामने व्यवस्थितपणे ३॥ दिवसात उरकता येतात. सकाळची संचलनाची तालीम, दुपारी तीनला

ठेवल्यास सकाळचा अर्धा दिवस खेळाडूंना मिळून फक्त तीन दिवसांच्या रजेत (सामने रविवारला जोडून असतात हे गृहीत धरून) आणि कमी खर्चात खेळाडूंचे भागू शकेल. संयोजकांनाही सोईचे होईल. सुटसुटीत परंतु देखणे संयोजन हेच यशस्वी सामन्याचे गमक नव्हे काय ?

इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा खेळाचे मैदान हा खेळाडूंच्या सर्वात अधिक जिव्हाळ्याचा विषय असतो. अनेक मान्यवर सामन्यातील मैदाने दुर्दैवाने या कसोटीला उतरत नाहीत. नाशिकलाही असेच घडले. मैदान कसे करावे (प्रथम किती खणावे, तांबडी माती, गाळाची माती, शेण वगैरे किती, रोलिंग किती वगैरे) याबाबत निश्चित निकष ठरवून ते सर्व संयोजकांना पाळायला लावणे आता खेळाडूंच्या दृष्टीने अत्यावश्यक झाले आहे. महाराष्ट्र राज्य कबड्डी असो. च्या नेतृत्वाखाली होणाऱ्या सामन्यात तरी हा आदर्श निर्माण करण्यास काहीच हरकत नाही. मागच्या वर्षी रत्नागिरीला तीनपैकी एका मैदानाचा सामना चालू झाल्यावर आखाडा होत होता तर यंदा सर्वच मैदाने कठीण होती आणि खेळाडूंचे पाय जोरात घसरत होते. पाणी मारून हे दोष काही प्रमाणात कमी करता आले तरी प्रत्येक सामन्यात प्रत्येक पाच-दहा मिनिटांनी पाणी मारणे शक्य झाले नाही व योग्यही नव्हे. याला असलेला पर्याय म्हणजे मॅटवरची कबड्डी. याचा खरोखरच गंभीरपणे विचार व्हावयास हवा. त्यात ना पाणी मारण्याचा त्रास, ना मैदान आखण्याचा, ना बारीक दगडांची गैरसोय. पाऊस आला तर मैदान गुंडाळून आत आणले. एकदा दहा हजार रु. खर्चून जर तीन मॅटस् क्रीडाखात्याने तयार केली तर रेल्वेने ती सहज सामन्याच्या जागी नेता येतील. अनेक नवे प्रयोग करणारी म. रा. क. अ. याबाबत उदासीन का हे कळणे कठीण आहे. क्रीडांगणाबावतच्या आणखी काही गोष्टींचा उल्लेख करावयास हवा. रात्रीचे सामने हे ट्यूबलाइटच्या प्रकाशात अधिक चांगले खेळता येतात हे सत्य आहे. मैदानाच्या चारी बाजूला आणि शक्यतो वरच्या तारांच्यावरती बल्ब ऐवजी ट्यूबलाईट लावण्याची व्यवस्था कटाक्षाने राहील याकडे यापुढे लक्ष द्यावयास हवे.

शामियान्यात खास निमंत्रित, देणगीदार आणि खेळाडू यांच्यासाठी खुर्च्या राखून ठेवण्यात आल्या होत्या. जवळ जवळ ओळीने पंधरा रांगात मांडलेल्या त्या खुर्च्यांच्या पहिल्या दोन रांगा सोडून मागच्या रांगाचा काहीही उपयोग सामना बघण्यासाठी होत नव्हता. यामुळे अर्थातच सर्वांची गैरसोय आणि खुर्च्यांची भरपूर मोडतोड झाली. ही साधी गोष्ट संयोजकांच्या शेवटपर्यंत लक्षात येऊ नये हे आश्चर्यच. विशेषत: विदर्भातील सर्वच सामन्यात खुर्च्यांची ज्या टप्प्या टप्प्याच्या चढत्या पद्धतीने मांडणी केलेली असते ती अनेकवेळा बघूनही अशा महत्त्वाच्या सामन्यात ही चूक व्हावयास नको होती. यामुळे

अनेक लोक नाराज झाले. कोणालाच नीट सामने बघता आले नाहीत आणि भारी तिकीटे घेऊनही धक्काबुक्की करत उभे रहाण्याची वा जमिनीवर बसण्याची पाळी आली. निदान पुढच्या वेळेस तरी हे टाळले जावे.

सकाळचे महिलांचे सामने ७॥ ला चालू होतील असे आधी जाहीर झाले होते. नंतर अपेक्षेप्रमाणे ते आठला चालू करण्याचे ठरले. मागच्या वर्षीही नेमका हाच बदल याचप्रमाणे करण्यात आला होता. सामने ठरल्यावेळी चालू करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कबड्डी असोशिएशनचा लौकीक आहे. (अवघ्या तीन मिनटाच्या उशिरासाठी औरंगाबादचा संघ बाद केल्याची सांगलीची आठवण फार जुनी नाही) सामने सकाळी ७॥ ला सुरू करणे अनेक दृष्टिने अशक्य असते याची जाणीव ठेवून निदान यापुढे तरी वेळ जाहीर करतानाच अशी करावी की जी बदलण्याची नंतर पाळी येणार नाही.

संचलनाच्या रंगीत तालमीला जो खेळाडू हजर रहाणार नाही तो कितीही मोठा असो त्याची गय होणार नाही आणि त्याच्या निवडीचा विचार होणार नाही हे उच्चरवाने मागीलवर्षी आणि यावर्षीही परिपत्रकाद्वारे आणि प्रत्यक्षात मैदानावर सांगण्यात आले आणि तरीही अशा एका खेळाडूची निवड वीस जणांच्यात व्हावी हे खटकले. संचलनाच्या रंगीत तालमीबद्दल एवढी कडवी आग्रही भूमिका घ्यावी की नाही हा प्रश्न आहे परंतु जर एकदा ती घेतली गेलीच तर त्याचे पालन व्हावे. मैदानाला देखणेपणा देण्याचे अनेक प्रयत्न झाले होते. राणाप्रतापच्या रौप्यमहोत्सवी सामन्यात यंदा वीजेच्या गुणफलकावर स्कोअर आणि वेळ कळण्याची जशी सोय झाली होती तशी सोय ही यापुढे प्रत्येक राज्य अजिक्यपद स्पर्धेत व्हावी. त्याचा प्रसार मग इतर खाजगी सामन्यात होण्यास वेळ लागणार नाही.

उत्साहाच्या भरात काही आवश्यक गोष्टींकडेही दुर्लक्ष झाले होते. स्टँडवर खेळाडू उतरवून घेणाऱ्या स्वयंसेवकाना उतरण्याची नेमकी सोय कोठे आहे याची कल्पनाच नव्हती तर खोलीमध्ये सतरंजी, बादली कुलुप अशा गोष्टी खेळाडूंना पुरविण्याचा एक संकेत असतो हे सामना समितीला बहुधा कोणी सांगितले नसावे.

सव महिला खेळाडूंना जेवण देण्याची व्यवस्था नेहमीच केली जाते. बाकीच्या सर्व अवास्तव खर्चांना काट देऊन मला वाटते पुरुष खेळाडूंना भोजन देण्याच्या शक्यतेचा सर्वप्रथम विचार व्हावयास हवा. अवघे १३० खेळाडू. प्रत्येक वेळच्या जेवणाला १ रु. या हिशोबाने न्याहारीसकट सर्व खेळाडूंचा जेवणाचा खर्च दिवसाला ३०० रु. म्हणजे पाच दिवसात १५०० रुपयात सर्व काही भागले असते. यातला काही भाग सामना समिती व काही भाग खेळाडू यांनी उचलावयाचा ठरवला असता तरी हे सहज शक्य झाले असते. सामन्याच्या बाह्य झगमगाटात काट करून

हे पैसे कोठेही वाचवता आले असते. अगदीच शक्य झाले नसते तर अल्प किमतीत तरी खेळाडूंच्या जेवणाची सोय करावयास हवी होती. कारण अनेक खेळाडूंच्या खिशाला बसणारा ३०-४० रु. चा फटका त्यामुळे वाचला असता. ज्या ज्या सामन्यात महिलांच्या जेवणाची सोय असते त्या सर्व ठिकाणी हा विचार यापुढे सामना समितीने मनात ठेवावयास हवा.

बातमीदारांनी या सामन्यात अक्षरशः धमाल आणली. महाराष्ट्र टाईम्सने सातारा सोलापूरकडून हरण्याची बातमी उलटी करून छापली तर ज्या सामन्यात वसंत सूदने मोजून दोन चढाया टाकल्या त्या सामन्यात वसंत सूदचा चौफेर चढाईचा बहारदार खेळ असे लोकसत्ताकारांनी छापले. महिलांच्या अंतिम सामन्याबद्दल चित्रा नाबरने पकड करून पहिला गुण मिळवून दिला असे अगाजे घडलेचि नाही ते वृत्त केसरीकारांनी दिले. स्थानिक पेपरात तर हा गोंधळ मोठ्या प्रमाणावर होता. याची अनेक उदाहरणे देता येतील. यामुळे अनेक उलट सुलट चर्चेला खेळाडूंना आपल्या जिल्ह्यात गेल्यावर तोंड द्यावे लागले. मैदानावरील मर्दुमकीपेक्षा लेखणीच्या कामगिरीवरच खेळाचा कस लागल्याची विचित्र स्थिती निर्माण झाली.

शेवटी एक गोष्ट महत्त्वाची. या सामन्याचे पालक आणि चालक होते श्रीमान खेकियनजी सारडा. त्यांनी सामन्याचा बराचसा खर्च एकमुठीने केला. कॉलेजातील संतप्त युवक आणि आखाड्यातली व मैदानावरची तरुण मुले राष्ट्र घडवतात किंवा त्यांनी ते घडवावे असे मानले जाते. सरकार, भांडवलदार, सहकारी साखर कारखाने अनेक अंगानी शैक्षणिक क्षेत्रात घुसली आहेतच. कुस्तीच्या क्षेत्रातील मजबूत मने आणि मनगटेही काँग्रेसच्या गावगुंडगिरीसाठीच पोसली जातात हा अनुभव आहेच. कबड्डीचे क्षेत्र भरभराटीला येणार असे दिसताच अनेक शेठजी तेथे शिरत आहेत. संघटनेच्या वा संस्थांच्या भल्यासाठी सत्ताधीशांना या संघटनांचे चालकत्व देण्याशिवाय संघटकांना पर्याय रहात नाही. सर्वसामान्य गरिब खेळाडू पुढच्या मानमरातबाच्या आशेच्या थोड्या लोभाने आणि लाचारीने या सर्वांपुढे जी हुजुर म्हणत आहे. प्रस्थापिताला आव्हान देणारी वृत्ती व्यायामसंस्थेतून वा खेळाच्या मैदानावरून तयार होईल अशी शक्यता फारच कमी दिसते. ज्या राष्ट्राला एका समग्र परिवर्तनाची गरज आहे त्या राष्ट्रातील उत्साही तरुणांनी केवळ खेळासाठी खेळ आणि खेळाचे भले यासाठी या दादा लोकांचे अनुयायित्व स्वीकारणे योग्य आणि अंतिम हिताचे आहे का याचाही विचार करण्याची वेळ आता आली आहे.

□ □ □

# सबै...
# सांस्कृतिक मद्रास

चंद्रकांत अंबाडे

कुंडीतच्या गुलाबाला कधीकधी दोन तीन टप्पोरी फुलं येतात आणि तीही कशी ? तर मुद्दाम रचना करावी अशी मोहक अन् वैशिष्टयपूर्ण ! रचनात्मक ! ! निसर्गही जणू ' इकेबाना ' पंडीत बनून जातो. तसाच काहीसा प्रकार आमच्या मद्रासला सांस्कृतिक कार्यक्रमांच्या बाबतीत सध्या झालेला आहे. मुद्दाम उभारूनही अशी सुरेख यंत्रणा काही कुणाला जमली नसती. आपोआपच गेल्या दोन-तीन वर्षांत हे घडून आले आहे व त्याचेच पडसाद आता पुण्यामुंबईस दिसत आहेत.

दूर कशाला ? स्वत:वरूनच पहाना. आठवडाभराचे सहा दिवस कसे सर्कन् निघून जातात ते समजूनही येत नाही. एकुलता एक मग रविवार असतो. वाटतं सिनेमाला जावं, नाटकाला जावं, नाहीतर शास्त्रीय संगीताची मैफल पसंत करावी. कुणातरी नर्तकीचे नृत्याचे, बॅले नृत्यनाटच बघायचेही मनात असते...आणि खूप खूप ! आता प्रत्यक्षात काय घडते ? थिएटरांचे बाहेर मोठमोठे क्यू तिकिटांसाठी. सायंकाळी सहाचा शो असेल तर प्रत्यक्ष रांगेत तीनपासून उभे राहणाऱ्यांनाच तिकिटे मिळणार. ॲडव्हान्स बुकिंग फक्त भारी तिकिटांचेच होते आणि त्यासाठी सकाळची मस्त साखरझोप मोडून थिएटरवर जायचं जिवावर येते. एका ठिकाणी तिकिटे न मिळाली म्हणून दुसऱ्या थिएटरवर, तिथून तिसऱ्यावर, असे करीत करीत शेवट काय होणार ? कुठल्यातरी भुक्कड थिएटरमधे जो कोणता असेल तो सिनेमा पहावयाचा नाहीतर कुठल्यातरी उपहारगृहात सहकुटुंब जावून परतायचे ! ना सिनेमा, ना नाटक !

आमच्या मद्रासमधील मंडळींनी ह्यावर एक सुंदरसा उपाय शोधला. चार धडपडी मंडळी एकत्र आली अन् एक ' सभा ' स्थापिली. मराठीत मंडळ म्हणतात ना ? त्यालाच तमीळमध्ये सबै म्हणतात. सभेचे सभासदत्व ठरले गेले व मासिक वर्गणी देखील ठरली. किती सीटस् त्यावर पुन्हा कमी अधिक आकार ठरला गेला. एकदा समजा तुम्ही त्या ' सबै 'चे सभासद झालात की, दरमहा तुम्हाला तीन किंवा चार पासेस एकदमच मिळणार. चार

रविवारचे चार कार्यक्रम—चार निरनिराळ्या प्रकारचे अन् निरनिराळ्या चार ठिकाणी—निरनिराळ्या वेळीसुद्धा. तुमच्या पासावर खुर्चीचा क्रमांक तर असेलच, पण त्या दिवशीच्या कार्यक्रमातील प्रमुख भूमिका, दिग्दर्शक, लेखक ही सर्व माहिती छापलेली असेल. पासाचे पाठीमागे शेजारच्याच एखाद्या कापड दुकानाची जाहिरात असेल. खुर्चीवर बसल्याबसल्याच नकळत तुम्ही जाहिरात वाचूनही टाकाल. कार्यक्रम तुम्हाला आवडणारा असला तर कार्यक्रमाचे आधी केवळ पाचच मिनिटे थिएटरवर जा. समजा त्या रविवारी दुसरी काही एंगेजमेंट असेल, पास कुणा दोस्त मित्राला देऊन टाका—सबैचे तसे बंधन नाही. एखाद्या रविवारी जर विनोदी नाटक असेल, तर पुढच्या रविवारी शास्त्रीय संगीत न् नृत्ये, कधी चित्रपट तर कधी लाईट म्युझिकची कुणाचीतरी नाईट, तर कधी सरकारचे जादूचे प्रयोग, तर कधी कवी संमेलन !

ह्या 'सबै' पद्धतीने झालेले फायदे तर पाहाल ? तिकिटांसाठी अॅडव्हान्स बुकिंग नको वा क्यू नकोत. सिंगल मेंबरशिप तीन रुपये, तर दोघांचे पाच रुपये अन् तशाच प्रमाणात अधिक ! वार्षिक दोन अडीचशे भरून स्पेशल सभासदत्व व पाच सात सीटस् प्रत्येकवेळी रिझर्वड् ! एखादे नाटक गावात गाजत असेल म्हणून त्याचे प्रयोगास जाण्यासाठी हुरहूर लागत नाही, कारण आज ना उद्या आपण सभासद असलेली सभा ते नाटक एखाद्या रविवारी ठेवणारच. आज मद्रासला अशा सुमारे २५।३० सभा असून, प्रत्येकीचे हजारभर सभासद आहेत. त्यामुळे नाटके बसविणाऱ्या हौशी कलावंतांचे तर पहिले २५।३० प्रयोग ठरूनच गेलेले जणू ! सभावाले आपापल्या मेंबर्सना वाटून शिल्लक उरलेल्या खुर्च्या ऐनवेळी येणाऱ्यांना देऊन आणखी १००।१२५ तिकिटे प्रत्यक्ष


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी** (S. N.) पो. कतरी सराय (गया)

प्रयोगाचे वेळी खपवितात. ह्या मुळे सभेलाही चार पैसे सुटून, प्रत्येक सभा आपापले स्वतंत्र थिएटर उभारण्याच्या मागे लागलीय. मद्रासच्या ' मैलापूर फाईन आर्टस् 'चे सभागृहात कोणत्याही नाटकाचा पहिला प्रयोग होणे जणू बहुमानच ! ' म्युझिक ॲकेडमी ' तर खास नाटकांसाठी बांधलेली वातानुकूलित इमारत, महिन्याचे तीसही दिवस बुक्ड् असते मद्रासमधील नारद गान सबा, ब्रह्मा गान सबा, ओम् विघ्नेश्वरा, गीताजंली ह्या सुप्रसिद्ध आहेत. त्यांचे सभासदत्व म्हणजे एक मानच.

मेजर सुंदर राजन यांचे ' सौदम् ' सामाजिक नाटक, तर सध्याचे गाजणारे आहे. परवाच म्युझिक ॲकेडमीत त्या नाटकाचा ७५ वा प्रयोग मी पाहिला. त्यांच्या ह्या पूर्वीच्या ' अच्चाणी ' नाटकावर बोलपट तयार होत आहेच. कौटुंबिक कथानकावर कारैकुडी नारायणचा कटाक्ष. शशिकला आणि भानूमती दोघींच्या सोज्वळ भूमिका ! सौदम् म्हणजे स्वत्व ! मी पण ! मूलजन्मतःच गेल्याची ती बातमी शशिकलेला कशी सांगावी ही निरोप्याची अडचण. पण हातातली खेळण्याची बाहुली खाली पडून फुटणे ही कुशल् दिग्दर्शनाची सूचकता ! शिवकुमार आणि राजगोपाल दोघेही नाटक सांभाळून नेतात. सुंदर राजन् यांनी कधीही मिलिटरीत बंदुक धरलेली सुद्धा नाही. पण ' मेजर चंद्रकांत ' बोलपटांतील त्यांची भूमिका इतकी गाजली की, त्यांना सारे मेजरच म्हणू लागले.

मध्यावधी निवडणकांचेवेळी खास आणले ' च्यो ' यांचे ' इन्ब कणा ओन्रू कंडन ' आणि ' पद्मव्यूव्ह ' ही नाटके अजूनही गाजत आहेत. शिवाजी गणेशन् चे ' थंगपदकम् 'मध्ये तसा काही दम नाहीय. नाही म्हणायला दोन अभिनव नाटके आत्ताच स्टेजवर येत आहेत. सुप्रसिद्ध लेखक पत्रकार ' च्यो ' यांचे नाटक आहे ' यारक्कुम् वेक्यम् इल्ले ' (म्हणजे कुणालाही लाज नाही) आणि मनोहर यांचे ' विश्वामित्रम् '— भव्य सेटिंग्जचे पौराणिक ! ◻ ◻ ◻

मध्यंतर

# सुमित्रा

## राज्यनाट्यस्पर्धेतील बडोद्याचे नाटक

प्रतिनिधी

यंदाच्या नाट्यस्पर्धेत 'बरोडा ॲम्यॅच्युअर्स ड्रॅमॅटिक क्लब'ने माधव आचवल यांचे 'सुमित्रा' हे नाटक सादर केले. माधव आचवल यांना ललितलेखक, रसिक समीक्षक म्हणून आपण सारेच ओळखतो. अलीकडे 'सत्यकथे'त प्रसिद्ध झालेल्या एकांकिका ज्यांनी वाचल्या असतील त्यांच्या लक्षात आलेच असेल की या ललितनिबंधकाराला नाटक या माध्यमाविषयी स्वारस्य वाटू लागले आहे.

'सुमित्रा' या माधव आचवलांच्या दोन अंकी नाटकात प्रत्येक अंकाचे स्वरूप वेगळे आहे. पहिला अंक सुरू होतो एका हॉटेलच्या खोलीत–रांगणेकर या प्रतिष्ठित विक्रेत्याला दोन पोलीस इन्स्पेक्टर भेटायला येतात. त्याच्या गिऱ्हाईकाच्या पत्नीच्या खुनाचा आरोप त्याच्यावर आहे असे सांगतात. गुप्तपोलीसी कथाकादंबऱ्यातून, नाटकातून आपल्याला परिचित असणारी प्रश्नोत्तरे –उलटतपासणी सुरू होते. रांगणेकर व ज्यांचा खून झाला त्या सौ. पाटील यांचे अनैतिक संबंध असावेत या कल्पनेतून त्यांना प्रश्न विचारले जातात. रांगणेकर मात्र सौ. पाटीलांविषयी घृणा व्यक्त करतात. मात्र ते काहीतरी लपवीत आहेत, न्यायालयात केस जाऊ नये यासाठी अस्वस्थ आहेत हे प्रेक्षकांच्या लक्षात येते. सौ. पाटील यांच्याकडून निघाल्यानंतर मध्यरात्री हॉटेलमध्ये परत येईपर्यंत आपण कुठे होतो हे रांगणेकर सांगत नाहीत. आणि तेवढा एकच पुरावा त्यांना निर्दोषी ठरवू शकतो. ते आपल्या पत्नीला – सुमित्रेला बोलावून घेतात. दुसरा प्रवेश सुरू होतो त्यावेळी खरा खुनी सापडला आहे, तरीही चौकशी पुरी झाली पाहिजे, असा पोलिसांचा अट्टाहास आहे. आणि सुमित्रेने पुढील चौकशीच्यावेळी

बाहेर जावे अशी त्यांची आग्रहाची सूचना आहे. अशा प्रसंगी मी पतीपासून दूर जाणार नाही – आम्ही एकमेकांपासून काही लपवीत नाही असे सांगून सुमित्रा त्या खोलीतच राहते. खुनाच्या रात्री १०॥ ते ११॥ रांगणेकर कुठे होते ते आम्हीच शोधले आहे – आम्हीच साक्षीदार आणला आहे असे पोलिस सांगतात आणि जिला हॉटेलचे नोकर मेमसाब म्हणतात त्या रत्नाला हजर केले जाते. सुमित्रा आणि रत्नाला समोरासमोर आणायला सी. आय. डी. इन्स्पेक्टर व स्वतः रांगणेकर घाबरत असतात. पण प्रत्यक्षात त्या दोघी समोर आल्यानंतर सहजपणे एकमेकींशी बोलतात. जणू एकमेकींचे अस्तित्व त्यांना अनेक वर्षे माहीतच होते. इथे आरोपाची चौकशी थांबते आणि खऱ्या नाटकाला प्रारंभ होतो. कारण आचवलांचे 'सुमित्रा' हे नाटक गुन्हा संशोधनाच्या तर्कशास्त्रातून निर्माण झालेले नाही. मानवी नात्यांविषयीचे हे नाटक 'पत्नी–पती–प्रेयसी' या त्रिकोणाविषयीचे आहे. मुंबईच्या एका महाविद्यालयाची प्राचार्या असणारी सुमित्रा रत्नाच्या भेटीचा प्रसंग तोल सावरून साजरा करते. पण सारी माणसे निघून गेल्यावर तिला हा अपमान सहन होत नाही. नाईलाजाने आपले रहस्य तिच्याजवळ प्रगट करणाऱ्या पतीची तिला घृणा वाटते. घटस्फोटाशिवाय वेगळा मार्गच नाही असा निश्चय ती करते उलट सुमित्रेला अंधारात ठेऊन आपल्याला फसविण्यात आले हे रत्नाला सहन होत नाही. रांगणेकरांचीही काही कैफियत आहे. सोबत शोधणाऱ्या तीन एकाकी मनांची ही कथा. एखाद्या संकटसमयी मानवी नात्यांची कसोटी लागते असे आपण म्हणतो– अशा संकटाची व या कथावस्तूची सांगड घालण्याची आचवलांची कल्पना मला आवडली. परंतु नाटकाच्या उत्तरार्धात मानवी नात्याची कथावस्तु इतकी अकार्यक्षमतेने व्यक्त झाली की दोन कथावस्तूंच्या रचनेच्या चलाख कल्पनेशिवाय नाटकात फारसे काही उरले नाही.

'सुमित्रा' या नाटकातील प्रमुख तीन भूमिका :– सुमित्रा (कल्पना परळीकर), रांगणेकर (राम कारळे) रत्ना (रंजना पाठक) करणारे कलावंत इतके कमकुवत होते की नाटककाराला जो गहन अनुभव संयतपणे व्यक्त व्हावा असे वाटत होते तो व्यक्तच झाला नाही. कारळे यांचा चेहरा संवेदनाक्षम नव्हता. परळीकरांना तर रंगमंचावर वावरण्याचे साधे संकेतही माहीत असल्याचे दिसले नाही. कु. पाठक यांचा आवाज सदोष होता; शिवाय आपली असाधारण उंची त्यांना डौलाने सावरता येत नव्हती. मोघे व आदी (सी. आय. डी. इन्स्पेक्टर १ व २) यांनीच भूमिका समजून सादर केल्या. परंतु दिग्दर्शक म्हणून मोघे यांना अपयशच हाती आले. नेपथ्यकार त्रिवक गाडगीळ-यांनी हॉटेलच्या खोलीची उभ्या छेदांची (panels) सजावट चांगली साधली होती.

मराठी साहित्यिकांच्या वर्तुळामध्ये

ज्या व्यक्तिमत्वाविषयी आपण विशेष आदर बाळगतो त्या आचवलांचे नाट्यलेखन व दरवर्षीच्या राज्यनाट्यस्पर्धेतील प्रयोगाचा विशिष्ट दर्जा सांभाळणारी संस्था यामुळे उचावलेल्या अपेक्षांची 'सुमित्रा 'ने निराशा केली. ◘

# घरटे अमुचे छान

## विजय तेंडुलकरांचे नवे नाटक

विजय तेंडुलकरांच्या नव्या नाटकाचा पहिला प्रयोग ही मुंबई नाट्यजगतातील विशेष घटना असते. ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात जवळ जवळ साऱ्या हौशी संस्था आणि मातब्बर दिग्दर्शक सरकारी स्पर्धेच्या तयारीत असताना कमलाकर सारंग यांनी 'वेलकम थिएटर्स 'तर्फे 'घरटे अमुचे छान ' हे नवे नाटक रंगभूमीवर आणले. या नाटकाच्या पहिल्या प्रयोगाची वार्ता आली त्याचबरोबर 'या प्रयोगाला परवानगी मिळणार का ? एकाच प्रयोगाला मिळणार का?' असे प्रश्नही वातावरणात ऐकू येत होते आणि खरोखरच प्रयोगाच्या आदल्या दिवशीही दिग्दर्शक व निर्माते यांना संबंधित अधिकाऱ्यांनी पुरेसा त्रास दिला अशी बातमी आहे. या तपशीलाचा उल्लेख करण्याचे कारण असे की, ज्या पहिल्या प्रयोगाच्या आधारे मी प्रस्तुत परीक्षण लिहीत आहे त्या प्रयोगाच्या तांत्रिक सुविधांवर वरील गोष्टींचा अनिष्ट परिणाम दिसत होता. नाटक पाहताना असे लक्षात आले की, प्रयोगाची परवानगी मिळविण्यास त्रास व्हावा असे या नाटकात काही नव्हते. याचाच अर्थ, 'बाइंडर 'शी संबंधित निर्माते-दिग्दर्शक-लेखक याच नात्याने हा त्रास देण्यात आला असा होत नाही का ?

'घरटे अमुचे छान ' हे तेंडुलकरांचे नवे नाटक 'असावे घरटे अपुले छान ' ही आकांक्षा बाळगून गृहस्थी करणाऱ्या आणि जगात काहीही उत्पात चालू असले तरी 'घरटे अमुचे छान ' या स्वप्नात मशगुल असणाऱ्या उच्च मध्यमवर्गीय गृहस्थी बाण्याचे चित्र रंगविणारे आहे. नाटकाचा पडदा वर जातो त्यावेळी एका संपन्न घरातील एक मध्यमवयीन स्त्री (सौ. सुलभा देशपांडे) दूरध्वनीवरून टेपरेकॉर्डर, मिक्सर इत्यादी विषयावर बोलत असते. या साऱ्या बोलण्यातून विमानाने टूरवर गेलेल्या आपल्या पतीच्या यशाविषयीचे कौतुक ओसंडत असते. टेपरेकॉर्डरवर चालू असलेले संगीत, दूरध्वनीवर चालू असलेले संभाषण, उड्डाण करणाऱ्या विमानाचा आवाज या साऱ्या गोंधळात एक पत्र येते. ती स्त्री पाकीट फाडून खिडकीतून टाकते आणि पत्र वाचू लागते. तिचा चेहरा गोंधळतो, बावरतो. मग ती आणि तिचा मुलगा (श्री.अच्युत देशिंगकर) हे पत्र कोणी कोणाला पाठवले असेल त्याचा तर्क करीत असतात. पत्राखाली असणारी विमल

ही सही दोघांनाही अपरिचित. बोलता बोलता मुलगा विमलचा आणि पप्पांचा तर काही संबध नाही ना ? अशी शंका उपस्थित करतो. मम्मी त्याला गप्प करते. खरोखरच एक विमल (सौ लालन सारंग) हातात बॅग घेऊन घरात येते; सराईतासारखी वावरते; घराविषयी सारी माहिती सांगते; प्रत्येकाला भेट आणते. मम्मीला काही कळेनासे होते. पहिला विचार, शेजारी काय म्हणतील? नोकर काय म्हणतील ? ही बया ब्लॅकमेल तर करणार नाही ना ? मम्मी चक्रावून जाते.. मुलगा मात्र या अनुभवाकडे जरा थ्रिल या दृष्टीकोनातून पाहतो. छोटी नीता (कु. मीनल जोशी) पार्टीहून घरी येते. ती रडत रडत विमललाच मम्मी समजून बिलगते– चटकन् दचकून बाजूला होते. इथे नाटकाचा पहिला अंक संपतो. हा पहिला अंक नाटकाविषयी खूप वेगवेगळचा अपेक्षा अपेक्षा निर्माण करणारा आहे. नाटकाच्या नंतरच्या विकासात नीता आणि तिचा भाऊ हळूहळू विमलकडे ओढले जातात. मम्मीच्या शिस्तीपेक्षा विमल अधिक समजूतदार, प्रेमळ अशी वाटते त्यांना. चिडलेली मम्मी मुलांचा द्रोह पाहून अधिक चिडते. पपा दूर असल्याने ती स्पष्टीकरण विचारू शकत नाही. नाटककाराने अनेक भासदृश्यातून मम्मी आणि पपांचा संवाद दर्शविला आहे. याशिवाय वाढत्या वयातील मुलाचे व मुलीचे अनेक प्रश्न तिला भेडसावत आहेत. नीताला कोणी एक मवाली वाईटसाईट फोन करतो, तिला रस्त्यात गाठून तिच्याशी बोलण्याचा यत्न करतो, तर मुलाच्या कॉलेजमध्ये संप चालू आहे.

घरटे कितीही छान बांधले तरी शेवटी बाहेरचे वारे उष्ण होऊ लागले की पिलांना किती काळ जपता येणार? त्यातून मम्मीच्या मते विमलच्या रूपाने पापच त्या घरात स्वच्छंदाने वावरू लागले आहे. या नव्या स्त्रीकडे आशंकेने पहाणारी नीताही तिच्या आहारी गेली आहे. नीताला आलेला 'त्या' माणसाचा फोन विमल घेते – त्याला सरळ घरी बोलावते. हळूहळू मुलांचे प्रश्न तिच्याच हाती जातात. मम्मी आपल्या मैत्रिणीला आपला सारा प्रश्न समजावून सांगते. ही मैत्रीण आहे संस्कृतिसंरक्षक – 'सखाराम बाइंडर' सारख्या नाटकांविरुद्ध प्रचार करणारी. प्रत्येक पुरुष व्यभिचारी असतो असे मानणारी. तिचा सल्ला पपा आले की त्यांना जाब विचारण्याचा आहे. मम्मी विचारी दिवस कंठते आहे. विमल, दोन्ही मुले, नीतावर प्रेम करणारा तो प्रियकर यांचा उत्सव चालू आहे – अचानक पपा लवकर येतात; करारीपणाने त्या उत्सवाचे स्पष्टीकरण विचारतात; विमलची निर्भत्सना करून तिला आणि कॅमेरा हिसकावून नीताच्या प्रियकराला घालवून देतात. मी तुमच्यासाठी इतके श्रम करीत असताना तुमचा माझ्यावर विश्वास नाही – माझ्यामागे घर असेच संभाळतेस असा जाब मम्मीला विचारतात. मुले अभ्यासाला निघून जातात. मम्मी पुन्हा फोनजवळ येते –सारे काही

ठीक आहे असे आनंदाने मैत्रिणीला सांगते — त्याचवेळी घरामध्ये विमल आणि एक पुरुषआकृती यांचे उन्मादक नृत्य चालू आहे त्याकडे तिचे लक्ष जात नाही की ती पहात नाही ? असा प्रश्न आपल्या मनात येतो आणि नाटकाचा पडदा पडतो.

या नाटकाचा अनुभव गृहस्थीचा आहे. स्त्री-पुरुषनाते, दोन पिढ्यातील अंतर आणि कुटुंब-समाज नाते हे या अनुभवाचे तीन महत्त्वाचे पदर आहेत. मम्मी आणि पपा यांची पिढी स्त्री-पुरुष नात्याविषयी मौन पाळणारी तर त्यांचा मुलगा वडिलांच्या प्रेमप्रकरणाविषयी मुक्तपणे बोलणारा, मम्मीलाच पपा 'सेक्शुअली' सुखी आहेत का असे विचारणारा आहे. त्यांच्या मुलीवर मात्र घरातील 'सेक्स'विषयीच्या मौनाचा परिणाम झालेला आहे. तिला स्त्री-पुरुष नात्याची किळस वाटते. तर त्यांच्या मम्मीची मैत्रीण जनावरांविषयी बोलावे तशी पुरुषांविषयी बोलणारी आहे. समाजातील बदलते वातावरण पपा-मम्मीच्या मुलामध्ये स्पष्ट दिसते. त्याच्या संभाषणातील तुच्छता, मोकळे-पणा, बंडखोरवृत्ती आजच्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारी आहे. लोक काय म्हणतील याचा मम्मीला जसा बाऊ वाटतो तसा या मुलांना वाटत नाही. विमलच्या आगमनामुळे कुटुंबजीवनाच्या तळाशी असणारे हे सारे प्रश्न उसळून वर येतात. विमल ही आपल्या प्रियकराच्या माणसांचा स्नेह मिळवण्यासाठी आलेली प्रेयसी असून या नाटकातील संघर्ष सांकेतिक त्रिकोणातला मानायचा का ? हा खरा प्रश्न आहे. तसे मानायचे झाल्यास नीताच्या प्रियकराच्या प्रकरणाचा वा संस्कृतिसंरक्षक मावशीच्या प्रवेशाचा नेमका अन्वय लागत नाही.

मी 'घरटे अमुचे छान' या नाटकाचा प्रयोग पाहिला तेव्हा मला तो जसा कळला तसेच त्याचे परीक्षण मी लिहिणार आहे. अनौपचारिकपणे मला असे सांगण्यात आले आहे की नाटककार, दिग्दर्शक वा नटांना हा अर्थ अभिप्रेत नाही. नाटक पाहत असताना प्रेक्षकाला जाणवलेल्या या अर्थाचा त्या नाटकाच्या संकल्पनेशी काहीच अन्वय नसेल असे मला अजूनही वाटत नाही.

पहिल्या अंकानंतरच्या विकासात नाटकातील हालचालींचे,' गतीचे दुवे विमल—नीता—तिचा प्रियकर—तिचा भाऊ या पात्रांशी निगडित आहेत. मम्मी ही प्रेक्षक आहे, प्रतिक्रिया व्यक्त करण्याशिवाय ती काही करू शकत नाही. ही मम्मी श्रीमंत असली तरी permissive society तील नाही. (या वाक्यातील श्रीमंत permissive societyतील असतात हे सूचित समीकरण सर्वसाधारण मराठी लेखकाचे— माझे नाही.) किंवा श्रीमंतीमुळे शिक्षण, अध्यापक याविषयी तुच्छता बाळगणारी नाही. पण समाजातील आपल्या स्थानामुळे आपल्याला सुरक्षित जीवन जगण्याचा हक्क आहे असे मानणारी आहे. नीताला कोणी फोन करावा हाच आपल्या घराचा, प्रतिष्ठेचा तिला अपमान वाटतो. व्यक्तित्व नसणाऱ्या,

जीवनसंघर्षापासून दूर असणाऱ्या पण धूसरपणे मनात नीतिकल्पना बाळगणाऱ्या माणसाची धृष्ट अनीतीपुढे होणारी स्थिती म्हणजेच या नाटकातील मम्मी ! विमल घरात आल्यावर तिच्याविषयी दुरावा बाळगणारी मुले नंतर तिच्याशी मैत्री करतात. चांगल्या घरातील मुलांनाही आप्तांच्या नकारात्मक शिस्तीच्या तुलनेने permissive society, पाप सुंदर वाटू लागते कारण त्याचा स्वीकार करणे सोपे असते. म्हणूनच मुले विमलकडे जातात; मम्मी म्हणजे त्यांना कटकट वाटते; आणि म्हणूनच ज्या माणसाचे वर्णन नीता गलिच्छ, मवाली, राकट असे करते, त्या माणसाला विमलच्या मदतीने त्या घरात प्रवेश मिळतो. इतकेच नाही तर तो साधासरळ मुलगा आहे असे नीताला वाटते—पुढच्यावेळी ती त्याला स्वत: दार उघडते. पपा आल्यावर विमल बरोबरच त्याला घालवण्यात येते. त्या घरच्या कर्त्या पुरुषाच्या येण्याबरोबर या दोघांच्या रूपाने पाप वा मोह दाराबाहेर जातात म्हणून आपल्या पिलांचा संभाळ करणारी आई खुशीत आहे. पण तिला हे कळत कसे नाही की पाप मोहक-उन्मादक स्वरूपात ओसरीवरच आहे. (समाजात, वातावरणात आहे.) हे शेवटचे विधान मी कशाच्या आधारावर केले ? पहिल्या प्रयोगात शेवटचे पुरुष-स्त्री आकृत्यांचे नृत्य विमल आणि नीताच्या प्रियकराचे होते असे मला वाटले. नंतर असे सांगण्यात आले की हे दृश्यच पुढील प्रयोगात वगळले आहे.

'घरटे अमुचे छान' या शीर्षकात व्यक्त होणारी स्वतुष्ट वृत्ती, मावशीच्या प्रवेशातील अनीतीवरचे उथळ भाष्य, नीताच्या प्रियकराचे वर्णन व प्रत्यक्ष रूप यातील अंतर असे अनेक घटक वरील अनुभवाकडे बोट दाखवितात असे मला वाटते. नाहीतर सांकेतिक अशा कथावस्तूवरचे एक सैल रचनेचे नाटक याच दृष्टिकोनातून या नाटकाकडे पाहावे लागेल. विजय तेंडुलकरांच्या नाट्यशैलीची एक लकब असणारी भासदृष्येही नाट्यशैलीतूनच अनुभवाची वरील जात सुचवितात असे मला वाटते. शेवटी कोणतीही नाट्यकृती हे सांगणे आहे. एका अर्थाने ती निर्माण झाल्यावर नाटककाराचा आणि तिचा संबंध सुटतो आणि प्रयोग व प्रेक्षक असा संवाद सुरू होतो. मला या नाटकाने काय सांगितले ते जरा विस्ताराने मांडले. कदाचित् हा या कृतीचा अन्वय कुणालाही मान्य नसेल.

या नाटकाचा प्रयोग कमलाकर सारंग यांनी दिग्दर्शित केला होता. नाटकातील पात्रांच्या हालचालींची योजना करताना त्यानी रंगमंचावरील वेगवेगळ्या कोपऱ्यांचा, वेगवेगळ्या पातळ्यांचा फार कौशल्याने उपयोग केला होता. भासदृश्ये मात्र पहिल्या प्रयोगात तरी सफाईने सादर होत नव्हती. या नाट्यप्रयोगात अच्युत देशिंगकर या तरुण नटाने ('अमृत नाट्यभारती'चा एक उत्साही विद्यार्थी) आजच्या तरुण मुलांच्या प्रतिक्रिया, लकबी व्यक्त करणारी भूमिका अत्यंत

विश्वासाने सादर केली. रंगमंचावरील प्रत्येक क्षण आपल्या भूमिकेचा डौल त्यांनी सावरला. प्रेक्षकांची दाद मिळत असताही प्रेक्षागृहाची जाणीव न बाळगता आपला अभिनय सादर केला. नीताची भूमिका करणारी मीनल जोशी ('बालनाट्या'च्या प्रयोगात दिसणारी–) मात्र काहीशी अवघडल्यासारखी रंगमंचावर वावरत होती. स्त्री-पुरुष संबंधाविषयीच्या विकृत अपराधी गंडाने भेदरलेली मुलगी–हळूहळू त्यातून बाहेर पडणारी हसणारी तरुण मुलगी सादर करणे अवघडच होते. जोशी या मध्ये काही क्षण अभिनयाची जाणीव झाल्यासारख्या वागत होत्या त्यामुळे संपूर्ण भूमिका निर्माण करणे त्यांना जमले नाही. सुलभा देशपांडे (मम्मी) आणि लालन सारंग (विमल) या सरावलेल्या कलावतींनी आपल्या अभिनयाचे स्वरूप बदलण्याचा केलेला यत्न जाणवत होता. लालन सारंग यांनी आपल्या अभिनयात संयत सूर लावला होता. सुलभा देशपांडे यांनी कितीही प्रयत्न केला तरी त्यांच्या भूमिकेचा सूर कर्कश वाटत होता. (नाट्यसंहिता याला जबाबदार असावी.) नरेन चव्हाण (पपा) आणि प्रभाकर पाटणकर (नीताचा प्रियकर) यांनी आपल्या छोट्या भूमिका व्यवस्थित सादर केल्या. हा प्रयोग पाहत असताना सर्वच कलावंत काहीसे चाचपडत असल्याचा भास होत होता. (हा अनुभव केवळ पहिल्या प्रयोगाचाच असण्याची शक्यता आहे.)

या लेखाच्या प्रारंभी सेन्सॉर बोर्डाच्या चुकीच्या धोरणाचा निसटता उल्लेख आहे. त्याचबरोबर 'वेलकम थिएटर्स'ने या नाटकाची जी जाहिरात केली ती अनिष्ट प्रथा आहे हे नमूद करावयास हवे. मुद्दाम (चुकीचा) प्रेक्षक खेचण्यासाठी नाटकातील एखादा उल्लेख वा वाक्य संदर्भाविना जाहिरातीत देणे सर्वथा अनिष्ट आहे. ही जबाबदारी निर्मात्याची असली तरी दिग्दर्शक व कलावंत यांनी याकडे लक्ष पुरवणे आवश्यक आहे.

विजय तेंडुलकरांचे नवे नाटक या अपेक्षेने 'घरटे अमुचे छान' या नाटकाच्या प्रयोगाकडे जाणाऱ्या अनेक प्रेक्षकांची नाटकाच्या सैल रचनेमुळे अथवा केवळ प्रेमाच्या त्रिकोणाची कथा या कल्पनेमुळे निराशा होईल. परंतु तेंडुलकरांची नाटके आपण एका विशिष्ट कृतीतील आनंदासाठीच पाहतो असे नाही. अनेकदा एका वैचित्र्यपूर्ण वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाविषयीच्या कुतुहलाने आपण त्याकडे जातो. या कुतुहलाचे चीज होईल असे या नाटकात निश्चित काही आहे. याच कुतुहलाने आपण सारेच 'घाशीराम कोतवाल'ची वाट पहात आहोत.

□ □ □

# असंच एक गांव
# मधु जोशी

## कामगार नाट्च-स्पर्धेच्या निमित्ताने

शरद गोखले

---

मधू जोशी हे नाव मला तरी नवीन नाही. महाविद्यालयात एकाच वेळी असल्यामुळे त्या वेळी नाटचवर्तुळामध्ये जी मंडळी वावरत होती त्यात जोशी-अण्णाही होते. नाटकाची हौस संपली. मंडळी पोटापाण्याच्या उद्योगाला लागली. रीतीप्रमाणे डोक्यावर अक्षदा पडल्या या रुळल्या वाटेने जात असतानाच नाटचप्रेयसीची मिजास संभाळण्याचे कौशल्य केवळ चार दोन मंडळींनीच दाखवले. पैकी सुभाष गोडबोले यांनी 'कथा कुणाची' या नाटकाच्या निमित्ताने उदंड यश मिळवले. पण नंतर मात्र त्यांची वाढ खुंटली. माधव वझे आता दिग्दर्शनाकडे वळले आहेत. हो! पण आज ज्या मधू जोशीवर मी लिहिणार आहे त्याला तर मी जवळ जवळ विसरलोच होतो. त्याचे सगळचात प्रमुख कारण म्हणजे सगळचात दुर्लक्षी गेलेली जी कामगार रंगभूमी–त्या कामगार रंगभूमीशी मधूने नाते जोडले. आम्ही साधारणतः बघतो ती व्यावसायिक मंडळींची नाटके, किंवा पुण्या मुंबईच्या मातब्बर नाटच संस्थांची नाटके. त्यांच्या भल्याचे प्रसंगी बुऱ्याचेही कौतुक करतो. बारा प्रयोगातील दहा प्रयोग फालतू देणाऱ्या राज्य नाटच महोत्सवाची साग्रसंगीत दखल घेतो. स्वाभाविकपणेच काहीशा जिद्दीने आणि मिळत असलेल्या संधीचा लाभ घेणारा मधू–आणि तो ज्यांचे प्रतिनिधित्व करतो ती अन्य मंडळी दुर्लक्षितच राहतात.

शहरापासून दूर, सहकारी नगरामध्ये चालू झालेल्या कामगार नाटच स्पर्धा संपून आता बरेच दिवस झालेत. त्या स्पर्धेमध्ये मधू जोशी दिग्दर्शक म्हणून वर्षानुवर्षे खपत आहे. चालू वर्षीच्या स्पर्धेमध्ये त्याने 'अवर टाऊन' या मूळ इंग्रजी नाटकाचा अनुवाद– असंच एक गाव! हा प्रयोग सादर केला. त्यामुळे आत्तापर्यंत दुर्लक्षलेल्या मधूची आणि त्याच्या मित्रमंडळींची दखल घेणे आवश्यक वाटले.

### असंच एक गाव!

प्रथम हे कबूल केलेच पाहिजे की स्पर्धेतील यशासाठी ज्या प्रवृत्तीची नाटके लागतात त्याच पद्धतीचे हे एक नाटक. या नाटकाचा मुंबईला जो प्रयोग झाला तो जोशीबुवांनी आणि या नाटकाचे संयोजक श्री. शरद वर्तक यांनी पाहिला. मुंबईच्या मंडळींनी या नाटकाला दिलेली ट्रीटमेंट त्यांना रुचली नाही. नाटक मात्र त्यांच्या डोक्यात जाऊन बसले. स्वाभाविकपणेच स्पर्धेसाठी नाटक निवडण्याची वेळ आल्यावर 'असंच एक गाव' डोळचासमोर उभं राहिल. नाटकाचे अनुवाद करणारे नंदकुमार

नाईक यांचा हा पहिलाच प्रयत्न. तर कामगार रंगभूमीवर का होईना जोशी अण्णा दिग्दर्शक म्हणून स्थिरावलेले. स्वाभाविकपणेच नाईकांनी नाटकाची चोपडी विश्वासाने जोशीबुवांच्या सुपूर्त केली. नाटकावर बहुत विचार करून त्यामध्ये योग्य ते बदल करून, तालमींना प्रारंभ केला. त्यांनी घेतलेल्या अपार कष्टांना प्रयोगाच्या दिवशी पसंतीची पावती जरूर मिळाली व उत्तम प्रयोग केल्याचे समाधान—डॉ. वेक आणि कंपनीच्या कलाकारांना मिळाले. आणि प्रयोगाचे उरी बाळगलेले स्वप्न साकार झाल्याचा आनंद दिग्दर्शक या नात्याने मधूच्या वाट्याला आला आहे.

माणसाच्या जीवन विषयक कल्पना, त्याने उरी जपलेली शाश्वतमूल्ये,माणसाचे परस्परांचे नाते संबंध आणि शेवटी या सर्व मायावी विश्वाविषयी निर्माण होणारे असंख्य अनुत्तरीत प्रश्न एका विशिष्ट कथासूत्राच्याद्वारे या नाटकामध्ये पहावयास मिळतात. काळपुरुष म्हणून वावरणारा स्टेज मॅनेजर कथानकाच्या संदर्भात नाटकाच्या विषयावर भाष्य करतो. या धाडसी विषयावरील हे नाटक-विषयाला पोषक अशा कथासुत्रामध्ये गोवले आहे. नाटकाचा काळ हा १९४० ते १९५६ च्या दरम्यानचा आहे. पहिल्या अंकामध्ये नाटच काळाशी सुसंगत असे एका गावाचे वातावरण मोठ्या कौशल्याने निर्माण केले आहे. समोरासमोर राहणारे एक डॉक्टर आणि पेपरवाला यांच्यामधील सुस्पष्ट संबंध झाल्यावर दुसऱ्या अंकामध्ये डॉक्टरचा मुलगा व पेपरवाल्याची मुलगी सुमती यांचा विवाह लावून दिला आहे. काळ आणखी पुढे सरकला आहे. परस्परातील तणाव वाढीला लागले आहेत. तथापि पहिल्या व दुसऱ्या अंकातील विशिष्ट लय तिसऱ्या अंकामध्ये पूर्ण नाहीशी झालेली आहे. सुमतीचा मृत्यू झाला आहे आणि तिचा दहनविधी स्मशानामध्ये चालू आहे. लौकीक अर्थाने तिचा आणि जगाचा संबध संपलेला आहे. तिच्या पूर्वी मरण पावलेल्या गावातील वृद्धांचे मृतात्मे तिथेच तरंगत आहेत. सुमतीचा आत्माही मागे ओढ घेतो आहे. भविष्याचा वेध घेण्याचे सामर्थ्य प्राप्त झालेल्या सुमतीच्या आत्म्याला काळपुरुष बजावतो की बाईग, तू आता या व्यवहारी जगाच्या पलिकडे आहेस. सुमतिला हे पटत नाही. तिचा हट्ट पूर्ण करण्यासाठी काळपुरुष तिच्या लौकीक आयुष्यातील तिचा अकरावा वाढदिवस आणि तिचा लग्न दिवस-पुन्हा निर्माण करतो पण सुमतीचा आत्मा त्यात सुखाऊ शकत नाही. इकडे दहनविधी रीतीप्रमाणे झालेला असतो. माणसाच्या अपूर्णत्वाची चाहूल घेऊन त्याने जपलेल्या शाश्वत मुल्यांवर ओरखडा उठवून आणि प्रेक्षकाच्या मनामध्ये अनेकविध विचारांचे आवर्त उठवून नाटक संपते. कामगार रंगभूमीवर या प्रकारांचे, आणि इतपत यशस्वी असे काही पहायला मिळेल याची अपेक्षा नसलेला प्रेक्षक चांगल्या नाटयकृतीचा परिणामकारक प्रयोग पाहिल्याची जाणीव ठेऊन नाटयगृह सोडतो.



**शरदचंद्र वर्तक**
**संयोजक**

सत्यदेव दुबे, अमोल पालेकर, रंगायनची मंडळी ज्या पद्धतीचे धाडसी प्रयोग आज करत आहेत, त्याच्याशी जवळीक सांगणारा हा जोशी बुवांचा प्रयोग. प्रयोगाच्या यशाने, यशाचा प्रमुख शिल्पकार म्हणून जोशीबुवा निश्चित सुखावलेले दिसले. औपचारिक बातचीत करताना ते म्हणाले– 'या मंडळींचे प्रयोग पाहून त्यावर वायफळ चर्चा झोडण्यापेक्षा काहीतरी करणे मी पसंत करतो. नव्या नाटकाशी नाते सांगणारा एक छोटा गट त्यांनी तयार केला आहे. कामगार रंगभूमीवरच तुझे प्रयत्न का ? या प्रश्नावर उत्तर देताना मधू म्हणाला, अरे करायची इच्छा असली तरी स्वतंत्रपणे संधी तर मिळाली पाहिजे ना ? मी स्वतः कलोपासकांचा सदस्य आहे. गुणाने, कर्तृत्वाने श्रेष्ठ असलेली अनेक मंडळी तेथे आहेत. मी वाट पहात बसलो तर म्हातारा होईन. त्यापेक्षा इकडे स्वतंत्र काम करण्याची संधी आहे ना, मग चला इकडे या भावनेने मी इकडे आलो. काही अडले-पडले, शंका आल्या तर वडीलकीचे मार्गदर्शन करायला कलोपासकातील ज्येष्ठ मंडळी आहेतच. तथापि दिग्दर्शक या नात्याने श्रम माझे. अंतिम निर्णयही माझाच. आता असंच एक गावच्या तिसऱ्या अंकामध्ये स्मशानभूमीतील धार्मिक संस्काराचे सर्व मंत्र मी अगदी प्रारंभापासून अखेरपर्यंत ध्वनिमुद्रीत केले आणि त्याचा वापरही केला. राजा नातूंचा याला विरोध होता. पण त्यांचे मत मला पटले नाही. मी अत्यंत लो टोन मध्ये हे संपूर्ण मंत्र वाजवले आणि त्याने अपेक्षीत परिणाम साधला. मधूचे नाटक म्हणजे राजाचे नाटक असे गैरसमज कित्येकवेळा हेतुतः पसरवले जातात. हा प्रकार चीड आणणारा, आणि आमच्या आविश्रांत श्रमांचा अपमान करणारा आहे. नाटकाची निवड, पात्रांची निवड, नेपथ्य, प्रकाश योजना या बाबतीत कोणत्याही स्वतंत्र दिग्दर्शकाइतके स्वातंत्र्य मलाही आहे. 'असंच एक गाव' हे नाटक घेतल्यावरही या नाटकाच्या प्रयोगाबाबतच्या कल्पना मी स्वतः राबवल्या. प्रयोगाचे वेळी लेव्हलस्चा वापर करणे, सेक्शनल लाइटींगचा वापर करून प्रसंग सादर करणे आणि बारीक-सारीक तपशील लक्षात घेऊन मायमिंगचा वापर करणे, या बावतचे निर्णय नाटकाचा विषय लक्षात घेऊन केले गेले. तंत्रापेक्षा कला-

काराच्या अभिनयाला वाव मिळावा अशी जाणीवपूर्वक दक्षता घेतली गेली. प्रयोगाला प्रेक्षकांनी पावती दिल्याने या सर्व श्रमांचे चीज झाले.

मधू जोशी यांच्या परिश्रमांची पोच त्यांच्या प्रयत्नांमधून जरूर जाणवते. पुरुषोत्तम करंडक स्पर्धेमध्ये काळोख या एकांकिकेतील भूमिकेबद्दल श्री. जोशी यांना पारितोषिक मिळाले. अभिनया-बरोबरच त्यांनी दिग्दर्शनाचा आणि नाटचतंत्राचा अभ्यास सुरू केला. त्या-पैकी काही प्राथमिक प्रयत्न म्हणून पुरुषोत्तम करंडक स्पर्धेतील मावशी, अबोल झाली सतार, पारध, घनतमी शुक्र, या प्रयोगांचा उल्लेख करावा लागेल. महाराष्ट्रीय कलोपासकांच्या-वतीने सादर करण्यात आलेल्या वैदेही व ऱ्ही चौकट वाटोळी, या नाटकातून त्यांनी भूमिका केल्या. केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांच्या स्पर्धेसाठी त्यांनी दिग्दर्शित केलेल्या प्रेमा तुझा रंग कसा या नाटकाने दिल्ली येथे झालेल्या अंतिम फेरीमध्येही तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळ-वले. १९६८ मध्ये त्यांनी सादर केलेल्या, वाजे पाऊल आपले या नाटका-वर अंतिम फेरीतही या पारितोषिकांची बरसात झाली. १९६९ साली त्यांनी कामगार कल्याण मंडळाच्या स्पर्धेमध्ये श्रीमंत (डॉ. बेक अॅन्ड कंपनी) व दुरितांचे तिमीर जावो (किर्लोस्कर ऑइल एजीन्स) ही दोन नाटके उतर-वली. त्या पैकी श्रीमंत यशस्वी ठरले. आणि या स्पर्धेतील त्यांची विजयी परंपरा सुरू झाली. १९७० साली डॉ. बेक अॅन्ड कंपनीसाठी त्यांनी कथा



मधुअण्णा जोशी
दिग्दर्शक

कुणाची व्यथा कुणा हे नाटक दिग्दर्शित केले. प्राथमीक फेरीमध्ये हे नाटक पहिल्या क्रमांकाने यशस्वी झाले. तर अंतिम फेरीमध्ये जोशी अण्णांना दिग्दर्शनाचे दुसरे पारितोषिक मिळाले. राज्य नाटचमहोत्सवामध्ये १९७० साली त्यांनी दुरितांचे तिमीर जावो हे नाटक उतरवले खरे, परंतु त्यांचा प्रभाव पडू शकला नाही. त्यापेक्षा उत्कृष्ट कांपोझिशन्समुळे त्यांनी याच स्पर्धे-मध्ये सादर केलेले श्रीमंत जास्त स्वाग-तार्ह वाटले. मधल्या भिंती व चिमणीचं घर होतं या त्यांच्या दोन नाटकांनी १९७१ च्या स्पर्धा गाजवल्या. तर आपल्या वाढत्या लक्षणीय सामर्थ्याची चुणुक त्यांनी असंच एक गाव या यावर्षीच्या कामगार कल्याण केंद्राच्या स्पर्धा गाजवणाऱ्या नाटकाने दाखवली. वाटचाला आलेल्या उपेक्षेकडे दुर्लक्ष करून, एकलव्याच्या निष्ठेने जोशी

नाट्यक्षेत्रामध्ये काम करत आहेत. त्यांच्या श्रमाची पहिली पावती या लेखाच्या निमित्ताने मी देत आहे. पुण्यामध्ये नाट्यविषयक हालचाली नैमित्तिक स्वरुपाच्या असतात याचाही जोशीबुवांना खेद आहे. स्पर्धा आल्या म्हणजे मंडळी खडबडून जागी होतात. त्या संपल्या की — सारे कसं शांत शांत. मुंबईसारखा बारमाही गरम तवा पुण्यात नसल्याने थोडेफार शैथिल्य येते. ते झटकून टाकण्याचा प्रयत्न ही मंडळी करत आहेत.

कामगार कल्याण केंद्राचा हा नाट्य-महोत्सव यावर्षी विसाव्या वर्षामध्ये पदार्पण करत आहे. कलाकारांच्या निवडीला पडणाऱ्या मर्यादा, त्यांच्या वेळेच्या उपलब्धतेसंबंधीच्या अडचणी यामुळे स्वाभाविकपणे त्यांच्या स्पर्धांना मर्यादा पडतात. पडदा उघडल्यावर जे समोर दिसेल त्याचेच मूल्यमापन परिक्षकांनी करावे — असा नियम असतानाही अकारण नाही त्या गोष्टींचा संदर्भ लावला जातो आणि त्याचा निर्णयावरही परिणाम होतो. ही गोष्ट खचीतच गैर आहे.

या स्पर्धेच्या मर्यादेमध्ये जेवढे यश मिळविणे शक्य आहे, तो यशाचा टप्पा जोशी अण्णांनी गाठला आहे. वास्तविक त्यांना मोठी संधी उपलब्ध होणे जरूर आहे आहे. एक ना एक दिवस अशी संधी मिळेल असा त्यांना विश्वास असला, तरी संधी मिळत नाही म्हणून रडत न बसता कामगार रंगभूमीवर आपले नवीन नवीन प्रयोग जोशीबुवा सादर करणारच आहेत. ◻

## मराठवाडा महिला समता परिषद

[ पृष्ठ ८ वरून ]

होत्या. उंच बांधा, प्रसन्न व्यक्तिमत्व व चेहऱ्यावरील सात्विक तेज यामुळे श्रोतृ समुदाय प्रभावित झाला होता. फुले, आगरकर, आंबेडकर यांच्या सामाजिक समतेच्या कार्याचा आढावा घेऊन महिला मंडळाच्या कार्य-कक्षा विस्तृत करण्याचा सल्ला मृणालबाईंनी दिला. ब्राह्मण गावातील महिलावर अत्याचार झाला तेव्हा किती महिलांनी आवाज उठविला? त्यांची बेअब्रू म्हणजे आपली बेअब्रू नाही काय? असा सवालही त्यांनी विचारला.

उद्घाटनानंतर अध्यक्षीय भाषण होते ताराबाईंचे. स्वतंत्र चिंतन, वैचारिक स्पष्टता व २५ वर्षांचा सामाजिक कार्याचा प्रत्यक्ष अनुभव असल्याने प्रा. सौ. ताराबाईंचे भाषण म्हणजे तत्व आणि व्यवहार यांचा सुरेख संगमच होता. समतेची कल्पना कशी परस्परावलंबी आहे हे सांगून जातीभेद पाळणाऱ्या स्त्रियांना, स्त्री-पुरुष समानता मागण्याचा काहीही हक्क नाही असे त्यांनी खणखणीतपणे बजावले. स्त्रिया आणि शूद्र यांच्यातील माहेरच्या नात्यासंबंधी त्यांनी ऐतिहासिक विश्लेषण केले.

परिषदेची सुरवात तर चांगली झाली होती. पहिले सत्र संपले होते. मैत्रिणी-मैत्रिणीच्या गप्पा सुरू झाल्या होत्या. महिला मंडळांनी कोणते कार्य हाती घेणे प्रसंगोचित होईल, उद्या

कोणते ठराव मांडावेत इत्यादी चर्चा करीत आम्ही आमच्या बिऱ्हाडी आलो. अध्यक्षांच्या निवास्थानातच आमचे बिऱ्हाड होते. लातूर येथील कॉलेजच्या प्राचार्या वसुधा पाटील, प्रा शांता शिंदे, प्रा. लीला पाठक आदि आम्ही एकाच खोलीत होतो. वयानुसार मुलींने (म्हणजे महिलांचे) 'ग्रुप' झाले होते. मनमोकळी मुक्त-चर्चा चालू होतो. प्रा. वसुधा पाटील ताराबाईंच्या बालमैत्रीण. ए तारा, आज तू माझी साडी नेस, म्हणून त्यांचा आग्रह चालला होता. ताराबाईंचा श्री. नागनाथरावांशी प्रेम-विवाह झालेला. नागनाथराव संन्यस्त-वृत्तीचे कर्मयोगी स्वातंत्र्य सैनिक. म्हणून ताराबाईंना त्या गमतीने म्हणायच्या ए, तारे अग हा विश्वामित्र तुला वश झाला तरी कसा? ताराबाईही गमतीचे उत्तर देत होत्या. नवीन परिचय होत होता. तेवढ्यात जेवणाचे निमंत्रण आले. आम्ही सगळ्याजणी 'पोट-पूजे'ला लागलो. नंतर 'आम्ही आहोत बायका' नाटकाचा प्रयोग झाला.

सेलूच्या उत्साही महिलांनी या नाटकाचे दोन प्रयोग करून समता परिषदेसाठी निधी जमविला होता. सर्वच जणी जात पात, श्रीमंत गरीब कसलाही भेदभाव न मानता समरसतेने काम करीत होत्या. समाजवादी पक्षाशी संबंधित असलेल्या अनेक महिला असूनही परिषदेत कसलेही राजकारण त्यांनी येऊ दिले नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजे पासूनच कार्यक्रम सुरू झाला. बऱ्याच स्त्री स्वातंत्र्य सैनिक परिषदेस आल्या होत्या. स्वतंत्र व्यक्तिमत्व असलेल्या स्त्री स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार करण्यात आला. स्वातंत्र्य लढ्यातील आठवणींना उजाळा मिळू लागला. सौ. आशालता देशपांडे यांनी घरात जुन्या वातावरणातील आईचा विरोध असतानाही एका मुस्लिम गृहस्थास कसे संरक्षण दिले, सौ. ताराबाईंनी मोलकरणीचा वेष घेऊन 'सायक्लोस्टाईल मशीन' पोलीसांच्या वेढ्यातून कसे पळविले, आशाताई वाघमारे कमरेला हजारो रुपयांच्या नोटा खोचून ठेवून भिकारणीच्या वेशात भूमिगत कार्यकर्त्यांना कशी मदत पोचवत असत इत्यादी रोमांचकारी प्रसंगाचे पुन:स्मरण झाले. स्त्री सैनिकांच्या डोळ्यापुढे भूतकाळ तरळू लागला तर त्यांच्या त्यागाने व देदीप्यमान कर्तृत्वाने श्रोत्यांची अंत:करणे भारून टाकली. हा हृद्य कार्यक्रम संपूच नये असे वाटत होते.'पोलीस ॲक्शन होऊन हैद्राबाद राज्य भारतात विलीन झाले' हे पुस्तकातील एकच वाक्य. पण त्यामागे किती जणांचा त्याग व बलिदान आहे याचा विचार तरुण पिढीला या प्रसंगाने सुचला असेल.

ठराव पास करून प्रत्यक्ष कार्याची रूपरेषा अजून ठरायची होती. खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा सुरू झाली. सौ. करुणा चौधरी यांनी परिषदेचे कामकाज खेळीमेळीच्या आणि घरगुती वातावरणात चालले आहे असे म्हटले. 'घरगुती' शब्दामुळे अध्यक्षा ताराबाई सभागृहात गडबड करणाऱ्या मुलांना

उद्देशून म्हणाल्या की, येथे गडवड करू नये अशी मी विनंती नव्हे आज्ञा करते ! सभागृहात त्यामुळे सगळेच खळखळून हसले !

## अस्पृश्यता निवारणाचे कार्य

दुसऱ्या चर्चा सत्रात पहिला ठराव अस्पृश्यता निवारणा संबंधीचा होता. सौ. शारदा तुंगारेने ठराव मांडताना स्त्रीने आपल्या घरात अस्पृश्यता पाळली जाणार नाही याची दक्षता घेतली तर निम्मे काम होईल असे सांगून आंतर जातीय विवाहानेच सामाजिक समतेची प्रक्रिया गतिमान होण्यास मदत होईल असे प्रतिपादन केले. सौ. नलिनीबाई देवधर यांनी ठरावास अनुमोदन दिले. कु. संघमित्रा मांजरमकरने या संबंधी बोलताना सवर्णीयांकडून अस्पृश्यांना अनेकदा कशी अपमानास्पद वागणूक दिली जाते हे स्वतःच्या अनुभवावरून सांगितले. सर्वांची हृदये त्यामुळे हेलावली.

सर्वांना समान नागरी कायदा लागू करावा हा ठराव प्रा. शांता शिंदे यांनी मांडला. प्रा. सुशिला अंबेकर आणि सौ. वदरूद्दीन बेगम (बदरबाई) यांनी अनुमोदन दिले. बदरबाईंनी मुस्लिम स्त्रियांवर या प्रकरणी कसा दबाव येतो हे सांगितले. द्विभार्या प्रतिबंधक कायद्याला पाठिंबा दिला किंवा समता परिषदेला जायचे ठरविले तर पती पत्नीला 'तलाक' (घटस्फोट) देण्याची धमकी देतो. हिंदू महिलांनी मुस्लिम भगिनींना या बाबतीत सहकार्य करावे हे त्यांचे म्हणणे बरोबरच होते.

कुटुंबनियोजनाच कार्य महिला-मंडळाने हाती घ्यावे हा ठराव सौ.अर्चना साधले यांनी मांडला व प्रा. लीला पाठक यांनी अभ्यासपूर्ण भाषणाने त्यास अनुमोदन दिले. सौ. सुशीला कुलकर्णी यांनी अंधश्रद्धा टाकून बुद्धिवादी दृष्टिकोन स्त्रियांनी स्वीकारावा असा ठराव मांडला. प्रा. कुमारी बादशहा यांनी अनुमोदन दिले. नोकरी करणाऱ्या स्त्रियांना संरक्षण मिळवून देण्याचे कार्य महिला मंडळांनी करावे हा प्राचार्य वसुधा पाटील यांचा ठराव महत्त्वपूर्ण होता. सौ. करुणा चौधरी यांनी कामगार स्त्रियांच्या प्रश्नांचे स्वरूप स्पष्ट केले. इतर ठराव व चर्चाही उद्‌बोधक होती.

मराठवाडा पातळीवर समता मंडळ नेमून जिल्हा पातळीवर त्याच्या शाखा काढाव्यात असे ठरविण्यात आले आहे. लवकरच अध्यक्ष, चिटणीस आदी पदाधिकाऱ्यांची निवड होईल.

सगळ्यांनी मनापासून काम केले तर समतेचे स्वप्न साकार होऊ शकेल. जातिभेदापासून मुक्त समतावादी समाज निर्माण करण्याच्या ऐतिहासिक कार्यात तरुणींची नवी पिढी निश्चितच महत्त्वाचा वाटा उचलील असा विश्वास परभणी जिल्ह्यातील सेलूच्या या समता महिला परिषदेने दिला आहे. माझ्या दृष्टीने परिषदेची हीच खरी फलश्रुती आहे.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Weekly ) : 50 Paise : Regd. No. MH–649

आगामी

# पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

राजहंस प्रकाशन